१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

रायगड | रविवार । दि. २० सप्टेंबर २०२६ । अंक १०५ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in




## महाबळेश्वर रस्त्यावर कारची धडक

**पोलादपूर :** महाबळेश्वर रस्त्यावर भरधाव कारने दुचाकीसह दोन वाहनांना धडक दिल्याची घटना घडली आहे. या अपघातात वाहनांचे प्रचंड नुकसान झाले असून, एक महिला आणि एक पुरुष जखमी झाले असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी (दि.१९) सकाळच्या सुमारास कार चालक आदेश गवते (३१) हे पोलादपूर-महाबळेश्वर रस्त्याने महाडकडे जात होते. त्यावेळी ते पोलादपूर शहरात आले असता त्यांना अचानक डुलकी लागल्याने त्यांचा गाडीवरील ताबा सुटला. त्यामुळे त्यांच्या ताब्यातील गाडी पान २ वर

## वेधक

### सेझच्या विरोधात शेतकरी आंदोलन

**खरोशी :** रायगड जिल्ह्यातील पेण, पनवेल आणि उरण तालुक्यातील शेतकऱ्यांना आणि भुमीपुत्रांना महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) प्रकल्पातर्फे राष्ट्राच्या विकासाचा आणि सार्वजनिक प्रयोजनाचा सुवर्णकाळ दाखविण्यात आला होता. त्यासाठी हजारो एकर सुपीक भूमी देखील स्थानिकांकडून घेण्यात आली होती. परंतु, हाच प्रकल्प आज येथील शेतकरी वर्गासाठी एक भीषण अन्याय ठरला आहे. हा प्रकल्प अधिकृतपणे रद्द झाल्यानंतरही त्या जमिनी मूळ मालकांना परत न करता या जमिनी शासन जमा करण्याचा चाललेला कुटिल डाव अत्यंत संतापजनक असून, त्या विरोधात शेतकऱ्यांनी आंदोलन छेडले आहे. गेल्या काही काळापासून या कायदेशीर पान २ वर

### लालबागच्या रांगेत तरूणाचा मृत्यू

**मुंबई :** लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी मुंबईत आलेल्या जळगाव येथील २५ वर्षीय तरुण जयदीप मेघराज नेमाडे याचा दर्शनासाठी रांगेत उभे असताना मृत्यू झाला. हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची माहिती समोर आहे. हा तरूण ट्रान्सपोर्ट व्यावसायिक असून, गुरुवारी (दि.१७) रात्री तो लालबागच्या राजाच्या दर्शनाच्या रांगेत उभा असताना त्याला अस्वस्थ वाटू लागले. त्यानंतर तो अचानक खाली कोसळला. या घटनेची माहिती मिळताच मंदिरात उपस्थित असलेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तरूणाला उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. तसेच, हृदयविकाराच्या झटक्याने त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले.

### तिरूपतीच्या लाडूसाठी भेसळयुक्त तुप

**विशाखापट्टणम :** ईडीने तूप बनवणाऱ्या कंपनीच्या कैलाश चंद मंगला यांना मनी लॉंड्रिंग प्रकरणी अटक करण्यात आली आहे. ईडीने दावा केला की, चौकशीत भेसळयुक्त तूप तयार करण्यात आल्याचे आढळून आले. हे तूप तयार करण्यासाठी रिफाइंड पाम ऑइल, पाम कर्नेल ऑइल, पामोलीन आणि एमजी ९०, मोनोग्लिसराइड्स, मायवेसिट सॉफ्ट ४०० तसेच एसिटिक एसिड एस्टरसह इतर रसायने वापरली होती. याच तुपाचा पुरवठा तिरुपती देवस्थानला केला जात होता. २०१९ ते २०२४ या कालावधीत तिरुपती देवस्थानला पुरवठा केलेल्या तुपाची किंमत जवळपास २३० कोटी रुपये होती.

### आयआयटी विद्यार्थ्याची आत्महत्या

**मुंबई :** पवई येथील नामांकित भारतीय तंत्रज्ञान संस्था पुन्हा एकदा एका दुर्दैवी घटनेने हादरली आहे. आयआयटी मुंबईमधील एका विद्यार्थ्याने परीक्षेदरम्यान मोबाईल फोन आणि चॅटजीपीटीचा वापर केल्याच्या आरोपावरून झालेल्या कारवाईनंतर आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. परीक्षेत मोबाईल वापरल्याच्या आरोपावरून चौकशी झाल्यानंतर काही तासांतच या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्याने वसतिगृहातील खोलीत आत्महत्या केली. या घटनेनंतर आयआयटी कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांचा उद्रेक झाला असून, मृत विद्यार्थ्याच्या पालकांनी संस्थेच्या मुख्य प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन सुरू केले.

# शेकापचा सरकारवर हल्लाबोल

**मराठवाड्यात शेतकरी पावसासाठी आभाळाकडे पाहतोय, तर सामान्य नागरिक वाढत्या आर्थिक भाराच्या चिंतेत आहे. या दोन्ही प्रश्नांवर सरकारने केवळ घोषणा न करता ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाने केली आहे. दुष्काळी मदत असो किंवा डिजिटल व्यवहारांचा प्रश्न, जनतेच्या हिताशी तडजोड सहन केली जाणार नाही, असा सज्जड इशाराही शेकापने दिला आहे.**

## घोषणा नको, मदत द्या!

### शेकापचा सरकारला इशारा; शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचण्याची मागणी

#### शेकापच्या प्रमुख मागण्या

- मराठवाड्यातील परिस्थितीचा तातडीने आढावा घ्यावा.
- आवश्यकतेनुसार दुष्काळी उपाययोजना तातडीने लागू कराव्यात.
- नुकसानग्रस्त पिकांचे पीकपंचनामे त्वरित करावेत.
- पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी.
- कर्जफेडीबाबत शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.
- पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था करावी.
- जनावरांसाठी चारा उपलब्ध करून द्यावा.

**। मराठवाडा । प्रतिनिधी ।**

पावसाअभावी मराठवाड्यातील शेतीसमोर निर्माण झालेल्या संकटाची तातडीने दखल घेऊन शासनाने केवळ कागदी घोषणा न करता प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून मदत करावी, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाने केली आहे. पावसाअभावी पिकांचे नुकसान होत असून शेतकऱ्यांच्या उत्पादनावर त्याचा थेट परिणाम होत आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहण्याची शक्यता आहे. पान २ वर

## महागाईचा मार, त्यावर करांचा भार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करून त्यांच्या खिशावर विविध माध्यमातून अतिरिक्त भार टाकण्याच्या धोरणावर शेतकरी कामगार पक्षाने केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. सामान्य माणूस हा केवळ महसूल उभारण्याचे साधन नसून, देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे जनतेच्या खिशावर वाढता आर्थिक भार टाकण्याऐवजी सरकारने नागरिकांना दिलासा देणारी धोरणे राबवावीत, अशी भूमिका शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी मांडली आहे.

दैनंदिन जीवनातील वस्तू आणि सेवांवरील वाढता खर्च, घरगुती बजेटवरील ताण आणि विविध प्रकारच्या आर्थिक जबाबदाऱ्यांमुळे सामान्य नागरिक त्रस्त झाला आहे. शेतकरी उत्पादन खर्चाच्या कचाट्यात, कामगार रोजगाराच्या असुरक्षिततेत, छोटा दुकानदार वाढत्या खर्चात आणि मध्यमवर्गीय कुटुंब महागाईच्या चक्रात अडकले आहे, अशा परिस्थितीत सरकारने जनतेच्या खिशावर आणखी भार टाकू नये, अशी भूमिका पक्षाने घेतली आहे. सरकारच्या आर्थिक निर्णयांचा सर्वाधिक परिणाम हा तळागाळातील नागरिकांवर होतो. त्यामुळे कोणताही कर, शुल्क किंवा आर्थिक निर्णय घेण्यापूर्वी त्याचा सामान्य नागरिकांवर होणारा परिणाम तपासणे आवश्यक आहे. जनतेच्या खिशातून पैसा काढा आणि त्याला विकासाचे नाव द्या, अशी आर्थिक भूमिका स्वीकारली जाणार नाही, असा इशारा शेकापने दिला आहे. सामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ घोषणा आणि आकडेवारीच्या राजकारणावर सरकार चालणार असेल, तर शेकाप शांत बसणार नाही. तसेच, जनतेच्या आर्थिक प्रश्नांसाठी आणि सामाजिक न्यायाच्या मागणीसाठी आंदोलनाची भूमिका घेण्याचे संकेतही शेकापने दिले आहेत.

#### जनतेच्या प्रश्नांसाठी शेकाप रस्त्यावर

सामान्य नागरिकांच्या हिताशी संबंधित प्रश्नांवर सरकारने ठोस निर्णय घेतले नाहीत, तर शेतकरी कामगार पक्ष जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरेल, असा इशारा पक्षाने दिला आहे. सामान्य माणसाच्या खिशावर हात टाकण्याचे धोरण थांबवा, अशी मागणीही शेकापच्यावतीने करण्यात आली आहे.

#### सामान्यांच्या खिशावर वाढता भार का?

महागाई, विविध कर आणि दैनंदिन खर्चाचा वाढता ताण यामुळे सामान्य नागरिकांच्या आर्थिक अडचणी वाढत असल्याचा दावा शेकापने केला आहे. शेतकरी, कामगार, छोटे व्यापारी आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवर आर्थिक भार वाढवण्याऐवजी सरकारने त्यांच्या उत्पन्नाचे संरक्षण आणि जीवनावश्यक खर्चात दिलासा देण्याला प्राधान्य द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

## गौराईसह गणरायाला निरोप

- विसर्जन घाटावर भक्तांचा महासागर
- ७४,३४७ मूर्तींचे विसर्जन



(छायाचित्र : समीर मालोदे)

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सहा दिवसांच्या मनोभावे सेवेनंतर शनिवारी (दि.१९) मिरवणूक काढून वाजत गाजत गणरायासह गौराईला निरोप देण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील तलाव, समुद्र, नदी, खाडी, कृत्रिम तलाव अशा एकूण ५९५ ठिकाणी ७४ हजार ३४७ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यादरम्यान, बाप्पाला निरोप देण्यासाठी भक्तांचा महासागर विसर्जन घाटांवर दिसून आला.

रायगड जिल्ह्यामध्ये सोमवारी (दि.१४) १ लाख ५ हजार ३४५ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. दीड दिवसांच्या गणेशमुर्तींच्या विसर्जनानंतर गुरूवारी (दि.१७) गौराईचे आगमन झाले. यावेळी जिल्ह्यात १६ हजार गौराईच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून आरती, पुजन करण्यात आले. तसेच, गौराईला वेगवेगळ्या प्रकारचे नैवेद दाखवून "घरात सुख समृद्धी मिळो" असे साकडे घातले. या कालावधीत धार्मिक कार्यक्रमांसह सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. त्यात महिलांसह ज्येष्ठ नागरिक आणि तरुण मंडळींनी देखील उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. यादरम्यान, घराघरात होणाऱ्या भजन व आरतीने जिल्ह्यातील वातावरण मंगलमय झाले होते. त्यानंतर सहा दिवसांच्या मनोभावे सेवेनंतर शनिवारी (दि.१९) पान २ वर

## अलिबागमध्ये स्वच्छता अभियान



नगरपरिषद कर्मचाऱ्यांचा सहभाग

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जागतिक समुद्र किनारा दिनानिमित्त अलिबाग नगरपरिषदेच्यावतीने शनिवारी (दि.१९) सकाळच्या सुमारास समुद्रकिनारा स्वच्छता व जनजागृती अभियान राबविण्यात आले. "स्वच्छ समुद्रकिनारा, सुंदर अलिबाग" या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या अभियानात समुद्रकिनाऱ्यावरील कचरा संकलित करून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. हे अभियान अलिबाग शहराची ओळख आणि पर्यटनाचे प्रमुख आकर्षण असलेल्या समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता, संवर्धन व संरक्षण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आले होते. यावेळी नागरिक, स्वयंसेवी संस्था, युवक, महिला तसेच विविध सामाजिक संघटनांनी अभियानात सहभागी होऊन समुद्रकिनारा स्वच्छ ठेवण्याची प्रतिज्ञा घेतली.

या अभियानात जिल्हाधिकारी किशन जावळे, राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, मुख्याधिकारी सागर साळुंखे यांच्यासह नगरपरिषदेचे सभापती, उपसभापती, नगरसेवक, नगरसेविका, कर्मचारी आणि नागरिकांनी सहभाग पान २ वर

## आईच्या डोक्यात हातोडीचा घाव

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादात मुलानेच वृद्ध आईच्या डोक्यात हातोडी मारून तिला गंभीर जखमी केल्याची घटना खालापूर तालुक्यातील नडोदे गावात घडली. याप्रकरणी वडिलांच्या तक्रारीवरून खालापूर पोलीस ठाण्यात मुलाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तुषार येरुणकर याने त्याचे वडील तुळशीदास यांच्याकडे गणपतीच्या मखर सजावटीचे साहित्य कुठे ठेवले आहे? अशी विचारणा करत आरडाओरडा सुरू केला. त्यावेळी वडिलांनी यंदा छोटा मुलगा गणपती बसवत असून, सजावटीची आवश्यक तयारी करण्यात आल्याचे सांगितले. मात्र, या उत्तरावरून तुषार याचा संताप वाढला आणि त्याने वडिलांसोबत वाद घालत त्यांना कानाखाली मारली. हा प्रकार पाहून वाद मिटविण्यासाठी मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या आईच्या कपाळावर तुषार याने हातोडीने मारल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या हल्ल्यात आई गंभीर जखमी झाली. घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून, वडिलांच्या तक्रारीवरून खालापूर पोलिसांनी तुषार येरुणकर याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## पाबळमध्ये बोगस डॉक्टरवर धडक

### आरोग्य विभागाचा कायदेशीर बडगा



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील अतिदुर्गम पाबळ खोऱ्यात अनधिकृत वैद्यकीय व्यवसायाच्या आरोपावरून आरोग्य विभागाने एकनाथ राघो मोकल यांच्याविरुद्ध पुन्हा धडक कारवाई केली आहे. विशेष म्हणजे, संबंधित व्यक्तीविरुद्ध यापूर्वी २०१४ तसेच २०२३ मध्येही कथित बोगस डॉक्टर म्हणून कारवाई झाल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे. त्यानंतरही वैद्यकीय व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाल्याने शुक्रवारी (दि.१८) पुन्हा कारवाई करण्यात आली.

पेण तालुक्यातील पाबळ येथील एकनाथ मोकल यांच्याविरूद्ध अनधिकृत वैद्यकीय व्यवसायाबाबत आरोप होत होते. दरम्यान, संबंधित व्यक्ती वैद्यकीय व्यवसाय करत असल्याची माहिती गडब प्राथमिक आरोग्य केंद्राला मिळाली. त्यानंतर आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चेतन अविनाश म्हात्रे यांच्या उपस्थितीत शुक्रवारी कारवाई करण्यात आली. या कारवाईत अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी संदीप नरवणे, आरोग्य पान २ वर

#### औषधसाठा जप्त

कारवाईदरम्यान आढळून आलेला औषधसाठा अन्न व औषध प्रशासनाने नियमानुसार जप्त केला आहे. या औषधसाठ्याची पुढील तपासणी व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. कारवाईदरम्यान आवश्यक कागदपत्रे व इतर पुरावे संकलित करण्यात आले असून, पंचनामा करून पुढील कार्यवाही करण्यात आली.

## पालकमंत्री चुकले?

- आमदारांची हिंमत वाढली!
- गोगावले-तटकरे भेटीवर दळवींची पोटदुखी
- भूमिका चुकीची म्हणत वरिष्ठ नेत्यालाच दिला सल्ला

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

राजकारणात वरिष्ठ नेत्याच्या भूमिकेवर सार्वजनिकपणे आक्षेप घेणे ही सहज घडणारी बाब नाही. मात्र, शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते तथा रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांनी खासदार सुनील तटकरे यांच्या घरी गणपती दर्शनासाठी जाण्याच्या निर्णयावर शिंदे गटातीलच आ. महेंद्र दळवी यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली. गोगावलेंची भूमिका चुकीची होती, असे सांगत दळवींनी थेट पालकमंत्र्यांनाच अशा भेटी टाळण्याचा सल्ला दिला. यावरुन गोगावले-तटकरे भेटीने दळवींची पोटदुखी पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली.

विशेष म्हणजे, गोगावले आणि तटकरे यांच्यातील राजकीय जवळीक वाढत असल्याच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर दळवींची ही पोटदुखी समोर आली आहे. यापूर्वीही दळवी आणि शिवसेनेचे आ. महेंद्र थोरवे यांनी तटकरे कुटुंबाविरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. त्याचवेळी गोगावले मात्र तटकरे कुटुंबाशी समन्वय साधताना दिसत आहेत. गोगावले-तटकरे भेटीनंतर आता प्रश्न केवळ एका गणपती दर्शनाचा राहिलेला नाही. महायुतीतील स्थानिक पान २ वर

**केंद्र सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय | समुद्रातील माशांची संपत्ती मोजणार**

## मत्स्यसाठ्याचे होणार शास्त्रीय मूल्यमापन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

समुद्रातील माशांचा मूळ साठा किती शिल्लक आहे आणि त्याचे थेट आर्थिक मूल्य किती? याचे अचूक गणित मांडणारा एक अत्यंत महत्त्वाचा उपक्रम केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने हाती घेतला आहे. या नवीन धोरणामुळे कोकणातील पारंपरिक आणि यांत्रिक मच्छीमारांच्या भवितव्यावर तसेच जीवनमानावर येत्या काळात सकारात्मक परिणाम होईल, अशी आशा मच्छिमारांमधून व्यक्त केली जात आहे.



कोकण किनारपट्टीवरील हजारो कुटुंबे पूर्णपणे सागरी मासेमारीवर अवलंबून आहेत; मात्र, अलीकडच्या काळात हवामान बदल, अनियमित मॉन्सून, प्रदूषण, डिझेलचे वाढते दर, मोठ्या नौकांची अतिमासेमारी आणि बेकायदेशीर ट्रॉलिंगमुळे मासळीचे प्रमाण घटत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने समुद्रातील मत्स्यसाठ्याचे नैसर्गिक संपत्ती म्हणून मूल्यमापन करण्याचा निर्णय घेतल्याने स्थानिक मच्छिमारांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय मानकांनुसार राबवल्या जाणाऱ्या या पद्धतीत केवळ एका वर्षात पकडलेल्या मासळीचे मूल्यांकन होणार नाही, तर समुद्रात शिल्लक असलेल्या प्रजातींचा साठा वाढतोय की घटतोय, याचा सखोल अभ्यास केला जाईल. यासाठी गेल्या १० वर्षांतील मासळीच्या उत्पादनाची आकडेवारी आणि विविध प्रजातींच्या उपलब्धतेचा आढावा घेऊन या संपत्तीचे आर्थिक मूल्य ठरवले जाणार आहे. त्यामुळे कोणत्या भागात कोणत्या मासळीचा साठा कमी झाला आहे, याचा अचूक डाटा शासनाकडे उपलब्ध होईल. या नवीन मूल्यमापनाचा थेट फायदा कोकणातील मच्छीमारांना धोरणात्मक निर्णयांमध्ये होईल.

एखाद्या प्रजातीचा साठा कमी होत असल्याचे स्पष्ट झाल्यास तेथे शास्त्रीय निर्बंध लावून लहान मच्छिमारांच्या उपजीविकेचे साधन असलेल्या पारंपरिक मासळीचे रक्षण केले जाईल. तसेच, मत्स्यव्यवसाय सुधारणा, बंदरांचा विकास आणि आधुनिक नौकांसाठी मिळणारा शासकीय निधी अधिक योग्य प्रकारे वितरित होण्यास मदत होईल.

#### रोजगाराची मोठी हमी

भारताची ब्लू इकॉनॉमी मजबूत करण्याच्यादृष्टीने उचललेले हे पाऊल कोकणातील पापलेट, सुरमई, कोळंबी आणि बांगडासारख्या मागणी असलेल्या मासळीच्या संवर्धनासह मच्छिमार समाजाच्या उज्ज्वल भविष्याची आणि रोजगाराची मोठी हमी ठरेल.



# शिक्षक भरतीतून सहा तालुके वगळले

## शून्य शिक्षकी शाळांचा प्रश्न अधिक गंभीर



**। पाली । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत पवित्र पोर्टलद्वारे ३५१ उपशिक्षक पदांची भरती प्रक्रिया मागील आठवड्यात राबवण्यात आली. यामध्ये मराठी माध्यमाचे ३४० आणि उर्दू माध्यमाचे ११ शिक्षक मिळाले आहेत. या भरतीमुळे काही भागांत दिलासा मिळाला असला तरी, जिल्ह्यातील उरण, पेण, पनवेल, कर्जत, खालापूर आणि सुधागड या सहा तालुक्यांना या प्रक्रियेत पूर्णपणे वगळण्यात आल्याने तीव्र असंतोष पसरला आहे. शिवाय या ठिकाणी शून्य शिक्षकी शाळांना देखील शिक्षण देण्यात आलेले नाही.

जिल्ह्यात सध्या मराठी माध्यमाची १,१३९ आणि उर्दू माध्यमाची ७८ पदे रिक्त आहेत. नव्या भरतीनंतरही सुधागडमध्ये ५४, खालापूरमध्ये ३२, पेणमध्ये ९३, कर्जतमध्ये ७२ आणि उरणमध्ये ४० पदे अद्याप रिकामी आहेत. विशेष म्हणजे, या सहा तालुक्यांमध्ये जवळपास २० शाळा शून्य शिक्षकी आहेत. या शाळांमधील विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी शिक्षकच उपलब्ध नसल्याने लगतच्या केंद्र शाळांतून किंवा तात्पुरत्या व्यवस्थेवर शिक्षक पाठवून अध्यापन चालवले जात आहे. या गोंधळामुळे पालकांमध्ये आणि ग्रामस्थांमध्ये प्रशासनाच्या कारभाराबाबत मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संदर्भात ग्रामस्थ मनीषा कांबळे यांनी सांगितले की, शाळेत शिक्षक उपलब्ध नसल्याने मुलांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. आधीच शिक्षकांची टंचाई आहे, त्यात कार्यरत असलेल्या शिक्षकांची दुसऱ्या शाळेत बदली केली जात आहे. यामुळे शाळांमध्ये शिकवायला शिक्षकच उरत नाहीत.

> “या भरतीमध्ये तालुक्यात एकही शिक्षक भरण्यात आलेला नाही. तालुक्यात शिक्षकांच्या ५४ जागा रिक्त आहेत. त्यामुळे शैक्षणिक व इतर प्रशासकीय कामांवर ताण येत आहे. शिवाय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. अशा अनेक पालकांच्या तक्रारी येत आहेत.”
> – सादुराम बांगारे, गटाशिक्षणाधिकारी, सुधागड.

> “ज्या तालुक्यांमध्ये शिक्षकांची पदे अत्यंत मोठ्या प्रमाणावर रिक्त होती, तिथे या टप्प्यात प्राधान्याने भरती करण्यात आली आहे. शून्य शिक्षकी शाळांमध्ये शिक्षक देण्यात आले आहेत. उर्वरित सहा तालुक्यांमधील रिक्त जागा या दुसऱ्या टप्प्यातील भरती प्रक्रियेत तातडीने भरल्या जातील. तसेच काही जागा समायोजनाने भरल्या जातात.”
> – नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जी.प.

## ट्रकचालकाकडून माल लंपास

**पनवेल :** अहिल्यानगर येथे पोहोचविण्यासाठी ट्रकमधून पाठविण्यात आलेल्या १६ लाख ८३ हजार रुपये किमतीच्या स्टीलच्या मालाचा अपहार केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी ट्रकचालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुकेश मोरे यांच्या कंपनीचे मॅनेजर पवनकुमार पांडे यांनी ग्राहक वैष्णवी ट्रान्सपोर्टचे मालक अजय दहिफळे यांनी पाठविलेल्या ट्रकमध्ये १६ लाख ८३ हजार रुपये किमतीचा स्टीलचा माल भरून दिला होता. हा माल अहिल्यानगर येथे पोहोचविण्याची जबाबदारी ट्रकचालकावर सोपविण्यात आली होती. मात्र, ट्रकचालकाने माल नियोजित ठिकाणी अहिल्यानगर येथे पोहोचविला नाही. त्याने मालाचा अपहार केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## दंगा नियंत्रण पथकाची रंगीत तालीम

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी खारघर पोलिसांकडून सेक्टर-११ येथील केंद्रीय विहार मेट्रो स्थानकासमोर दंगा नियंत्रण पथकाची रंगीत तालीम घेण्यात आली.

खारघर शहराचा वाढता विस्तार, लोकसंख्येत होणारी वाढ तसेच घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सवात वाढ झाल्याने उत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणात नागरिक रस्त्यावर येतात. गणेश विसर्जन मिरवणुका, गर्दीची ठिकाणे आणि संवेदनशील परिस्थितीत कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून दंगा नियंत्रण पथकातील अधिकारी व अंमलदारांना प्रतिकूल परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले. या रंगीत तालीममध्ये खारघर पोलीस ठाण्यातील एक पोलीस निरीक्षक, चार सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक आणि ३२ पोलीस अंमलदार, असे एकूण ३७ अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी दंगा नियंत्रण योजनेनुसार करण्यात येणाऱ्या विविध कवायतींचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. पोलीस कर्मचारी महारुद्र देठे यांनी प्रशिक्षक म्हणून सहभागी अधिकारी व अंमलदारांना विविध कवायतींचे प्रशिक्षण दिले. गर्दीवर नियंत्रण मिळविणे, प्रतिकूल परिस्थिती हाताळणे तसेच संभाव्य अनुचित प्रकारांना सामोरे जाताना घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# तात्पुरत्या शौचालयांच्या सुविधेची मागणी




**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध सार्वजनिक गणपती विसर्जन स्थळी गणेशभक्तांची होणारी गर्दी लक्षात घेता, विसर्जनाच्या कालावधीत तात्पुरती शौचालये, टॉयलेट केबिन अथवा फिरते शौचालय व्हॅन उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने करण्यात आली आहे.

महापालिका क्षेत्रात अनंत चतुर्दशीपर्यंत विविध ठिकाणी गणेशमूर्तींचे विसर्जन केले जाते. या कालावधीत विसर्जन स्थळी मोठ्या संख्येने भाविक, नागरिक तसेच स्वयंसेवक उपस्थित राहतात. मात्र, अनेक विसर्जन घाटांवर पुरेशा शौचालयांची सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे. विशेषतः प्रभाग क्रमांक १४ मधील बीपी मरीन अकॅडमीजवळील बंदर रोड येथील विसर्जन स्थळी फिरते शौचालय व्हॅन अथवा तात्पुरते टॉयलेट केबिन उपलब्ध करून द्यावे, अशी विशेष मागणी करण्यात आली आहे. तसेच, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सार्वजनिक गणपती विसर्जन घाटांवर आवश्यकतेनुसार ही सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

# ऐन गणेशोत्सवात वाहतूक कोंडी

- कंटेनर वाहनांच्या रांगाच रांगा
- संबंधित प्रशासनाचे समस्येकडे दुर्लक्ष

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

ऐन गणेशोत्सवात दिघोडे ते गव्हाण फाटा तसेच चिरनेर, खोपटा, कोप्रोली, उरण मार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे येथील नागरिकांसह चाकरमानी हैराण झाले आहेत. संध्याकाळच्या वेळेला नागरिकांना कामावरून वेळेत घरी पोहोचता येत नसल्यामुळे प्रवासी नागरिक संताप व्यक्त करत आहेत. एवढेच नाही तर अत्यावश्यक आजारी रुग्णांना या मार्गावरून घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिका वाहतूक कोंडीमुळे रस्त्यात अडकून पडत असल्यामुळे रस्त्यातच रुग्ण दगावण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे रुग्णांचे मोठे हाल होत असून रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

उरण तालुक्यातील ग्रामीण भागात येणाऱ्या चिरनेर कळंबुसरे, कोप्रोली, दिघोडे, वेश्वी, जांभूळपाडा, खोपटा गव्हाण फाटा या गावातील मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात जड कंटेनर वाहनांच्या रांगाच रांगा लागत असून, संबंधित वाहतूक प्रशासन याकडे दुर्लक्ष



करीत असल्याचे चित्र आहे. रस्त्याच्या दुतर्फा जागा मिळेल तिथे वाहने बेशिस्तपणे पार्किंग करून ठेवत असल्यामुळे, वाहतूक कोंडी होत आहे. या वाहतूक कोंडीमुळे सकाळ संध्याकाळी वर्दळीच्या वेळी वादावादी होऊन कधीकधी हाणामारीच्या घटना घडत आहेत. त्यामुळे या प्रमुख रहदारीच्या मार्गावरील बेकायदेशीर पार्किंग नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असल्याने वाहतूक विभाग व संबंधित पोलीस ठाणे, सिडको प्रशासन तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींकडून कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. मात्र, वाहतूक कोंडीचा प्रश्न कित्येक वर्षांचा असून, स्थानिक लोकप्रतिनिधींकडून हा प्रश्न सुटेल याची शाश्वती नाही, अशी चर्चा नागरिकांतून ऐकवास मिळत आहे.

दरम्यान, उरण तालुक्यात औद्योगिक विकासाच्या नावाखाली कंटेनर यार्डचे जाळे पसरले आहे. यामुळे येथील रस्त्यांची दुरवस्था पहावत नाही. त्यामुळे उरणमध्ये आता जेएनपीटी प्रमाणेच तालुक्यातील ग्रामीण भागालाही कंटेनर वाहनांचा विळखा पडू लागला आहे. परिणामी येथील प्रवासी नागरिकांना जड वाहनांच्या कोंडीचा व अपघाताचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रवासी वर्गात संताप निर्माण झाला असून, या मार्गावर दुचाकी स्वारांचे मोठ्या प्रमाणावर अपघात झाले असल्याची माहिती तसेच वाहतूक कोंडीमुळे रुग्णांचे हाल होत असल्याची माहिती चिरनेरच्या ग्रामस्थांनी दिली.

### लोकप्रतिनिधी रमलेत गणेशोत्सवात

लोकप्रतिनिधी सध्या गणेशोत्सवात रमले आहेत. त्यांना जनतेच्या काय समस्या आहेत, त्यांना दररोजच्या त्रासाबरोबर ऐन गणेशोत्सवात देखील काय त्रास होतोय, याच्याशी कोणतेही सोयर सुतक नाही. रस्ता दुरुस्ती, वाहतूक कोंडी यासाठी अनेक आंदोलने झाली. या आंदोलनात फक्त आश्वासनेच देण्यात आली. मात्र, हा प्रश्न अजून सुटत नसल्यामुळे येथील जनतेतून नाराजीचा सूर उमटत आहे.

## कारची काच फोडून रोकड लंपास

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कारची काच फोडून कारमधील ५ लाख रुपये रोकड चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार आलम किस्मतअली कंकाली हे तळोजा फेज-१ येथे राहतात. त्यांनी त्यांची कार जे.डब्ल्यू.एल. कंपनीच्या जेएनपीटी हायवे पाडेघर परिसरात पार्क करून ठेवली होते. ही संधी साधून चोरट्याने कारची काच फोडली. त्यानंतर डॅशबोर्डलगत असलेल्या ड्रॉवरमधील पाच लाख रुपयांची रोकड चोरून नेली. काही वेळाने कारजवळ परतल्यानंतर चोरीचा प्रकार निदर्शनास आला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चोरट्याविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे.

पान १ वरुन

## सेझच्या विरोधात शेतकरी आंदोलन

आणि जिव्हाळ्याच्या प्रश्नावर प्रशासनाची आणि शासनाची भूमिका अत्यंत दुतोंडी व संशयास्पद राहिली आहे. तसेच, शेतकऱ्यांच्या हक्काच्या जमिनींवर डल्ला मारण्याचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. विशेषतः अपर जिल्हाधिकाऱ्यांनी दि.२८ जुलै रोजी दिलेला एकतर्फी व सदोष अहवाल हा सरळ-सरळ शेतकऱ्यांच्या पाठीत खंजीर खुपसणारा आहे. दरम्यान, प्रशासनानेही या जनक्षोभाची गांभीर्याने दखल घेतलेली आहे. पेणच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी हा संपूर्ण प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या मागण्यांवर अंतिम धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी तातडीने हे प्रकरण अपर जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत मंत्रालयातील प्रधान सचिव महसूल वन विभाग यांच्याकडे मार्गदर्शनासाठी पाठवले आहे. मात्र, केवळ कागदी घोडे नाचवून किंवा प्रशासकीय दिरंगाई करून शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचे प्रयत्न आता खपवून घेतले जाणार नाहीत. हा केवळ जमिनीचा लढा नसून, येथील समाजाच्या अस्तित्त्वाचा लढा आहे. त्यामुळे प्रत्येक सेझ बाधिताने आपल्या पिढीजात जमिनी पूर्ववत परत मिळवण्यासाठी व आपल्या मातीचा अधिकार जिद्दीने मिळवण्यासाठी टोकाचा संघर्ष करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाने आता आरपारची लढाई लढण्याचे निश्चित केले आहे. सेझ बाधितांच्या वडिलोपार्जित जमिनी शासन जमा करण्याचे मनसुबे रचणाऱ्या प्रशासनाला पुर्ववत परत मिळवण्यासाठी दि.२२ सप्टेंबर रोजी सकाळी १०.०० वाजता पेणमधील महात्मा गांधी मंदिर येथून एक प्रचंड भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा थेट उपविभागीय कार्यालयासमोर धडकणार असून, पेण तालुक्यातून हजारो शेतकरी व भूमिपुत्र मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरणार आहेत.

## घोषणा नको, मदत द्या!

या परिस्थितीत शासनाने प्रशासकीय यंत्रणेला तातडीने सक्रिय करून गावागावांत परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशी मागणी शेकापने केली आहे.

नुकसानग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करून पीकपंचनामे तातडीने पूर्ण करावेत, तसेच पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या नियमांनुसार नुकसानभरपाई उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पंचनाम्याच्या प्रक्रियेला विलंब झाल्यास नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने विशेष मोहीम राबवावी, अशी भूमिका पक्षाने मांडली आहे.

पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जाच्या परतफेडीत आवश्यक दिलासा देण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी शेकापने केली आहे. शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण वाढू नये यासाठी बँका आणि संबंधित यंत्रणांना स्पष्ट निर्देश देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

**पाणी आणि चाऱ्याचीही व्यवस्था करा**

दुष्काळसदृश परिस्थितीचा परिणाम केवळ शेतीवर न होता पिण्याचे पाणी आणि पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन गावागावांत पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था करावी. तसेच, जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

**‘बांधावर या, परिस्थिती पाहा’**

शेतकऱ्यांच्या समस्या कार्यालयीन अहवालांपुरत्या मर्यादित न ठेवता अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन परिस्थितीची पाहणी करावी. शेतकऱ्याला आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. त्यामुळे शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, असे शेकापने म्हटले आहे. शासनाने मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यास शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## गौराईसह गणरायाला निरोप

गणरायाला आणि गौराईला निरोप देण्याचा दिवस उजाडला. यादिवशी सायंकाळी ५.०० वाजल्यापासून मिरवणुकीला सुरुवात झाली. ग्रामीण भागात तर सायंकाळी ७.०० वाजल्यापासून ते रात्री १०.०० वाजेपर्यंत मिरवणुका आणि विसर्जन सुरूच होते. सर मिरवणूकींसोबत बेंजो व इतर पारंपारिक वाद्यांना प्राध्यान देण्यात आले. ढोल ताशांसह बेंजोच्या वाद्याने संपुर्ण परिसर दुमदुमून गेला होता. तसेच, गणरायासह गौराईच्या मिरवणुकीची गाडी फुलांसह रोषणाईने सजवली होती. मात्र, बाप्पाला निरोप देताना अनेकांचे डोळेही पाणावले होते. तरीदेखील बेंजो, ढोल ताशांसह स्पीकरवरील गाण्यांच्या तालावर अनेकजण नाचत होते. दरम्यान, वरुण राजानेदेखील मिरवणूकीच्या वेळी हजेरी लावत गणरायाला निरोप दिला. यावेळी जिल्ह्यातील समुद्रासह नदी, तलाव आणि खाडीमध्ये सुमारे ५८ हजार १७ गणेशमूर्ती आणि ६ हजार १७५ गौराईमूर्ती अशा एकूण ७४ हजार ३४७ गणेशमूर्ती आणि गौराईच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यादरम्यान, ‘‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’’ अशी साद घालण्यात आली. तसेच, विसर्जनाच्या ठिकाणी पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. कृत्रिम तलावांसह, मदत कक्ष, निर्माल्य कक्ष तसेच समुद्रासह तलावांमध्ये मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी जीव रक्षक नेमण्यात आले होते. त्यामुळे हा सोहळा मंगलमय व आनंदमय वातावरणात पार पडला.

**अलिबाग नगरपरिषदेमार्फत चोख व्यवस्था**

अलिबाग नगरपरिषदेमार्फत समुद्रकिनारी चोख व्यवस्था करण्यात आली होती. त्यात विसर्जनस्थळी निर्माल्य कलशासह वाहनांची चोख व्यवस्था, आरती करताना गर्दी होऊ नये म्हणून एक स्वतंत्र आरती स्थळ, मदत कक्षासह स्वागत कक्षाची उभारणी, तसेच समुद्रात गणेशमूर्तींचे विसर्जन करताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून स्वतंत्र जीव रक्षकांची देखील नेमणूक करण्यात आली होती. ते गणरायासह गौराईच्या मूर्ती बोटीतून समुद्रात विसर्जन करण्याचे काम करीत होते. यावेळी नगरपरिषदेच्यावतीने समुद्रकिनारी विजेची सोय, तसेच भक्तांना ध्वनिक्षेपक यंत्राद्वारे वारंवार सुरक्षेच्या सुचना देण्यात येत होत्या.

**कोंडी सोडविण्यासाठी पर्यायी व्यवस्था**

विसर्जनस्थळी जाताना मिरवणूकीला वाहतूकीचा अडथळा निर्माण होऊ नये, म्हणून पोलिसांनी अन्य वाहनांना पर्यायी व्यवस्था केली होती. यावेळी अलिबाग शहरामध्ये विसर्जनच्या ठिकाणी एकेरी वाहतूक सुरु ठेवली होती. तसेच, समुद्रकिनारी विसर्जन झाल्यावर बाजारपेठातून परतीचा मार्ग काढण्यात आला होता. त्याचबरोबर क्रिडा भवन येथे वाहन पार्कींगची व्यवस्था केली होती.

**तीन हजार पोलिसांचा फौजफाटा**

सहा दिवसांच्या गणरायाला निरोप देण्यासाठी जिल्ह्यातील ५९५ विसर्जन स्थळी भाविकांची गर्दी झाली होती. त्यासाठी जिल्ह्यात एकूण २ हजार ६४ पोलीस तैनात होते. त्यात ०७ पोलीस उपअधीक्षक, २९ पोलीस निरीक्षक, १२८ सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, एक हजार ९०० पोलीस अंमलदारां समावेश होता. जिल्ह्याबाहेरील एक हजार शंभर पोलीस मागविण्यात आले होते. त्यात तीस अधिकारी, ३०० पोलीस अंमलदार, ५०० होमगार्ड यांचा समावेश होता. तसेच राज्यराखीव पोलीस दलाची एक तुकडीही सुरक्षेच्या दृष्टीने तैनात करण्यात आली होती.

## महाबळेश्वर रस्त्यावर कारची धडक

उजव्या बाजूला असलेल्या वाहनांवर जाऊन धडकली. या अपघातात समोरून येणाऱ्या दुचाकीसह रस्त्याच्या बाजूला उभी असलेली इको कार व छोटा हत्ती वाहनाना जोरदार धडक बसली. यावेळी दुचाकीचालक विजय शिंदे (५५) आणि महिला पादचारी फिरोज शेख (४०) हे जखमी झाले आहेत. तसेच, तिनही वाहनांचे प्रचंड नुकसान झाले आहे. दरम्यान, जखमींना उपचारांसाठी पोलादपूर शहरातील खासगी रुग्णालयात पाठवण्यात आले.

## अलिबागमध्ये स्वच्छता अभियान

घेतला. यावेळी, समुद्रकिनाऱ्यावर वाढणारा प्लास्टिक व इतर कचरा हा पर्यावरणासाठी तसेच समुद्री जीवसृष्टीसाठी गंभीर धोका ठरत आहे. त्यामुळे केवळ एका दिवसापुरती स्वच्छता न ठेवता समुद्रकिनारा स्वच्छ ठेवणे ही नागरिकांचीही सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. तसेच, ‘स्वच्छ समुद्रकिनारा, हिरवी परंपरा, निरोगी उद्या’ या विचारातून अलिबागचा समुद्रकिनारा स्वच्छ व पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी नागरिकांनी नियमितपणे सहकार्य करावे, असे आवाहन देखील नगरपरिषदेच्यावतीने करण्यात आले.

## पालकमंत्री चुकले?

राजकीय समीकरणे बदलत असताना, आमदारांनी पालकमंत्र्यांच्या भूमिकेवरच सार्वजनिकपणे सवाल उपस्थित करणे ही रायगडच्या राजकारणातील लक्षवेधी घडामोड ठरली आहे. आता यावर पालकमंत्री भरत गोगावले काय प्रतिक्रिया देणार? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

## पाबळमध्ये बोगस डॉक्टरवर धडक

परिवेक्षक समीर सानप आणि १०२ रुग्णवाहिका चालक सागर पाटील सहभागी झाले होते. या प्रकरणातील महत्त्वाची बाब म्हणजे संबंधित व्यक्तीविरुद्ध २०१४ आणि २०२३ मध्येही अशाच स्वरूपाच्या आरोपावरून कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर पुन्हा वैद्यकीय व्यवसाय करत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली. त्यामुळे पूर्वीच्या कारवाईनंतरही हा प्रकार पुन्हा कसा सुरू झाला? याचीही सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे या घटनेतून अधोरेखित होत आहे. तसेच, दुर्गम भागात अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींमुळे नागरिकांच्या आरोग्यावर संभाव्य परिणाम होऊ शकतो. त्यामुळे केवळ एखाद्या व्यक्तीवर कारवाई करून थांबण्याऐवजी अशा प्रकारच्या वैद्यकीय व्यवसायाची साखळी, औषधांचा पुरवठा आणि संबंधित व्यक्तीची प्रत्यक्ष वैद्यकीय पात्रता यांचीही तपासणी होणे महत्त्वाचे ठरणार आहे. या कारवाईमध्ये एफडीए अधिकारी संदीप नरवणे यांनी विशेष भूमिका बजावल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

दरम्यान, आरोग्य विभागाच्या या कारवाईमुळे पाबळ खोऱ्यात खळबळ उडाली आहे. दोन वेळा कारवाई झाल्यानंतरही पुन्हा त्याच स्वरूपाचा आरोप समोर येत असल्याने, आता या प्रकरणाच्या पुढील तपासातून नेमके काय समोर येते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात एकनाथ मोकल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वावोशीत दोघांची पोलिसांशी हुज्जत

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

पत्रकारितेच्या नावाखाली कुठेही पोहोचून कॅमेरा सुरू करण्याचा प्रकार आता चर्चेचा विषय ठरत असतानाच वावोशी येथे पहाटे तीनच्या सुमारास दोन जण थेट पोलीस चौकीत पोहोचल्याची घटना घडली. पोलीस कर्मचाऱ्यांचे चित्रीकरण करण्यास सुरुवात केल्यानंतर पोलिसांनी समज देण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोघांकडून आरडाओरड सुरू झाल्याने अखेर पोलिसांना हस्तक्षेप करून कारवाई करावी लागली.

वावोशी पोलीस चौकीत पहाटेच्या वेळी पोहोचलेल्या या दोघांनी तेथील पोलीस कर्मचाऱ्यांचे मोबाईलवरून व्हिडीओ शूट करण्यास सुरुवात केली. पोलिसांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, परिस्थिती नियंत्रणात न आल्याने पोलिसांना कठोर भूमिका घ्यावी लागली. या घटनेमुळे पत्रकारितेच्या नावाखाली कोणालाही शासकीय कार्यालयात जाऊन चित्रीकरण करता येते का, तसेच पत्रकारितेच्या आचारसंहितेचे पालन कोण करणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. घटना घडली की मोबाईल कॅमेरा सुरू करून थेट प्रसारण करणे किंवा व्हिडीओ शूट करणे म्हणजे पत्रकारिता नव्हे. माहितीची खातरजमा, संबंधितांची बाजू, कायदेशीर बाबी आणि वस्तुनिष्ठ वृत्तांकन याला पत्रकारितेत महत्त्व आहे. काही नवोदितांकडून या बाबींकडे दुर्लक्ष होत असल्याने संपूर्ण पत्रकारिता क्षेत्राची प्रतिमा मलिन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वावोशीतील या घटनेने ‘कॅमेरा हातात आला म्हणून पत्रकार होता येते का?’ हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मिळकत आमचे अशिल यांनी मिळकतीचे विद्यमान मालक सौ.मनिषा गिरीष तवसाळकर यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याबाबत व्यवहार निश्चित केलेला आहे. त्याप्रमाणे दोन्ही उभयतांमध्ये सदर मिळकतीचा साठेकरार झालेले आहे. असे असतांना सुध्दा सौ. मनिषा गिरीष तवसाळकर यांनी आम्हाला कोणतीही कल्पना न देता सदर मिळकतीबाबत परस्पर त्रयस्त व्यक्तींशी व्यवहार करण्याची आमच्या अशिलांना दाट शक्यता वाटत आहे. सदर मिळकतीबाबत कोणत्याही वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध झाली असल्यास त्याबाबत आम्हाला कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. परंतू व्यवहाराबाबत अशी कोणतीही नोटीस प्रसिद्ध झाली असेल तर तरी आमचे अशिलांची या व्यवहारासंदर्भात सक्त हरकत आहे. याबाबत सदर मिळकतीसंदर्भात आमचे अशिलांशी संपर्क साधावा, अन्यथा सदरचा व्यवहार बेकायदेशीर होईल व त्यास सर्वस्वी विद्यमान मालक व सदर मिळकत विकत घेणारे त्रयस्थ इसम हे जबाबदार राहतील. हा व्यवहार आमचे अशिलांच्या अपरोक्ष झाला तर आमचे अशिल विद्यमान मालकांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी. तसेच याबाबत होणारा सर्व खर्च हा विद्यमान मालक यांचेकडून वसूल करण्यात येईल.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | एकूण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग | ६८९ | क्षेत्र ०-२०-९०<br>पो.ख. ०-०२-५०<br>एकूण क्षेत्र ०-२३-४० | १०.२३ |

वर नमूद जमिन मिळकत ही दुसरेपक्षी यांच्या मालकीची हिश्श्यास असलेले क्षेत्र ०-०७-८० हे. आर., ही बागायत जमिन या हरकतीचा विषय आहे.

दिनांक : १९/०९/२०२६

सही/-
आमचे अशिलांची सही

सही/-
**ॲड. तनुष्का तुषार पेडणेकर**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग

# गणेश दर्शन स्पर्धा २०२६



● श्री. संदीप जाधव, मु.पो. कुरूळ, ता. अलिबाग



● चौल तुलाडदेवी येथील संतोष म्हात्रे यांनी श्री गणेशाची केलेली फुलांमध्ये सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● चौल तुलाडदेवी येथील श्री. सुरेंद्र म्हात्रे रायगड जिल्हा प्रमुख (उबाठा) यांचे इथली श्री गणरायाची भव्य मूर्ती. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● श्री. प्रमोद चंद्रकांत कवळे, मु. परहूर, ता. अलिबाग यांच्या घरातील गणपतीचा सुंदरकांड रामायणातील अध्याय क्र. ५ मधील हनुमंताच्या पराक्रमावर आधारीत साकारलेला आकर्षक देखावा. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● कु. प्रथम नितेश कडू, मु. धोकवडे नंबर २, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणराज. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● तुषार गजानन कवळे, आवास



● प्राथमिक शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक ह.बा. ठाकूर गुरूजी यांच्या चिरनेर (मुळपाडा) येथील निवासस्थानात विराजमान गणपती बाप्पा व आकर्षक सजावट. (छायाचित्र : काव्य म्हात्रे)



● श्री. संकेत ठाकूर यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना. श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (शेकाप पुरोगामी युवक संघटना सदस्य बामणगाव)



● श्री. शैलेंद्र शेळके यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना. श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (सामाजिक कार्यकर्ते बामणगाव)



● चौल चंपावती आळी येथील ऋग्वेद विश्वास जोशी कोकण वाडा पुर्ण पुठ्ठा वापर पर्यावरण पुरक आणि मनमोहक सजावट केले. (छायाचित्र सुरेश खडपे)



● सुर्यकांत हरिभाऊ म्हात्रे खोपटे (कचेर पाडा) उरण यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : दिनेश पवार)



● थेरोंडा डोऱ्यांची वाडी येथील चौलकरांचा विघ्नहर्ता असा भव्य देखावा साजरा केलाय, सौ. मंदा पंढीरीनाथ चौलकर आणि परिवार. (छायाचित्र : सुरेश खडपे)

# रसायनीत गौरी गणपतींना निरोप

। रसायनी । प्रतिनिधी ।

'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या', 'गौरी माते की जय', 'हर हर महादेव' अशा जयघोषांनी रसायनी परिसर शनिवारी भक्तीमय वातावरणात दुमदुमून गेला. पाच दिवसांच्या गणपतींसह गौराईंला भाविकांनी वाजतगाजत आणि भक्तीभावाने निरोप दिला.



गौराईला विसर्जनासाठी नेत असताना मोहोपाडा बाजारपेठेतील श्री दत्त मंदिर परिसरात ग्रामस्थ, विशेषतः महिलांनी गौराईसमोर पारंपरिक ढोलाच्या तालावर नृत्य सादर करून उत्साहात सहभाग घेतला. मोहोपाडा गावातील पाच दिवसांच्या गणरायाला निरोप देण्यासाठी सकाळपासूनच भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. दुपारी तीननंतर ढोल-ताशांचा गजर, भजन-कीर्तन आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात गणरायाच्या मूर्ती विसर्जनासाठी नेण्यात आल्या. पाच दिवस गणरायाची तसेच दीड दिवस गौराईची मनोभावे पूजा-अर्चा केल्यानंतर लाडक्या बाप्पासह गौराईला निरोप देताना ज्येष्ठ नागरिकांपासून लहान मुलांपर्यंत अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते.

ढोल-ताशांचा गजर, फुलांचा वर्षाव आणि 'पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात गणरायाला निरोप देण्यात आला. त्यामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय आणि भावनिक वातावरणाने भारावून गेला होता.

रसायनी परिसरातील मोहोपाडा तलाव, रिस पूल, रिसवाडी पूल, काळणवाडी नदीपात्र, पाताळगंगा नदीपात्र, रसेश्वर मंदिराजवळील पूल, वावेघर गणेश घाट, वाशिवली गणेश घाट, कासप गणेश घाट, गुळसुंदे नदी, सावळे तलाव, कांबे पूल, बारवाई पूल आदी ठिकाणी गौरी गणपतींचे भक्तिभावाने विसर्जन करण्यात आले.

विसर्जनाच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि भाविकांची सुरक्षितता अबाधित राहावी, यासाठी प्रशासनाच्या वतीने विशेष खबरदारी घेण्यात आली होती. रसायनी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी, हेल्प फाऊंडेशनचे स्वयंसेवक, अग्निशमन दलाचे जवान तसेच ग्रामपंचायतीचे कर्मचारी विविध विसर्जन घाटांवर उपस्थित होते.

यावेळी प्रत्येक विसर्जन घाटावर निर्माल्य कलश उभारण्यात आले होते.

खालापूरचे पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. विशाल नेहुल तसेच रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विसर्जनस्थळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. गर्दीचे नियोजन, वाहतूक नियंत्रण, विसर्जन प्रक्रिया आणि भाविकांच्या सुरक्षिततेवर पोलिसांकडून विशेष लक्ष ठेवण्यात आले. रात्री उशीरापर्यंत भाविक विसर्जन करत होते.

# निर्माल्य संकलनातून पर्यावरण संवर्धन

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या माध्यमातून तसेच महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी तसेच सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली गौरी-गणपती उत्सवानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या निर्माल्य वस्तूपासून खत निर्मितीचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. गणेशोत्सवात गणरायाला अर्पण करण्यात येणारे हार, फुले, फळे तसेच अन्य निर्माल्य नदी, तलाव अथवा पाण्यात विसर्जित न करता, प्रतिष्ठानच्या माध्यमातून ठिकठिकाणी ठेवण्यात आलेल्या पर्यावरण कलशामध्ये टाकण्याचे आवाहन श्रीसदस्यांकडून करण्यात आले आहे. घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मंडळांनी या उपक्रमात सहभागी होऊन निर्माल्याचे योग्य संकलन करावे, असे सांगण्यात आले. खालापूर तालुक्यातील वणी येथे लागवड करण्यात आलेल्या वृक्षांसाठी या संकलित निर्माल्यापासून सेंद्रिय खताची निर्मिती करण्यात येणार आहे. या खताचा उपयोग वृक्षांच्या वाढीसाठी केला जाणार आहे. निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन होऊन जलप्रदूषणास आळा बसण्यास मदत होणार असून, पर्यावरणाचा समतोल राखण्यास हातभार लागणार आहे.

कृषीवल

: प्रायोजक :



प्रवेश मूल्य २०० रु. (फोटो काढण्याचे मूल्य वेगळे आकारले जाईल.)

जिंका रोज आकर्षक बक्षिसे

गणेश दर्शन स्पर्धा २०२६

आपल्या गणपतीच्या सजावटीसह फोटो पाठवा व बक्षिसे जिंका.

फोटोसाठी स्थानिक संपर्क

सुरेश खडपे (चौल) : ९९२१०५४६०६
जीवन पाटील(भाकरवड) : ७०६६८९८६३७/८१४९६६३८१३
संजय गायकवाड (कर्जत) : ९४२३३७७९००
समीर मालोदे (अलिबाग) : ९४२३३७५३६१
मुकुंद रांजणे (माथेरान) : ७५०७६७३८७९
अनिल गवळे (वेणगाव) : ९६८९९५४४२४
नंदकुमार मरोदे (खांब) : ८३०८६८८२२९
सलीम शेख (माणगाव) : ९४२३३८२७८९
सुधीर नाझरे (मुरुड): ९४२३३७७२४२
समीर रिसबुड (श्रीवर्धन): ९८८१९२२८३५
दत्ता म्हात्रे : (चिरनेर) : ७२०८३७७१०५
जुनेद तांबोळी (महाड) : ८४११९२४४६२
शैलेश पालकर (पोलादपूर) :९२२६८४९१८५
कांता हाबळे (नेरळ) : ९२०९२३८७६९
राजू नेवासेकर (मुरुड) : ९९२१६२३८४८/८२३७१३८९७४
सुनील ठाकूर (उरण) : ८१०८९२१५६५
मुस्कान खान (पेण) : ८९२८९११३९१
राकेश खराडे (रसायनी) : ९६६५३१४११५
बी.एस. कुलकर्णी(मोहपाडा): ९८६०६०९६५४
भूषण सुतार (सुधागड) : ८१४९६६४०५८
सत्यप्रसाद आढाव (रोहा) : ८९८३४२०१६१
अब्दुल सोगावकर (सोगाव) : ९९६०४८११३३
गणेश चोढणेकर (मुरुड) : ९२६००१६३२३
वैशाली मलबारी (पेण) : ८९८३९३६४५५
अल्ताफ चोरडेकर (रोहा) : ८८०५२४९५६७
सिद्धी दाखिणकर (माणगाव) : ७४९९३११८१७
महेश पवार (नागोठणे) : ९२२५४७००३७

स्पर्धेचे स्वरूप
■ आपण आमच्याकडे पाठविलेल्या गणपतीच्या फोटोला 'कृषीवल'मध्ये प्रसिद्धी दिली जाईल.
■ स्पर्धा १५ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत घेतली जाईल.

फोटो पाठविण्याची वेळ स. ११.०० ते संध्या. ५.०० वा. पर्यंत.

स्पर्धेसाठी फोटो तुम्ही कृषीवल कार्यालय, वेश्वी किंवा krushivalganesh@gmail.com या इमेलवर पाठवा
अधिक माहितीसाठी संपर्क : 8975816900/9175708906

# सिडकोच्या वसाहती तहानलेल्याच

## खारघर, कळंबोली, तळोजातील पाणीटंचाईचे संकट गहिरे

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तळोजा, कळंबोली आणि खारघर या सिडको वसाहतींमध्ये पिण्याचे पाणी केवळ काही मिनिटेच मिळत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. उन्हाळ्यात ही पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची भीती व्यक्त होत आहे. नवी मुंबई महापालिकेने सिडकोला होणाऱ्या पाणीपुरवठ्यात कपात केल्यानंतर पनवेल महापालिका क्षेत्रातील सिडको वसाहतींचे नियोजन विस्कळीत झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

कळंबोलीला प्रतिदिन ३० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी आवश्यक असताना प्रत्यक्षात २२ एमएलडी पाणीपुरवठा होत आहे. खारघरला ८५ एमएलडीची आवश्यकता असून सध्या ७५ एमएलडी पाणी मिळत आहे. सर्वाधिक बिकट परिस्थिती तळोजामध्ये असून, २२ एमएलडीची गरज असताना केवळ ८ एमएलडी पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गणेशोत्सवात घरी येणाऱ्या पाहुण्यांसाठी पाण्याची व्यवस्था कशी करावी, हा प्रश्नही नागरिकांसमोर आहे.




### पाणीपुरवठा व्यवस्थेच्या हस्तांतरणासाठी प्रयत्न

खारघर व कामोठे येथील पाणीपुरवठा व्यवस्था सिडकोकडून पनवेल महापालिकेकडे हस्तांतरित करण्यासाठी आवश्यक अभ्यास सुरू असून, त्यासाठी सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे, अशा माहिती पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी दिली. क्षेत्रीय पाहणी करून आवश्यक कागदपत्रे व आराखडे उपलब्ध करून देण्याबाबत सिडकोला कळविण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. नवी मुंबई महापालिकेने २५ मेपासून १० टक्के पाणीकपात लागू केल्याने पाणीटंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोरबे धरणातून होणाऱ्या पाणीपुरवठ्यात कपात करू नये, अशी मागणी महापालिकेने केली आहे. अपुऱ्या पाणीपुरवठ्यावर तातडीने उपाय म्हणून सिडको मंडळाच्या तसेच गावठाण क्षेत्रासाठी महापालिकेने १० टँकरचे नियोजन केले आहे. खारघर, ओवे गावासह अन्य गावांमध्ये या टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

> “नवी मुंबई महापालिकेने पाणीकपातीमध्ये काही प्रमाणात सवलत दिली आहे. मात्र, पाणीपुरवठ्यात अद्याप वाढ होणे आवश्यक आहे. यासाठी सिडको मंडळाकडून नवी मुंबई महापालिकेकडे सातत्याने पाणीपुरवठा वाढविण्याची मागणी करण्यात येत आहे.”
> – डॉ. राजा दयानिधी, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको मंडळ

> “गणेशोत्सव सुरू असताना पाणी येत नसल्याने तळोजातील नागरीक हैराण झाले आहेत. नागरिकांनी तीन आंदोलने केली तरीही प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांचे डोळे उघडत नाहीत, ही शोकांतिका आहे. आता हंडे घेऊन आम्ही खारघर येथील महापौर बंगल्यापासून दौड करून प्रशासनाचे लक्ष वेधून घेऊ त्याशिवाय ही मंडळी जागी होणार नाहीत.”
> – हरेश केणी, नगरसेवक, काँग्रेस पक्ष

> “प्रशासकीय अधिकारी आणि सत्ताधाऱ्यांनी नेमके कोणत्या प्रकल्पांना प्राधान्य द्यायला पाहीजे याचा अगोदर अभ्यास केला पाहिजे होता. अनेक वर्षे सत्तेत असूनही पनवेलकरांसाठी स्वतंत्र धरण उभारण्याला प्राधान्य न दिल्याने ही वेळ आली आहे. पाण्याची कम तरता असतानाही नवीन बांधकामांना परवानग्या व भोगवटा प्रमाणपत्रे दिल्याने भविष्यातील पाणी संकट वाढणार आहे. गणेशोत्सवानंतर सिडकोला याबाबत जाब विचारण्यात येईल.”
> – बबन पाटील, जिल्हा सल्लागार, शिवसेना (उद्धव ठाकरे)

पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती देवेंद्र मढवी यांनी सांगितले की, पनवेल महापालिकेतील अनेक गावांना पिण्यासाठी बोअरवेलच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागत आहे, ही ग्रामीण भागाची शोकांतिका आहे. तसेच महापालिका कर वसूल करत असलेल्या खारघर सारख्या शहरीभागात सिडकोने बांधलेल्या स्वप्नपूर्ती गृहनिर्माण संस्थेत रविवारी खंडित केला जाणारा पाणीपुरवठा मंगळवारी पुर्ववत केला जातो. तसेच खारघरमधील सेक्टर २० येथे दीड ते दोन तासच पाणीपुरवठा होतो. अजूनही महापालिकेतील गाव आणि शहरी परिसरात नागरिक वैतागले आहेत.

पनवेलची तहान भागविण्यासाठी भविष्यात शिलार धरणातून पाणी घेण्याचे नियोजन असून त्यासाठी अद्याप चार वर्षांचा कालावधी अपेक्षित आहे. पाताळगंगा नदीतून अतिरिक्त पाणी आणणारी जलवाहिनी तीन वर्षांत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र साडेपाच वर्षे उलटूनही पनवेलमध्ये ती पोहोचलेली नसल्याने पाणीसंकट अधिक गंभीर बनले आहे. पनवेल महापालिका आणि सिडकोने हे पाणीसंकट मिटेपर्यंत टँकरने मोफत पाणी द्यावे. तसेच पुरेसा पाणीपुरवठा होईपर्यंत नवीन घरांची बांधकामे थांबवा, भोगवटा प्रमाणपत्र देऊ नका अशी मागणी नागरिकांकडून सातत्याने होत आहे.

## लिफ्टमध्ये अडकलेल्या चिमुकल्याला जीवदान

**। खांदा । वार्ताहर ।**

खारघर-तळोजा जेल रोड परिसरातील सेक्टर १९ मधील खारघर रेजन्सी आयकॉन सोसायटीच्या २०व्या मजल्यावर लिफ्टमध्ये पाच वर्षीय मुलगा अडकल्याची घटना गुरुवारी (दि. १८ सप्टेंबर) सायंकाळी घडली. घटनेची माहिती मिळताच सिडको अग्निशमन दलाच्या खारघर केंद्रातील जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत चिमुकल्याची सुखरूप सुटका केली.

सायंकाळी ७.२० वाजता अग्निशमन दलाला लिफ्टमध्ये मुलगा अडकल्याची वर्दी मिळाली. अग्निशमन दलाचे वाहन घटनास्थळी पोहोचले. पाहणी केली असता २०व्या मजल्यावर लिफ्ट अडकली असून त्यामध्ये पाच वर्षीय



मुलगा असल्याचे जवानांच्या निदर्शनास आले.लिफ्टची चावी वापरून दरवाजा उघडण्याचा सुरुवातीला प्रयत्न करण्यात आला. मात्र, दरवाजा उघडण्यात यश आले नाही. त्यामुळे जवानांनी प्रसंगावधान राखत लिफ्टच्या दरवाजाच्या फटीतून मुलाला पाण्याची छोटी बाटली दिली. तसेच त्याला धीर देत घाबरून जाऊ नये, असे सांगितले.यानंतर अग्निशमन जवानांनी हायड्रोलिक स्प्रेडर आणि कटरच्या साहाय्याने लिफ्टचा दरवाजा उघडला. अथक प्रयत्नांनंतर मुलाला लिफ्टमधून बाहेर काढले.

लिफ्टमधून बाहेर येताच चिमुकला कियान राहुल जग्याशी आपल्या वडिलांना बिलगून रडू लागला. मुलगा सुखरूप असल्याचे पाहून त्याच्या आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. या प्रसंगानंतर कुटुंबीयांनी अग्निशमन दलाच्या जवानांचे मनापासून आभार मानले.या बचावकार्यात अग्निशमन प्रणेता प्रशांत दरेकर, फायरमन पी. आर. पाटील, पी. सी. सोंडे, सी. सी. पवार आणि यंत्रचालक पी. एस. निकाळे यांनी सहभाग घेतला. जवानांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला.

## रानवलीत माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

### शालेय विकासासाठी माजी विद्यार्थ्यांचा पुढाकार

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

गणेशोत्सवाचे औचित्य साधून रायगड जिल्हा परिषद शाळा रानवली (मराठी) येथे माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात पार पडला.रानवली सरपंच सुरेश मांडवकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली.मुख्याध्यापक भिकू पांगारकर यांनी प्रास्ताविक करून मान्यवरांचे स्वागत केले.




शासनाच्या परिपत्रकानुसार माजी विद्यार्थी संघ रानवली या समितीची स्थापना करण्यात आली असून, अध्यक्षपदी माजी सरपंच दत्ताराम डोईफोडे यांची सर्वानुमते निवड झाली. शाळेच्या गरजा ओळखून माजी विद्यार्थी एकत्र येत शालेय विकासासाठी कटिबद्ध राहतील, असा विश्वास नवनिर्वाचित अध्यक्षांनी व्यक्त केला. तसेच संपर्कासाठी व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मनोगतादरम्यान गजानन हावरे, संचित धामणकर, अमित चिविलकर, राजू जाधव, ज्ञानेश्वर गोरीवले, उमेश बडवे आदींनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.या प्रसंगी राजू जाधव, विजय गजमल, विठोबा हावरे, सुजित वैद्य यांसह अनेक ग्रामस्थ व माजी विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांनी शाळेच्या सर्वांगीण विकासाचा दृढ संकल्प करत कार्यक्रमाची सांगता केली.

याप्रसंगी शालेय विकासात मोलाचे योगदान देणारे माजी विद्यार्थी रमेश शिपूरकर, गजानन हावरे आणि जितेंद्र शिगवण यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

## गणरायाच्या विसर्जनासाठी पनवेल पोलिसांचे नागरिकांना आवाहन

**। खांदा । वार्ताहर ।**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणरायाच्या विसर्जनासाठी पनवेल शहर, नवीन पनवेल आणि खांदेश्वर परिसरात पोलिस प्रशासनाकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे. विसर्जन मिरवणुकांदरम्यान कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबरोबरच वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी गणेशभक्तांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी केले आहे.

व्हिडिओच्या माध्यमातून गणेशभक्तांशी संवाद साधताना पुजारी यांनी विसर्जनासाठी प्रशासनाने निश्चित केलेल्या विसर्जनस्थळांचाच वापर करण्याचे आवाहन केले. विसर्जनाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी अनावश्यक गोंधळ टाळावा, पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे असे त्यांनी स्पष्ट केले.

गणरायाच्या विसर्जन मिरवणुकीसाठी मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर उतरणार असल्याने वाहतूक व्यवस्थेलाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे. पनवेल शहर, नवीन पनवेल आणि खांदेश्वर परिसरातील विसर्जन मार्गांवर वाहतूक नियंत्रणासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मिरवणुकीदरम्यान वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी वाहतूक शाखेकडून मार्गनियोजन आणि आवश्यक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

दरम्यान, पनवेल वाहतूक शाखेच्या कार्यक्षेत्रात १८, १९, २०, २३, २५ आणि ३० सप्टेंबर रोजी विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर वाहतुकीत बदल करण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळे गणेशभक्त तसेच वाहनचालकांनी पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे आणि वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. उत्सव आनंदाचा, विसर्जन शिस्तीचे या भावनेतून गणेशभक्तांनी पोलिसांना सहकार्य करावे,असे आवाहन केले आहे.

## उरणमध्ये वाहतूक कोंडी

### ५ मिनिटांच्या प्रवासाला लागतात दोन तास

**। उरण । वार्ताहर ।**

ऐन गणेशोत्सवाच्या काळात उरण तालुक्यातील मुख्य रस्त्यांवर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाल्याने गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत. तालुक्यातील दिघोडे-दास्तान, गव्हाणफाटा-दिघोडे आणि कोप्रोली नाका या परिसरात रोज संध्याकाळच्या सुमारास तासंनतास गाड्यांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. अवघ्या पाच मिनिटांच्या प्रवासासाठी तब्बल दोन-दोन तास लागत असल्याने दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून कामावरून घरी परतणारे कोकणवासीयही या कोंडीत अडकून पडत आहेत.



उरण तालुक्यात सीएफएस, वेअर हाऊस आणि कंटेनर यार्ड मोठ्या प्रमाणात असल्याने या भागात अवजड वाहनांची कायमच मोठी वर्दळ असते. त्यातच गणेशोत्सवामुळे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांच्या कार आणि इतर वाहनांची संख्या अचानक प्रचंड वाढली आहे. रस्त्यावरून जाणारे अवजड कंटेनर ओलांडण्याच्या घाईत अनेक कार चालक समोरून येणाऱ्या वाहनांना जागा देत नाहीत, त्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. याशिवाय रस्त्याच्या दुतर्फा ठिकठिकाणी अवैधपणे उभी केलेली अवजड वाहने या कोंडीत आणखी भर घालत आहेत. दररोज संध्याकाळच्या वेळी ही समस्या अधिक गंभीर होत असून नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या गंभीर परिस्थितीवर बोलताना उरण वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी सांगितले की, गणेशोत्सवाच्या काळात या परिसरात अचानक कारची संख्या वाढली असून चालक मिळेल त्या मार्गाने पुढे जाण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे वाहतूक कोंडी अधिक वाढते. या वाहतूक कोंडीतून मार्ग काढण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना सुरू केल्या असून, खोपटा सर्क ला कोप्रोलीकडे जाणारी अवजड वाहने बंद करण्यात आली आहेत. कळंबुसरे या ठिकाणी नो एंट्री लावण्यात आली आहे.संध्याकाळी ५ नंतर अवजड वाहनांना खोपटे या परिसरात थांबवून ठेवण्याचा निर्णय वाहतूक पोलिसांनी घेतला आहे.

## ४१ लाखांची फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सुमारे ४० लाख ५८ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी चौघांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बाळकृष्ण धडंबे यांनी राजेश प्रजापती यांच्या नावाने बनावट बिले तयार केली आणि त्या बिलांचे पेमेंट करण्यासाठी कंपनीच्या बँकेचे खोटे चेक बनवले. प्रजापती यांच्या खोट्या सह्या करून कंपनीच्या अकाउंट लेजरला खोट्या नोंदी घेतल्या आणि चाळीस लाख ५८ हजार रुपये ऋषिकेश आर, अभिषेक चव्हाण, अनिकेत कदम, अनिकेत पटोले यांच्याशी संगनमत करून खात्यामध्ये वळते गेले.

'चला जाणूया नदीला' उपक्रम | शासकीय अन् सामाजिक एकत्रीकरणाचे पहिले पाऊल

## कोकणातील २४ नद्यांचे होणार पुनरुज्जीवन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

पश्चिम घाटातून अरबी समुद्राला मिळणाऱ्या नद्यांच्या बदलत्या परिसंस्थेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने चला जाणूया नदीला अभियानांतर्गत रायगड जिल्ह्यासह पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रमुख नद्यांच्या संवर्धनासाठी व्यापक कृती आराखडा आखण्यास सुरुवात केली आहे. या मोहिमेत कोकणातील २४हून अधिक प्रमुख नदी, खोऱ्यांचा समावेश केला असून, त्यात स्थानिक अभ्यासक, शेतकरी यांना सहभागी करून घेतले जाणार आहे.



जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंह आणि जल बिरादरी टीमच्या तांत्रिक व सामाजिक सहकार्याने या अभियानाची पूर्वतयारी गतिमान झाली आहे. जिल्ह्यातील नद्यांचे आरोग्य, पाण्याचा ताळेबंद आणि स्थानिक समस्यांवर प्रशासकीय पातळीवरून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी तालुका व जिल्हास्तरावर अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. कोकणातील नद्या लांबीने कमी; परंतु तीव्र उताराच्या असल्याने पावसाळ्यात पाण्याचा जलद विसर्ग होतो. त्यामुळे उन्हाळ्यात या भागात भूजल पातळी घटणे आणि पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होणे, हा विरोधाभास दरवर्षी दिसून येतो. वाघोटण, अर्जुना, मुचकुंदी, काजळी, बाव, शास्त्री, वाशिष्ठी, जगबुडी, सावित्री या मुख्य नद्यांसह नारिंगी, तांबी, धावती, वैतरणा, शिव, भारजा, जोग, केव, चोरद, नळकडी, मृदानी, बोर, गोदावरी, बेन, सप्तलिंगी आणि नावेरी या सर्व लहान-मोठ्या पाणलोट क्षेत्रांतील महसुली गावांचा शास्त्रीय अभ्यास केला जात आहे. नदी पुनरुज्जीवनात स्थानिक पातळीवर जलसंधारणाची कामे निश्चित करणे, नदीपात्रातील गाळ व अनधिकृत उत्खनन रोखण्यावर भर देणे, नदीकाठच्या गावांतील नागरिकांना नदी प्रहरी म्हणून सक्षम करणे यावर भर दिला जाणार आहे. नदी, खोऱ्यांचा सुक्ष्म आराखडा तयार करून प्रशासकीय धोरणात त्यांचा समावेश करण्याची ही सामाजिक-शासकीय संयुक्त मोहीम ठरणार आहे.

समाजघटकांना एकत्र आणणार काजळी, शास्त्री, मुचकुंदी, वाशिष्टीसारख्या नद्यांचा यापूर्वी अभ्यास झालेला आहे. काजळी आणि वाशिष्टी नदीपात्रात काही ठिकाणी तुटक स्वरूपात कामे झाली असली तरी बहुतांश नद्यांची पात्रे आणि कोंडी गाळाने भरलेली आहेत. १०० वर्षांपूर्वी ज्याप्रमाणे नद्यांमधून जलवाहतूक चालायची ती परिस्थिती पुन्हा निर्माण करण्यासाठी नद्यांमधील गाळ काढणे आणि अडथळे दूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे केवळ कागदी अभ्यास न करता आता प्रत्यक्ष कृतीवर भर दिला जाणार आहे. या अभियानात केवळ सरकारी यंत्रणाच नाही तर अभ्यासक, शेतकरी, पर्यावरणप्रेमी आणि संपूर्ण समाजघटकांना एकत्र आणले जाणार आहे.

## निवडक



### भागाड फाट्यावर गुरांचा ठिय्या

**सुतारवाडी :** गेल्या अनेक वर्षांपासून उनाड गुरांचा ठिय्या अनेक ठिकाणी मुख्यत्वे करून वाहनांच्या रहदारीच्या ठिकाणी असल्यामुळे अनेक वाहनांना मोठी कसरत करून मार्ग काढावा लागत आहे. विळा भागाड फाट्यावर असंख्य गुरांचा ठिय्या उभा असतो. येथून माणगाव कडे जाणारी त्याचप्रमाणे कोलाड पुणे या मार्गाकडे जाणारी अनेक लहान-मोठी वाहन रात्रंदिवस धावत असतात. त्याचप्रमाणे विळा भागाड परिसरामध्ये अनेक कंपन्या सुरू केल्या आहेत. अशा ठिकाणी कच्च्या मालाची ने आण करण्यात येते. यासाठी असंख्य अवजड वाहन व त्याचप्रमाणे ट्रेलर रात्रंदिवस धावत असतात. मात्र गुरांच्या ठिय्या मांडून असलेली असल्यामुळे अनेक अवजड वाहनांना त्याचप्रमाणे पुणे माणगाव कडे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना डोकेदुखी होऊन बसली आहे. या उनाड मोकाट गुरांचा वाळी कोणी नसल्यामुळे बरं रात्रंदिवस रहदारीच्या रस्त्यावर उभी असतात. या मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने अनेक वेळेला ओळखणा करण्यात आल्या होत्या अनेकवेळा वल्गना केल्या गेल्या होत्या. मात्र या वल्गना हवेतच राहिल्या. काळ्या रंगाची गुरे रात्रीच्या वेळी वाहनचालकाला दिसत नाहीत. त्यामुळे कधी कधी गुरांचा अपघात करून वाहन चालक पसार होतो. याकडे गुरांच्या मालकांनी लक्ष देणे आवश्यक असून आपली गुरे आपल्या गोठ्यात बांधून ठेवणे आवश्यक आहे.

### गळ्यातील सोन्याच्या पँडलची चोरी

**पनवेल :** मुलाच्या गळ्यातील दीड ग्राम वजनाचे सोन्याच्या बदामाची चोरी केल्याप्रकरणी महिले विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. १५ सप्टेंबर रोजी रात्री पावणे नऊच्या सुमारास फिर्यादी आणि त्यांचा मुलगा व त्यांच्या बहिणीची मुलगी हे नेत्रावती बिल्डिंग, करंजाडे येथे बाजारसाठी गेले होते. यावेळी चाळीस वर्षीय महिलेने त्यांच्या मुलाच्या गळ्यातील सोन्याच्या बदामाची चोरी केली.

### कारची काच फोडून पाच लाखांची चोरी

**पनवेल :** कारची काच फोडून आतमधील पाच लाख रुपयांची चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चोराविरोधात १५ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. आलम किस्मतअली कंकाली हे तळोजा फेस वन येथे राहत असून त्यांनी त्यांची कार जेडब्ल्यूएल कंपनी जेएनपीटी हायवे पाडेकर, गव्हाण फाटा येथे पार्क करून ते वॉशरूमला गेले होते. यावेळी कारची काच फोडून चोराने डॅश बोर्डाच्या लगत असलेल्या ड्रॉवरमधील पाच लाख रुपये चोरून दिले.

### सोन्याचे मंगळसूत्र हिसकावले

**पनवेल :** साईनगर परिसरातील गोविंद ग्रीनफिल्ड सोसायटीजवळ पायी घरी जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील सुमारे ४९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी जबरदस्तीने हिसकावून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी उज्वला मुकुंद पाटील (वय ४३, गृहिणी, रा. साईसिद्धी रेसिडेन्सी, साईनगर, पनवेल) या त्यांची मुलगी सिद्धी हिच्यासोबत साईनगर परिसरातून पायी घरी जात होत्या. त्या गोविंद ग्रीनफिल्ड सोसायटीजवळ आल्या असता काळ्या रंगाच्या दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने खेचून घेतले. घटनेनंतर आरोपी दुचाकीवरून पसार झाले. यातील दुचाकी चालकाचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे असून, त्याने काळ्या रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट आणि निळ्या रंगाची पँट परिधान केली होती. त्याच्या मागे बसलेल्या व्यक्तीचेही वय अंदाजे २५ ते ३० वर्षे असल्याचे फिर्यादीने पोलिसांना सांगितले आहे. दोन्ही आरोपींची ओळख अद्याप पटलेली नाही. हिसकावून नेलेल्या सोन्याच्या मंगळसूत्राचे वजन सुमारे ४९ ग्रॅम असून त्याची किंमत ४ लाख ९० हजार रुपये असल्याचे पोलिस नोंदीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून, आरोपींचा शोध सुरू आहे.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.




### 'समुद्रकिनारे स्वच्छ ठेवणे जबाबदारी'

**आगरदांडा :** प्रत्येक नागरीकाने सामाजिक बांधलकीतुन व्यक्तिगत संकल्पाबरोबर पर्यावरण समृद्ध करण्यासाठी सामाजिक संकल्प करावा. समुद्रकिनारे सुंदर व स्वच्छ ठेवणे ही सामुहिक जबाबदारी असून, जनजागृतीतूनच लोक जागृती होते. आणि अशा जनजागृतीतूनच पर्यावरणाचा समतोल राखणे शक्य असल्याचे प्रतिपादन भारतीय तटरक्षक दलाचे कमांडंट जयदीप पॉल यांनी केले. भारतीय तटरक्षक दल केंद्र (मुरुड-जंजिरा), जेएसडब्ल्यू आणि इनकोईस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय स्वच्छता दिनी आयोजित कार्यक्रमात स्वच्छता दूतांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी कमांडंट जयदीप पॉल, मुरूड नायब तहसीलदार कल्याण देऊळगावकर, जेएसडब्लूचे कॅप्टन देवेंद्र राणे, डॉ. लक्ष्मीकांत ढगे, डॉ. बी.जी. बावरे, आयुष हॉस्पिटलचे डॉ. ऋतुज माळी, सहा. पोलीस निरीक्षक तौसिक सैय्यद, जयश्रीराम पतसंस्थेचे उपाध्यक्ष मेघराज जाधव, कमांडिंग अधिकारी चैतन्य जोगदंड, अभिषेक करुणाकरण आदी मान्यवर उपस्थित होते. प्रतिवर्षाप्रमाणे तट रक्षकदलांच्या जवानांसह सर एस.ए. ज्युनियर कॉलेज, अंजुमन इस्लाम हायस्कूल, अंजुमन डीग्री कॉलेज, पोर्ट, मेरीटाईम बोर्ड, इनकोईस, मच्छीमार संस्थांचे सदस्य, पोलीस दल, नगरपरिषद कर्मचारी इत्यादींनी संपूर्ण किनारपट्टीवरील कचरा, प्लास्टिक तसेच किनाऱ्यावर वाहून आलेली घाण गोळा केली. यावेळी स्वच्छता दूतांनी सुमारे साडेपाच टनहून जास्त ओला व सुका कचरा संकलित केला.

# गणेशोत्सव आटोपून कोकणवासीय परतीच्या वाटेवर

## वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलिसांचे नियोजन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवासाठी कोकणात गेलेले नागरिक आता टप्प्याटप्प्याने मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईच्या दिशेने परतू लागले आहेत. दीड, पाच किंवा दहा दिवसांचा गणेशोत्सव करून नागरिक वेगवेगळ्या दिवशी परतत असल्याने यंदा वाहनांचा एकाच वेळी मोठा लोंढा येण्याची शक्यता कमी आहे. तरीही परतीच्या प्रवासात वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी पर्यायी मार्ग, बिघाड झालेल्या वाहनांसाठी तातडीची मदतीची व्यवस्था आणि २७५ हून अधिक अधिकारी- कर्मचारी तैनात, असे नियोजन केले आहे.

### अवजड वाहतूक झाली सुरू

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या वाहनांचा भार लक्षात घेऊन अवजड वाहनांना १५ सप्टेंबरपर्यंत बंदी घातली होती. आता अवजड वाहतूक सुरू झाली आहे. मात्र, कोकणातून परतणारी वाहने टप्प्याटप्प्याने येत असल्याने त्याचा वाहतुकीवर मोठा परिणाम होणार नसल्याचा वाहतूक विभागाचा अंदाज आहे. असे असले तरी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी २७५ हून अधिक अधिकारी आणि कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करता यावा यासाठी विविध ठिकाणी दिशादर्शक फलकही लावण्यात आले आहेत. वाहन बंद पडल्यास तातडीने मदत मिळावी यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

गणेशोत्सवासाठी कोकणात गेलेल्या नागरिकांचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे. गणेशोत्सवासाठी जाताना सर्व नागरिक जवळपास एकाच कालावधीत कोकणाच्या दिशेने रवाना झाल्याने वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली होती. त्या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांनी विशेष नियोजन केले होते. आता मात्र दीड, पाच किंवा दहा दिवसांचा गणेशोत्सव करून नागरिक वेगवेगळ्या दिवशी परतत असल्याने वाहनांचा ओघ टप्प्याटप्प्याने नवी मुंबई, ठाणे आणि मुंबईच्या दिशेने येत आहे.

गणेशोत्सवासाठी राज्य परिवहन सेवेच्या सुमारे ५८०० बस कोकणात सोडण्यात आल्या होत्या. प्रवासादरम्यान बस बंद पडल्यामुळे वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी नवी मुंबई पोलिसांनी प्रत्येक किलोमीटरवर बिघाड दुरुस्तीची व्यवस्था, फिरती दुरुस्ती पथके, तसेच क्रेन आणि बिघाडग्रस्त वाहने हटविण्यासाठी विशेष वाहनांची व्यवस्था केली होती. त्यामुळे आता परतीच्या प्रवासासाठीही अशीच व्यवस्था करण्याचे नियोजन पोलिसांनी आखले आहे.

### ठाणे-कल्याणमध्येही बदल नाही

ठाणे आणि कल्याण-डोंबिवली शहरात मोठ्या प्रमाणात कोकणवासी राहतात. गणेशोत्सवासाठी कोकणात गेलेले नागरिक आता परतू लागले असले तरी ते वेगवेगळ्या दिवशी परतत असल्याने वाहतुकीवर एकाच वेळी मोठा ताण येत नाही, असा ठाणे वाहतूक पोलिसांचा दरवर्षीचा अनुभव आहे. त्यामुळे यंदाही वाहतूक नियोजनात मोठे बदल करण्यात आलेले नाहीत. ठाणे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांनी याला दुजोरा देत वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी यंत्रणा सज्ज आहे.

वाशी ते पनवेल खारपाडा आणि रबाळे आणि वाशी परिसरातील महत्त्वाच्या मार्गांवर वाहतूक पोलिसांची पथके तैनात करण्यात आली आहेत. तसेच प्रत्येक किलोमीटरवर बिघाड दुरुस्तीची व्यवस्था, फिरती दुरुस्ती पथके, तसेच क्रेन आणि बिघाडग्रस्त वाहने हटविण्यासाठी विशेष वाहनांची व्यवस्था करण्यात येणार आहे. उरण विमानतळ परिसर, पाम बीच रोड, अटल सेतू यांसह विविध मार्गांवर वाहतूक वळवून वाहनांचा भार विभागण्यात आला होता. परतीच्या प्रवासातही आवश्यकतेनुसार हेच नियोजन कायम ठेवले जाणार आहे, अशी माहिती नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी दिली.

नागरिकांनी जास्तीत जास्त पर्यायी मार्गांचा वापर करावा. त्यामुळे वाहतुकीचा भार विभागला जाईल आणि कोंडी टाळता येईल. वाहन बंद पडल्यास किंवा अन्य कोणतीही मदत आवश्यक असल्यास बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० सप्टेंबर

१) श्री. विलास दामोदर पाटील वरसोली, २०-९-१९५५

२) श्री. दत्तात्रेय हरिश्चंद्र पोवळे सारळ, अलिबाग, २०-९-१९५०

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५**

**(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

---

## दामोदर चौलकर यांचे निधन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चिरनेर कलानगर येथील प्रसिद्ध मूर्तिकार दामोदर पोसू चौलकर (८०) यांचे गुरुवारी (दि.१७) वृद्धपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी शनिवारी (दि.२६) श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे होईल. तर उत्तरकार्य विधी सोमवारी (दि.२८) चिरनेर कुंभारपाडा येथील राहत्या घरी होणार आहे.

---

## खांदेश्वर सरोवरात भक्तिमय वातावरणात गणरायाला निरोप

**। खांदा । वार्ताहर ।**

पाच दिवसांच्या भक्तिमय पाहुणचारानंतर लाडक्या गणरायाला भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला.गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या, या जयघोषाने खांदेश्वर परिसर दुमदुमून गेला. घराघरांत भक्तिभावाने पूजा-अर्चा करून विराजमान झालेल्या बाप्पाच्या विसर्जनाची वेळ येताच भाविकांचे डोळे पाणावले.

गणरायाच्या विसर्जनाचे क्षण अनेक भाविक मोबाईलच्या कॅमेऱ्यात टिपताना दिसून आले. काहींनी बाप्पाला निरोप देताना हात जोडले, तर काहींच्या डोळ्यांतून अश्रू अनावर झाले. पाच दिवसांचा सहवास संपत असल्याने भाविकांच्या मनात हुरहूर निर्माण झाली होती.बाप्पा, पुढल्या वर्षी लवकर या, अशी भावनिक साद घालत भक्तांनी गणरायाला निरोप दिला.

खांदेश्वर सरोवर येथील विसर्जन घाटावर गणेश विसर्जनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती.कोळीवाडा येथील कोळी बांधवांकडून गणेशमूर्ती विसर्जनाची सेवा मोफत दिली जात होती. भाविकांना विसर्जनाच्या वेळी कोणतीही अडचण येऊ नये यासाठी कोळी बांधव दिवसभर सेवेत कार्यरत होते. पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी घाटावर उपस्थित होते.

विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांच्या गर्दीचे नियोजन तसेच सुरक्षिततेची काळजी प्रशासनाकडून घेण्यात आली. घाट परिसरात भक्तिमय वातावरणासोबतच शिस्तबद्ध पद्धतीने विसर्जनाची प्रक्रिया सुरू होती.यंदा खांदेश्वर सरोवर विसर्जन घाटावर चारशेहून अधिक गणेशमूर्तींचे विसर्जन होण्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

---

## डायलिसीस केंद्रांचे बांधकाम रखडले

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सर्वसामान्य रुग्णांना माफक दरात डायलिसीसची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पनवेल महापालिका दोन केंद्र सुरू करणार आहे. मात्र या केंद्रांचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. प्रस्तावित केंद्रांपैकी नवीन पनवेलमधील केंद्राच्या बांधकामाला कार्यादेश देऊन वर्ष उलटत आले आहे. जागेची निवड, तांत्रिक मंजुरी, करारातील अटी-शर्ती आणि प्रत्यक्ष बांधकामाच्या प्रक्रियेमुळे प्रकल्पाला विलंब होत असल्याचे होलले जात आहे. दरम्यान महापालिका प्रशासनाने आगामी तीन महिन्यांत दोन्ही केंद्रांचे काम पूर्ण करणार असल्याचा दावा केला आहे.

नवीन पनवेल (पूर्व) येथील सेक्टर ७ मधील आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर पहिले केंद्र सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले. या कामाला मागील वर्षी २६ जूनला प्रशासकीय मंजुरी मिळाली. त्यानंतर १ कोटी ७० लाख रुपये खर्चाच्या कामाचा कार्यादेश तब्बल पाच महिन्यांनी, नोव्हेंबरमध्ये देण्यात आला. मात्र, अद्याप हे काम पूर्ण झालेले नाही.

तसेच दूसरे डायलिसीस सेंटर खारघर सेक्टर ३६ मधील भूखंड क्रमांक १७ येथे सुरू करण्याचे नियोजन आहे. यासाठी महापालिकेने स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याची प्रक्रिया राबवली आहे. मात्र, या केंद्राचेही बांधकाम पूर्ण झालेले नाही. दोन्ही केंद्रांमध्ये प्रत्येकी २५ रुग्णखाटांची डायलिसीस सुविधा उपलब्ध होणार आहे.

दोन्ही केंद्रांमध्ये वैद्यकीय प्राणवायू वाहिनी व्यवस्था उभारण्यासाठीही काम करण्यात येत आहे. खारघर केंद्रासाठी वैद्यकीय वायू वाहिनीच्या पुरवठा करणे, वाहिनी बसविणे, चाचणी करणे आणि कार्यान्वयन आणि देखभालीसाठी १ कोटी ५८ लाख ४७ हजार ४६७ रुपये, तर नवीन पनवेल केंद्रासाठी १ कोटी ६० लाख २९ हजार ३५७ रुपये खर्च अपेक्षित आहे.

> स्वत:चे रुग्णालय नसलेल्या महापालिकेने डायलिसीस केंद्रासाठी कार्यादेश दिल्यानंतरही काम वेळीच पूर्ण करत नसल्याने रुग्णांना वणवण फिरावे लागत आहे. या प्रश्नाकडे महासभेचे लक्ष वेधून त्या प्रस्तावाला मान्यताही दिली होती. सत्ताधाऱ्यांनी मंजूर केलेल्या प्रकल्पांकडे का विलंब लागतोय याकडे लक्ष देण्याची गरज आहे.
>
> अरविंद म्हात्रे, विरोधी पक्षनेते, पनवेल महापालिका

सध्या या प्राणवायू वाहिनीच्या निविदा प्रक्रिया सुरू आहेत. दोन्ही डायलिसीस केंद्रांचे काम अंतिम टप्प्यात असून, पुढील तीन महिन्यांत दोन्ही केंद्रांचे काम पूर्ण करून ते कार्यान्वित करण्याचा महापालिकेचा मानस आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी दिली.

---

## रेल्वे पुलाच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षेचा प्रश्न

**। खांदेश्वर । प्रतिनिधी ।**

पनवेल रेल्वे स्थानकाच्या पूर्व भागात रेल्वे पुलाच्या बाजूला सध्या रेल्वे प्रशासनाकडून बांधकाम व दुरुस्तीचे काम सुरू आहे. कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने जाळ्या लावण्यात आल्या असल्या, तरी ही व्यवस्था पुरेशी नसल्याची भावना या पुलाचा वापर करणाऱ्या प्रवाशांकडून व्यक्त होत आहे. पनवेल रेल्वे स्थानकातून दररोज हजारो प्रवाशांची ये-जा होत असते. दिवसेंदिवस प्रवाशांची संख्या वाढत असताना पुलाच्या परिसरात सुरू असलेल्या कामामुळे सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

बांधकामाच्या ठिकाणी वापरण्यात येणारे साहित्य, लोखंडी वस्तू अथवा अन्य साहित्याचा एखादा घटक अचानक खाली पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या लावण्यात आलेल्या सुरक्षा जाळीवर असे साहित्य पडले, तरी त्याचा फटका खालील बाजूने ये-जा करणाऱ्या प्रवाशांना बसण्याची शक्यता आहे.

विशेषतः गर्दीच्या वेळेत पुलाखाली मोठ्या प्रमाणात प्रवाशांची वर्दळ असते. त्यामुळे केवळ जाळी लावण्याबरोबरच कामाच्या ठिकाणी अतिरिक्त सुरक्षा उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे.

काम सुरू असलेल्या परिसरात सुरक्षा कर्मचारी कायमस्वरूपी तैनात करावेत, तसेच प्रवाशांना धोकादायक भागापासून दूर ठेवण्यासाठी आवश्यक अडथळे उभारावेत, अशी मागणी होत आहे.

काम सुरू असताना बांधकाम साहित्य व्यवस्थित सुरक्षित ठेवले जात आहे का, सुरक्षा जाळ्यांची नियमित तपासणी केली जाते का, याकडेही रेल्वे प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेशी संबंधित बाब असल्याने कामाच्या ठिकाणी कोणतीही दुर्घटना घडण्याची वाट न पाहता रेल्वे प्रशासनाने तातडीने पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा प्रवासी वर्गातून व्यक्त होत आहे.

---

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २० ते २६ सप्टेंबर २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग

मोबा.९४०४७९१७९८

### उद्योग-व्यवसायात प्रगती कराल

**मेष :** मेषराशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता हे दिवस विद्यार्थ्यांसाठी चांगले असले तरी प्रवेश परीक्षा किंवा नेहमीच्या परिक्षां व्यतिरिक्त इतर अभ्यासक्रमात थोडी जास्त मेहनत करावी लागेल. नंतर आपणास अभ्यासात खूप मेहनत वाढवावी लागेल. तसेच आरोग्याची खूप काळजी घ्यावी लागेल, अन्यथा आजारपण बळावण्याची शक्यता आहे. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल, एखादी नवी ऑफर मिळेल कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. घरात धुसपूस होईल. थोरामोठ्यांच्या संपर्कात राहाल. उद्योग-व्यवसायात प्रगती कराल. मुलांकडे अधिक लक्ष द्या आपण एखाद्या अशा व्यक्तीप्रती आकर्षित व्हाल कि जी आपल्याहून वयाने अधिक मोठी किंवा लहान असेल. विवाहेच्छुकांना जोडीदाराची निवड विचारपूर्वक करावी लागेल. **महिलांना–** मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा. **शुभ दिनांक–** २०,२१.

### जिवलगाकडून भेटवस्तु मिळेल

**वृषभ** : वृषभराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आरोग्याच्या बाबतीत जे मागील काही दिवसांपासून आजारी होते त्यांना काहीसा दिलासा मिळेल. ज्यांना एलर्जी, त्वचा विकार संबंधित समस्या असतील त्यांना उत्तरार्धात दिलासा मिळू शकेल. जिद्द व आत्मविश्वासाने नियोजित कामे पार पाडा. सध्या मोठी गुंतवणूक टाळावीत. आरोगयाबाबत हलगर्जीपणा करू नका, जिवलगाकडून भेटवस्तु मिळेल. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे योग्य राहील. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा व नियमित व्यायाम करा. कोणाशीही नाराजी पत्करू नका हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. घरातल्यांची मर्जी राखता येईल. आर्थिक व्यवहारात मात्र गुंतून जाणार नाही याची दक्षता घ्या. घरात एखादे मंगल कार्य होणार आहे त्याची तयारी करावी लागेल. आपल्या परिश्रमाचे योग्य फळ मिळणार आहे. **महिलांना–** महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. **शुभ दिनांक–** २३,२४.

### आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा

**मिथुन** : मिथुनराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नवीन नोकरी असणाऱ्याना वातावरण चांगले भेटणार आहे. कुटुंबात एखाद्या चांगल्या कार्याचा योग आखला जाईल. जास्त तेलकट पदार्थ खाऊ नका त्रास होऊ शकतो. घरून काम करतानाही वरिष्ठांशी मिळतेजुळते धोरण स्वीकारा. आपल्या कामाचे बक्षीस बढतीच्या रूपात आपल्याला मिळणार आहे, कलेत मन रमवाल, योगाचा अवलंब करा, व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्नकरा. नको त्या अपेक्षा ठेऊ नका आपले काम भले आपण भले हे धोरण ठेवा, सामंजस्याने परिस्थिती हाताळा. मन लागले नाही तरी अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे, अशा परिस्थितीत अभ्यासा विषयी आपली दृढ इच्छाशक्तीच मदतरूप ठरेल. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. **महिलांना–** ह्या महिन्यात आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दहा दिवसात पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभ दिनांक–** २५,२६.

### एकाग्रता वाढवण्यासाठी ध्यान करा

**कर्क :** कर्कराशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागणे स्वीकारल्यास आपणास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. आर्थिक बाबतीत मात्र तज्ञांचा सल्ला घेऊनच व्यवहार करणे योग्य राहील. आप्तेष्ट, मित्रमंडळींशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरेल. मात्र आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कोणाशीही नाराजी पत्करू नका. मुलांकडे अधिक लक्ष दिल्यास उत्तम. त्यांच्या अध्ययनात आपले सहकार्य द्या. हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. अपेक्षित गोस्टी साध्य करता येईल. कामात उस्ताह राहील, गुरुची कृपा अनुभवण्यास मिळेल, मनातिल वाईट विचारांना दूर सारा. एकाग्रता वाढवण्यासाठी ध्यान करा. **महिलांना–** आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्बेतीकडे दुर्लक्ष करू नका, आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **शुभदिनांक–** २०,२६.

### प्रवासात सावधानता बाळगा

**सिंह** : सिंहराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नातलगात व मित्रमंडळींत उधार-उसनवारी टाळणे हितकारक राहू शकेल. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्च होणार नाही याची दक्षता बाळगा. व्यापारात प्रगती होण्यासाठी प्रसारमाध्यमांचा उपयोग केल्यास उत्तम. मुलांना प्रगती करता येणे शक्य होईल. प्रवासात मात्र सावधानता बाळगा, किमती वस्तु सांभाळणे गरजेचे राहील. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. महत्त्वाच्या वस्तू सांभाळा. आपल्या कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल आणि आपल्या ध्येयाजवळ जाता येणे शक्य होईल. व्यवसायाला चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. आप्तेष्ट, मित्रमंडळींच्या गाठीभेटीचे योग संभवतात. मुलांना अध्ययनात प्रगती करण्याची संधी मिळेल. **महिलांना–** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला त्यामुळे मनावर ताण येणार नाही आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल, **शुभ दिनांक–** २२,२४,

### हितशत्रूंवर नजर ठेवा

**कन्या :** कन्याराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण सर्व बाबतीत गोड बोलून आपले कार्य साध्य करण्याचे धोरण स्वीकारल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल, आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचा प्रयत्न केल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. एखादी नेतृत्वाची संधी मिळण्याची शक्यता आहे पण बडेजाव मात्र टाळा. काही महत्त्वाच्या गोष्टींबाबत मौन पाळणे अधिक लाभदायक ठरू शकते. शेतीविषयक व कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या, मित्रमंडळींच्या संपर्कात राहाल. आर्थिक व्यवहारात योग्य व्यक्तींचा सल्ला घ्या. हितशत्रूंवर नजर ठेवा. अचानक साहसी कृती आपल्याकडून होण्याची शक्यता आहे. आपली बलस्थाने कोणती यांचा मागोवा घ्या व भावी आयुष्याचा विचार करून वागा. सरकारी नियमांचे पालन करणे हिताचे राहील. सामाजिक कामाला प्राधान्य द्या त्याचे पडसाद आपल्यासाठी फायद्याचे असतील. नेहमी आशावादी राहण्याचा प्रयत्न करा. **महिलांना–** नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. **शुभदिनांक–** २१,२५.

### घरगुती वातावरण चांगले राहील

**तुळ** : तुळराशीसाठी या सप्ताहात सुरवातीला कानावर चांगली बातमी येईल मुलांचे प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः त्यांची खाण्याची पथ्ये सांभाळा व आपण कफ विकारांपासून सावध राहा. व्यापार-उद्योगाला चालना मिळेल. आपण सर्वांशी बोलताना शब्द जपून वापरल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळेल त्यांचा गोरव होण्याची शक्यता राहील. काही भाग्यवंतांना प्रसिद्धीचे वलय प्राप्त होण्याची शक्यता आहे. शेती व कोर्टकचेरीच्या कामांना गती मिळेल. घरगुती वातावरण चांगले राहील. सरकारी नियमांचे पालन करा. मुलांनी अध्ययनासाठी ज्येष्ठांच्या संपर्कात राहावे. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही. कोणालाही पैसे उधार देऊ नका. जामीन राहू नका. कामावर आपले काम हलके करण्यासाठी योग्य व्यक्तीची कामासाठी निवड करा व आपली जबाबदारी कमी करा. **महिलांना–** वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **शुभदिनांक–** २३,२६.

### प्रलोभनात अडकू नका

**वृश्चिक :** वृश्चिकराशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. शेतीविषयक कामांना प्राधान्य द्याल. वकिलांना हा काळ उत्तम राहील. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहावे, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळावीत व पोटाच्या विकाराबाबत सावध राहावे. प्रवासाचे योग संभवतात. आपल्या कार्यक्षेत्रात व कौटुंबिक जीवनात येणाऱ्या प्रसंगांना स्थितप्रज्ञेने उत्तरे देण्याचे धोरण स्वीकारल्यास हा आठवडा चांगला जाईल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. इतरांच्या बोलण्याने विचलित न होता त्यांना सामोरे जा. आपली शारीरिक प्रतिकारशक्ती वाढविण्याचा प्रयत्न करा. नको त्या प्रलोभनात अडकू नका. सरकारी नियमांना प्राधान्य द्या व ते पार पाडण्याचा प्रयत्न करा. आपण आपल्या कामावर एकाग्रता पाळून आपले नियोजित ध्येय गाठण्याचा प्रयत्न केल्यास यशाचा मार्ग सुकर होईल. **महिलांना–** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तींचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभदिनांक–** २०,२४.

### आर्थिक बाजू ठीक राहील

**धनु :** धनुराशीसाठी या सप्ताहात आपण आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा आपण आपल्या नोकरी-व्यवसायात चैतन्य आणण्यासाठी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या आशा-आकांक्षा पुऱ्या होऊ शकतील. गुरूकृपेचा लाभ मिळू शकेल व घेतलेल्या कामात सफलता मिळेल. वरिष्ठांशी जुळवून घेण्यासाठी प्रयत्नशील राहा. कौटुंबिक वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आर्थिक बाजू ठीक राहील. उधारी घेऊ नका देऊ नका. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपण सत्याच्या मार्गाचा अवलंब केल्यास व त्यानुसार कृती केल्यास आपला यशाचा मार्ग सुलभ होईल. कुटुंबातील आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आपण सकारात्मक दृष्टिकोनातून वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा आशा-अपेक्षा पुऱ्या होऊ शकतील. विद्यार्थीवर्गाने अध्ययनात परिश्रम वाढविल्यास अपेक्षित यश प्राप्त होऊ शकेल. **महिलांना–** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. **शुभ दिनांक –** २४,२६.

### वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा

**मकर** : हा साप्ताह मकरराशीसाठी आपले ग्रहमान पाहता आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगावी. गुंतवणूक करणे टाळावेत. राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या कामाचे योग्य नियोजन केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. कोर्टदरबारच्या कामांना गती मिळेल. शेतीविषयक कामांना चालना मिळेल. प्रकृतीबाबत अधिक चोखंदळ राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. प्रेमासंबंधी मंडळींना सबुरीचा सल्ला देण्यात येत आहे. संगणक व तांत्रिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनी यशाची अपेक्षा ठेवू शकतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. **महिलांना–** त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक–** २१,२५

### रागावर योग्य नियंत्रण ठेवा

**कुंभ** : कुंभराशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता व्यापार-उद्योगात प्रगती करता येईल. साहसी कृत्ये करण्याचे टाळावीत नाहीतर संकटात पडू शकता, मुलांकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आपण कोणतेही निर्णय घेण्याआधी त्याचा साधक-बाधक विचार करूनच अवलंब करणे हितकारक ठरू शकेल. कुठलीही गोष्ट ताणून घेऊ नका. नको त्या प्रलोभनात अडकू नका. हितशत्रूंना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. प्रकृतीबाबत अधिक निर्बंध पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा व्यापाराला चालना मिळेल. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल, शेतीत लाभ होईल आपल्या रागावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, जेणेकरून इतरांची नाराजी होणार नाही याकडे लक्ष द्या. कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. **महिलांना–** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. **शुभ दिनांक–** २४,२५.

### जोडीदाराकडे दुर्लक्ष करू नका

**मीन :** मीनराशीसाठी आपले ग्रहमान पाहता आपणास राजकारण, क्रीडा क्षेत्रांत प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. हितशत्रूंवर कडक नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. साहसी वृत्तीने वागणे टाळा. इतरांकडून मदतीची अपेक्षा न ठेवता स्वतः च्या कामात झोकून द्या. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल. आपण सर्वांशी प्रेमाने वागल्यास हीच मंडळी आपल्याला आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकतिल. काही घरगुती प्रश्न सोडविताना भावनिक बाजू बाजूला ठेवा. कामात वाढ झाल्याने आपण व्यस्त राहाल तरीही जोडीदाराकडे दुर्लक्ष करू नका. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. हाती घेतलेली कामे पार पाडू शकाल. कलाकार मंडळीना कलाक्षेत्रात उत्तम प्रतिसाद मिळेल, आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचे धोरण अवलंबिल्यास पुष्कळशा गोष्टी सफल होऊ शकतात. व्यापारात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. **महिलांना–** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकिट भरलेले राहील. **शुभ दिनांक –** २०,२४.

# रेशनकार्ड डिजिटलायझेशनच्या नावाखाली पनवेलमध्ये मनस्ताप!

■ दररोज केवळ ५० अर्जांची कॅप; तासन्तास रांगेत उभे राहूनही नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागण्याची वेळ

**| पनवेल | वार्ताहर |**

रेशनकार्ड डिजिटलायझेशनच्या कामासाठी पनवेल तहसील कार्यालयात नागरिकांची मोठी गर्दी होत असताना, अपुरे मनुष्यबळ, मर्यादित अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था आणि स्पष्ट मार्गदर्शनाचा अभाव यामुळे नागरिकांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. पूर्वी दररोज १०० ते १२५ अर्ज स्वीकारले जात असताना आता अचानक केवळ ५० अर्ज स्वीकारले जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

कार्यालयात वेळेवर पोहोचूनही ५० अर्जांची मर्यादा पूर्ण झाल्याने अनेक नागरिकांना पुढील दिवसाची वाट पाहावी लागत आहे. तासनतास रांगेत उभे राहूनही काम होईल की नाही, याची शाश्वती नसल्याने नागरिकांच्या अडचणीत भर पडली आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना वारंवार तहसील कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याने त्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

**अतिरिक्त काऊंटर आणि मनुष्यबळाची मागणी**

पनवेल शहरासह तालुक्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता रेशनकार्ड डिजिटलायझेशनसारख्या महत्त्वाच्या कामासाठी सध्याची व्यवस्था अपुरी पडत असल्याचे चित्र आहे. मर्यादित कर्मचारी आणि अपुऱ्या सुविधांमुळे अर्जदारांची गर्दी वाढत असून, कामाचा निपटारा होण्यास विलंब होत आहे.

नागरिकांचा वेळ आणि श्रम वाचवण्यासाठी तहसील प्रशासनाने अतिरिक्त काउंटर सुरू करावेत, मनुष्यबळ वाढवावे, अर्ज स्वीकारण्याची दैनंदिन मर्यादा वाढवावी तसेच स्वतंत्र माहिती कक्ष उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. रेशनकार्ड डिजिटलायझेशनची प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

### डिजिटलायझेशन झाले, पण रेशनकार्ड कुठे?

डिजिटलायझेशनच्या प्रक्रियेत नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात वैयक्तिक माहिती घेतली जात असली तरी प्रत्यक्ष डिजिटल अथवा स्मार्ट रेशनकार्ड कधी मिळणार, याबाबत स्पष्ट माहिती दिली जात नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. काही नागरिकांना रेशन दुकानदाराकडून स्वतःच्या खर्चाने कागदपत्रांची किंवा रेशनकार्डाची प्रिंट काढून घेण्यास सांगितले जात असल्याचेही सांगण्यात येत आहे. संपूर्ण माहिती घेऊनही प्रत्यक्ष डिजिटल रेशनकार्ड मिळणार नसेल, तर हे कसले डिजिटलायझेशन? आणि प्रत्येक वेळी प्रिंटसाठी नागरिकांनीच पैसे का खर्च करायचे? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### १२ अंकी क्रमांकासाठीही प्रतीक्षा

रेशनकार्ड डिजिटलायझेशन प्रक्रियेत नागरिकांचे फोटो, आधारकार्ड, पॅनकार्ड तसेच संपूर्ण कुटुंबाची माहिती संगणक प्रणालीमध्ये घेतली जात आहे. मात्र, अर्ज प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर १२ अंकी डिजिटल क्रमांक मिळण्यासाठीही महिनाभरापेक्षा अधिक काळ प्रतीक्षा करावी लागत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत.साधी माहिती मिळविण्यासाठी किंवा डिजिटल क्रमांकाबाबत चौकशी करण्यासाठी स्वतंत्र काउंटर नसल्याने नागरिकांची अधिकच गैरसोय होत आहे. त्यामुळे एका कामासाठी वारंवार कार्यालयात चकरा माराव्या लागत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा
निविदा सूचना
कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-टेंडरिंगद्वारे दोन पाकीट प्रणालीमध्ये खुली निविदा आमंत्रित करीत आहे. **कामाचे नावः** रत्नागिरी रेल्वे स्थानकाजवळ सर्क्युलेटिंग एरियाचा संमिश्र विकास, त्यामध्ये पक्क्या ॲप्रोच रोडचा समावेश, प्रशासकीय इमारत व इतर इमारतींचे बांधकाम. **निविदा सूचना क्र.: के आर/डब्ल्यू/09/2026/09. कामाची जाहिरातीत दर्शविलेली किंमतः 10,97,14,184.57 (जीएसटी वगळून). अंतिम दिनांक/वेळ:** ऑनलाइन ऑफर्स/बिड्स सादर करण्यासाठी 19.10.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 18 (अठरा) महिने. हस्तलिखित ऑफर्स स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. शुद्धिपत्रक /अतिरिक्त सूचना) केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या जातील.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, श्री सुनिल कानू कथारे रा. वारदोली, चिखळे ता. पनवेल जिल्हा रायगड ४१०२०६ यांनी खालील वर्णनाची शेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री.नंदकुमार कृष्णराव फुटाणे रा. फुटाणे निवास, ठाकुरपाडा मुंबई पुणे रोड मुंब्रा ठाणे ४००६१२ यांस कडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे
मिळकतीचे वर्णन

**मौजे मानकिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं | क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी) शेती | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ११ | ३ | ०-४४-५०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकुण ०-४६-०० | ६.४४ |

सदरची मिळकत हि वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील तद्ंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिल विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा करारनामा, ताबाकब्जा, गहाण दान, बक्षीस वगैरे अथवा अन्य इतर कोणतेही प्रकारचा कायदेशिर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल खरेदीखत पुर्ण करतील मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.
कळावे

दिनांक : २०/०९/२०२६

अशिलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. हिरामण जनार्दन गायकवाड**
ऑफीस पत्ता गाळा नं १, गणेश अर्पा.
युको बँक शेजारी कर्जत ता. कर्जत जि. रायगड
८९७६३७५५७०

## जाहीर नोटीस

दिनांक १९/९/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे-वाफेघर ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-वाफेघर ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| रमेश नामदेव कांबळे व ३ | ४४/३ | ०-३७-४० | ४-४१ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून संबंधित तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत १४ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशिल सदरच्या खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पनवेल
दिनांक १९/९/२०२६

सही/-
**श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर**
ॲडव्होकेट
मु.पो.नवीन पनवेल ता. पनवेल
जि. रायगड मो.बा.नं. ८१४९६५१५०८

# गणेशोत्सवात राडारोड्यावर कारवाई

**| पनवेल | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवाच्या काळात शासकीय यंत्रणा उत्सवाच्या बंदोबस्तात व्यस्त असल्याचा फायदा घेऊन मुंबई व ठाणे उपनगरातून अवैध राडारोड्याची नवी मुंबईत वाहतूक करणाऱ्यांवर सिडको आणि नवी मुंबई पोलिसांनी कारवाई सुरूच ठेवली आहे. रात्री आणि पहाटेच्या वेळेत करण्यात आलेल्या संयुक्त कारवाईत बुधवारी विविध पोलीस ठाण्यांत चार गुन्हे दाखल करण्यात आले असून, सहा वाहनचालकांविरोधात कारवाई करण्यात आली आहे.

मंगळवारी (दि. १५) मध्यरात्री १२ वाजता वाशी टोलनाका येथे मुंबईहून राडारोडा घेऊन आलेला डंपर क्रमांक एमएच ४७ बीएल ९३४७ अडविण्यात आला. डंपरमध्ये राडारोडा भरलेला होता. चालक श्रीवकुमार गुप्ता याला ताब्यात घेऊन त्याच्याविरोधात वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बुधवारी पहाटे पावणेदोनच्या सुमारास सिडकोच्या सहाय्यक कार्यकारी अभियंत्यांनी दिलेल्या तक्रारीवरून अवैध राडारोड्याची वाहतूक करणाऱ्या २३ वर्षीय मोहम्मद असरफ याच्याविरोधात रबाळे पोलिसांनी कारवाई केली.

त्यानंतर बुधवारी पहाटे पावणेचारच्या सुमारास खारघर सेक्टर ३९ परिसरात तीन डंपर संशयितरीत्या उभे असल्याचे आढळून आले. सिडकोच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीत या डंपरमध्ये राडारोडा भरलेला असल्याचे आढळले. एमएच ४६ बीयू ०५००, एमएच ४६ सीएल ९८७० आणि एमएच ४३ बीएक्स ६३६१ या डंपरच्या चालकांकडे राडारोडा चालक आबेद शेख, जब्बार शेख आणि दुर्गेश यादव यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात बीएनएस २७१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. बुधवारी दुपारी सव्वाबारा वाजता करंजाडे येथील सेक्टर २ ए, भूखंड क्रमांक ८६ येथे एमएच ४३ यू १३३९ क्रमांकाच्या ट्रकवरही पनवेल पोलिसांनी कारवाई केली. चालक बसवराज राठोड याला अवैध राडारोड्यासह पोलिसांनी ताब्यात घेतले. गणेशोत्सवाच्या बंदोबस्तासोबतच राडारोडा वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी सिडको आणि पोलिसांकडून रात्रीच्या वेळीही कारवाई सुरू आहे.

# महामार्गावर अंधार कायम

### पावसाळ्यात अपघात वाढण्याची शक्यता

**| उरण | प्रतिनिधी |**

जेएनपीए बंदर व उरणला जोडणाऱ्या जेएनपीटी ते पळस्पे व जेएनपीए तर आम्र मार्ग(नवी मुंबई) या दोन्ही महामार्गावरील अनेक ठिकाणीचे पथदिवे बंद असल्याने महामार्गावर अंधार पसरला आहे. या अंधाऱ्या मार्गातूनच बंदरातील हजारो अवजड वाहने मार्ग काढून वाहतूक करीत आहेत. त्यातच काही दिवसांवर पाऊस आला असून पावसामुळे महामार्गावर अपघात होण्याचीही शक्यता वाढली आहे.

जेएनपीटी ते पळस्पे या मार्गावरील द्रोणागिरी ते धुतुम, करळ, जासई उड्डाणपूल, गव्हाण फाटा आदी परिसरातील पथदिवे बंद आहेत. याच मार्गावरील सेवा तसेच मुख्य मार्गावर ही शेकडोंच्या संख्येने जड कंटेनर वाहने उभी केली जात आहेत. या मार्गावर उभ्या करण्यात आलेल्या वाहनांना धोक्याचा इशारा देणारी कोणत्याही प्रकारची साधने नसल्याने अंधारात भीषण अपघात होऊ नये यासाठी महामार्ग प्राधिकरण यांनी उपाययोजना करण्याची ही मागणी केली जात आहे.

राष्ट्रीय महामार्ग असल्याने या मार्गावरून वेगाने धावणाऱ्या जड व प्रवासी वाहनांमुळे अपघाताची शक्यता वाढली आहे. त्यामुळे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण( एन एच आय)ने येथील पथदिवे दुरुस्त करण्याची मागणी वाहन चालक व नागरिक करीत आहेत. उरण ते नवी मुंबई तसेच पनवेल व पुणे या मुख्य शहराना जोडणाऱ्या या महामार्गाच्या उभारणीमुळे येथील प्रवास सुखकर झाला आहे. अगदी काही काळासाठी होणाऱ्या वाहतूक कोंडीची समस्या वगळता अगदी वेगवान प्रवास करता येत आहे.
त्यामुळे या मार्गावरील वाहनांचा वेग अधिकचा असतो. या वेगामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. यात दुचाकी स्वरांचे अपघात वाढले आहेत. काही दिवसांपूर्वी याच मार्गावर अपघात झाले आहेत. तर अनेक ठिकाणी चिखल व खड्डेही आहेत. त्यामुळे ही अपघात वाढले आहेत.

# पावसाच्या परतीच्या संकेताने भातशेती संकटात

## पाण्याचा तुटवडा; रोपं पिवळी पडली, उत्पादनावर परिणाम शक्य

**| रायगड | प्रतिनिधी |**



प्रशांत महासागरातील अलनिनोच्या प्रभावामुळे यंदा पावसाचे प्रमाण असमान राहिल्याने रायगड जिल्ह्यासह संपूर्ण कोकणातील भात उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. हवामानखात्याने १९ सप्टेंबरपासून नैऋत्य मोसमी पावसाच्या परतीचा प्रवास सुरू होणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. उशिरा झालेल्या लावण्यांमुळे आणि भातपीक पूर्णपणे पसवण्यापूर्वीच दाणे भरणे किंवा फुलोरा येण्यापूर्वीच पाऊस गायब होण्याचे संकेत असल्याने जिल्ह्यातील विशेषतः निमगरव्या आणि गरव्या भातशेतीचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जिल्ह्यात हे क्षेत्र ६० टक्क्यांहून अधिक आहे.

सद्यःस्थितीत बहुतांश भागात वेळेत लागवड केलेल्या हळव्या जातींच्या व इतर वाणाच्या लोंबी भरल्या असून, त्या १५ ऑक्टोबरपर्यंत काढणीला येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या जातींवर पावसाच्या ताणाचा फारसा परिणाम होणार नाही; मात्र, उशिरा लागवड केलेल्या हळव्या जातींना फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. जूनच्या सुरुवातीला साधारण ८ तारखेच्या आसपास पेरणी झालेली १० ते १२ टक्के हळवी भातपिके सध्या परिपक्व किंवा कापणीच्या टप्प्यात असून, ती या पावसाच्या खंडावर मात करून सुरक्षित राहिली आहेत; मात्र, जिल्ह्यातील ६० टक्क्यांहून अधिक भाग व्यापणाऱ्या निमगरव्या व गरव्या जातींवर पावसाच्या तुटवड्याचा मोठा ताण येत आहे. मॉन्सून उशिरा सक्रिय झाल्याने दरवर्षीच्या तुलनेत लावण्या १५ ते २० दिवस उशिरा झाल्या. परिणामी, भातपीक पसवण्याचा कालावधी पुढे सरकला असून, याच नाजूक टप्प्यावर पाऊस लांबल्याने पिकाचे प्रचंड नुकसान होण्याची शक्यता आहे. सखल भागातील शेतीची स्थिती काहीशी स्थिर असली तरी वरकस किंवा उंच भागातील भातखाचरांमध्ये पाण्याचा तीव्र तुटवडा जाणवत आहे. जमिनीला भेगा पडण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

दरम्यान, सध्या गणेशोत्सव सुरू असून, गौरी आगमनाच्या पूर्वसंध्येला काही भागात पावसाचे आगमन झाले होते; जिथे पाऊस पडलेला आहे अशा महसुली मंडळातील भातशेतीला संजीवनी मिळेल; परंतु पावसावर अवलंबून असलेली वरकस जमिनीवरील भातशेती संकटात सापडू शकते.

> गेल्या काही दिवसांपासून पावसाने मारलेल्या ओढ्यामुळे भातशेती अडचणीत आली आहे. पावसाने ऐन गरजेवेळी पाठ फिरवल्यामुळे मुख्यत्वे महान (उशिरा येणारी) भातपिके सुकू लागली आहेत. पाणी न मिळाल्याने भाताची शेती पिवळी पडली असून, यावर्षी भात उत्पादनात घट निश्चित आहे. सध्या हळवी भातपिके पसवणीच्या (फळधारणेच्या) टप्प्यात असून त्यांना सध्या तरी फारसा फटका बसलेला नाही.
> -गुरूनाथ घाग, शेतकरी, रामराज

# तरुणांकडून रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

शहरातील हनुमाननगर येथील सार्वजनिक गणेशोत्सव काळात हनुमाननगर मित्र मंडळातर्फे तरुणांकडून रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यावेळी पहिल्यांदाच रक्तदान करणाऱ्या तरुणांमध्ये रक्त दानाच्या अनुभवाबद्दल प्रचंड उत्सुकता दिसून आली. यावेळी सुजय प्रतिष्ठान पुणेचे सुरेश सकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.



यावेळी आपली माती आपली माणसं सामाजिक संघटना पोलादपूर संस्थापक राज पार्टे, ग्रामीण अध्यक्ष हरि पवार, नगरसेवक स्वप्नील भुवड तसेच पोलादपूर सार्वजनिक गणपती उत्सव मंडळाचे अध्यक्ष अमर नगरकर, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष अमित वाडकर यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी शंभरहून अधिकवेळा रक्तदान करणारे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश उपाध्यक्ष पोलादपूर तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व रक्तदान प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी हनुमाननगर मित्र मंडळाचे अध्यक्ष अरुण मोहिते, उपाध्यक्ष अतुल पवार, सचिव निहाल पवार, कार्याध्यक्ष साजन पवार यांनी रक्तदान शिबीर व गणेशोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न केले.

वाचकांसाठी निवेदन
कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.
- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# आंबा निर्यातीला मिळणार चालना

■ **लोकप्रतिनिधींच्या मंडळाची वाशी केंद्राला भेट**

**| गुहागर | प्रतिनिधी |**

आंबा उत्पादक शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ मिळवून देणे आणि आंबा निर्यातीच्या प्रक्रियेची सविस्तर माहिती जाणून घेणे, या उद्देशाने जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या मंडळाने वाशी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत असलेल्या आंबा निर्यात केंद्राला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी निर्यातीच्या विविध टप्प्यांची पाहणी करून संबंधित अधिकारी व तज्ज्ञांशी चर्चा केली.

जिल्हा परिषदेचे कृषी सभापती महेश नाटेकर, गुहागर पंचायत समिती सभापती प्रणव पोळेकर, प्रवीण पांचाळ, राजापूर पंचायत समिती सभापती नंदिनी कदम, संगमेश्वर पंचायत समिती सभापती शर्वरी वेळ्ळे, चिपळूण पंचायत समिती सभापती सूर्यकांत खेतले, दापोलीचे कृषी सभापती उन्मेश राजे, जिल्हा परिषद सदस्य प्रमोद निवळकर, कृषी अधिकारी अभिजित गडदे यांच्यासह जिल्ह्यातील शेतकरी प्रतिनिधी या अभ्यास दौऱ्यात उपस्थित होते. या वेळी पदाधिकाऱ्यांनी आंब्याची प्रतवारी, स्वच्छता, पॅकिंग आणि साठवणूक या प्रक्रियांची प्रत्यक्ष पाहणी केली. परदेशात आंबा पाठवण्यापूर्वी त्यावर केली जाणारी व्हेपर हिट ट्रीटमेंट आणि इरॅडिएशन या तांत्रिक प्रक्रियेची माहिती तज्ज्ञांकडून घेतली. तसेच, निर्यात केंद्राचे व्यवस्थापक अनिमेष पाटील व त्यांच्या पथकासोबत आयोजित बैठकीत युरोप व आखाती देशांतील आंब्याची मागणी, निर्यातीचे निकष आणि शेतकरीबंधूंना थेट परदेशी बाजारपेठ मिळवून देण्याबाबत सविस्तर मंथन झाले.

> वाशी येथील निर्यात केंद्राची कार्यप्रणाली अत्यंत अद्ययावत आहे. येथील अभ्यासाच्या आधारे रत्नागिरी जिल्ह्यातील आंबा उत्पादकांसाठी 'मँगोनेट' नोंदणी वाढवण्यासाठी लवकरच विशेष मार्गदर्शन मोहीम राबवली जाईल. शेतकऱ्यांनी निर्यातक्षम उत्पादनावर भर दिल्यास त्यांच्या उत्पन्नात लोठी वाढ होईल.
> - महेश नाटेकर,
> कृषी सभापती, जिल्हा परिषद

# समुद्र किनारे सुंदर,स्वच्छ ठेवणे ही सामुहिक जबाबदारी

## भारतीय तटरक्षक दलाचे कमांडंट जयदीप पॉल यांचे प्रतिपादन

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**



प्रत्येक नागरिकाने सामाजिक बांधलकीतुन व्यक्तिगत संकल्पाबरोबर पर्यावरण समृद्ध करण्यासाठी सामाजिक संकल्प करावा. समुद्रकिनारे सुंदर व स्वच्छ ठेवणे ही सामुहिक जबाबदारी असून जनजागृतीतूनच लोक जागृती होते. अशा जनजागृतीतूनच पर्यावरणाचा समतोल राखणे शक्य असल्याचे प्रतिपादन भारतीय तटरक्षक दलाचे कमांडंट जयदीप पॉल यांनी केले .

भारतीय तटरक्षक दल केंद्र, जेएसडब्ल्यू आणि इनकोईस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय स्वच्छता दिनी आयोजित कार्यक्रमात स्वच्छता दूतांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर कमांडंट जयदीप पॉल, मुरूड नायब तहसीलदार कल्याण देऊळगावकर, कॅप्टन देवेंद्र राणे, डॉ. लक्ष्मीकांत ढगे, डॉ. बी.जी. बावरे, डॉ. ऋतुज माळी, सहायक पोलीस निरीक्षक तौसिक सैय्यद, प्रा. मेघराज जाधव, कमांडिंग अधिकारी चैतन्य जोगदंड, अभिषेक करुणाकरण आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात चैतन्य जोगदंड यांनी स्वच्छ सागर, सुरक्षित किनारा हीच आमची ओळख या घोषवाक्याला अनुसरून मुरुड समुद्रकिनारपट्टीवरील स्वच्छता मोहीम असुन सागरी परिसंस्थेचे रक्षण करणे आणि किनारपट्टी स्वच्छ राखण्याबाबत लोकजागृती निर्माण करणे. हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश असल्याचे स्पष्ट केले. डॉ .बावरे यांनी मुरुडचा समुद्र किनारा सुंदर आहे. त्यामध्ये प्लास्टिक कचरा टाकू नये. पर्यावरण समतोल राखला तर पर्यटन व्यवसाय आणखी वाढेल, असा निर्वाळा देत किनारा स्वच्छतेसाठी उपस्थितांना शपथ दिली.प्रतिवर्षाप्रमाणे तटरक्षकदलांच्या जवानांसह सर एस.ए ज्युनियर कॉलेज, अंजुमन इस्लाम हायस्कूल, अंजुमन डीग्री कॉलेज, पोर्ट, मेरीटाईम बोर्ड, इनकोईस, मच्छिमार संस्थांचे सदस्य, पोलीस दल, मुरूड नगरपरिषद कर्मचारी आदींनी संपूर्ण किनारपट्टीवरील कचरा, प्लास्टिक तसेच किनाऱ्यावर वाहून आलेला कचरा गोळा केला. तटरक्षक दलातर्फे टीशर्ट, कॅप व हँडग्लोज स्वच्छता मोहिमेत सहभागी स्वयंसेवकांना देण्यात आल्या होत्या.

स्वच्छता दूतांनी दोन तास साफसफाई करून सुमारे साडेपाच टन ओला, सुका कचरा संकलित करून अत्यंत शिस्तबद्ध स्वच्छता दूत बनून अनुशासनाचा परिचय दिला. डेप्युटी कमांडंट अभिषेक करुणाकरण यांनी आभार प्रदर्शन करताना समुद्राला डम्पिंग ग्राउंड करू नका, असे आवाहन करून आपण केवळ कचरा संकलीत करत नसून स्वच्छतेचा संदेश नागरिकांमध्ये पोहोचवत असल्याचे सांगितले.

# कळंबोलीत पहाटे उग्र दुर्गंधी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

कळंबोली कातकरवाडी आणि फूडलँडच्या मागील भागात पहाटेच्या वेळी उग्र दुर्गंधी येत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. टँकरमधून खराब किंवा रसायनमिश्रित पाणी कासाडी नदी परिसरात सोडले जात असल्याचा संशय व्यक्त होत आहे. या प्रकाराची तातडीने चौकशी करावी, अशी मागणी राजेंद्र शर्मा यांनी कळंबोली पोलीस आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली. १५ सप्टेंबर रोजी सकाळी साडेपाचच्या सुमारास फूडलँड परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी जाणवली. या भागात सुमारे ६० ते ८० कुटुंबे असून १२५ ते १५० नागरिक राहतात. त्यामुळे पहाटेच्या वेळी या परिसरात येणाऱ्या टँकरची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पहाटेच्या वेळी दुर्गंधी येत असल्याच्या तक्रारी गंभीर आहेत. कासाडी नदीत टँकरमधून काही सोडले जात आहे का, याची तातडीने तपासणी करावी. दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी शर्मा यांनी केली.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी
• विधवा महिला पाहिजे-उंच असलेली, वय-३६ ते ४६ वर्षे, रंग-गोरा, सुंदर, शिक्षण-किमान १० वी पास, स्वयंपाक येणारी, जातीची अट नाही-पुरूष-वय ५२ वर्ष MNC रिटायर्ड उत्पन्न ७५००० महिना मो. ९८९२७१३०८०
• मुंबईतील नामांकित कंपनीच्या नागाव गेस्ट हाऊसमध्ये कर्मचारी हवेत. मॅनेजर केअरटेकर कूक माळी मदतनीस ड्रायव्हर गार्ड राहण्या-खाण्याची सोय माहितीसह संपर्क करा. व्हाट्सअप- ८१६९५८४०७२.
• TANNA FINSERV शॉप नं. १, शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियन वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड, ऑफिस स्टाफची आवश्यकता, शेअर मार्केटसाठी Bolt Operator आवश्यक, Tanna Finserv मध्ये करिअरची उत्तम संधी! संपर्कः ९९२३७५०५४९/९१०५७१७०३८. इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा. अनुभवी व नवोदित उमेदवारांचे स्वागत आहे.
जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## राशीभविष्य

- **मेष** : सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. हितसंबंधांबाबत काळजी घ्या. कार्याला नवी दिशा मिळू शकेल.
- **वृषभ** : कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. मनावरचा ताण हलका होईल. कलाकारांचा उत्साह वाढेल.
- **मिथुन** : जुनी येणी वसूल होतील. व्यवसायात नव्या वाटा शोधल्या जातील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कर्क** : आवाका पाहून जबाबदाऱ्या घ्याव्या. सरकारी कामं मनाजोगी होतील. व्यवसायात दिलासा मिळेल.
- **सिंह** : कौटुंबिक वाद-विवाद संभवतात. प्रलंबित कामं मार्गी लागतील. अनावश्यक खर्च टाळायला हवा.
- **कन्या** : साऱ्या गोष्टी मनाजोग्या घडतील. आर्थिक व्यवहारात लाभ होईल. मुलांना स्पर्धांमध्ये यश मिळेल.
- **तूळ** : कार्यविस्तारावर भर राहील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. शिक्षण, स्थापत्य क्षेत्रात संधी लाभतील.
- **वृश्चिक** : गुंतवणुकीचा विचार लाभदायक ठरेल. व्यवसायात उत्कर्षाच्या संधी लाभतील. बाकी चिंता नको.
- **धनु** : सरकारी कामं विलंबानं होतील. स्थावर प्रश्नात समाधान लाभेल. ज्येष्ठांच्या प्रकृती सांभाळावी.
- **मकर** : अपेक्षित घटना मनाप्रमाणे घडतील. नव्या कामांना गती येईल. दुरदृष्टीनं धोरणं आखायला हवी.
- **कुंभ** : बोलण्यातून गैरसमज संभवतात. व्यवसायात अचानक अडचणी येतील. नातलगांच्या भेटी होतील.
- **मीन** : महत्त्वाचे करार तुर्तास नको. यंत्र, वाहनांबाबत काळजी घ्यावी. पित्ताचे विकार त्रासदायक ठरतील.

## २० सप्टेंबर
दिन विशेष

- १८९७ : ज्येष्ठ मराठी पत्रकार नानासाहेब परुळेकर यांचा जन्म.
- १९३३ : ब्रिटीश, भारतीय समाजसुधारक ॲनी बेझंट यांचा मृत्यू.
- २००४ : एज्युसॅट या उपग्रहाचं श्रीहरिकोटा येथील तळावरुन यशस्वी प्रक्षेपण.
- २०१३ : सणासुदीच्या तोंडावर मंत्रिमंडळाने केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्यात दहा टक्क्यांनी वाढ केली.
- २०१७ : मेक्सिको सिटीला भूकंपाचा तीव्र धक्का बसला. २४८ जणांचा मृत्यू.

आरोग्यमंत्र

## ओळखा हा धोका

अलीकडे ॲंटिबायोटिक्सचा वापर वाढला आहे. मात्र आता याचे दुष्परिणामही मोठ्या प्रमाणात समोर येऊ लागले आहेत. त्यामुळेच ॲंटिबायोटिक्स शक्य तितकी टाळून अतीव गरज असेल तेव्हाच तज्ज्ञांनी ती लिहून द्यावीत यावर एकमत होऊ लागलं आहे. जगभरातील अनेक मूत्रविकारतज्ज्ञांनी याविषयी सावधगिरीचा सल्ला दिला आहे. भारतातही मूत्रविकाराने ग्रस्त रुग्णांचं प्रमाण वाढत असून त्यांच्यावर केलेल्या ॲंटिबायोटिक्सच्या प्रयोगाला काही बॅक्टेरिया दाद देत नसल्यानं मूत्रपिंडाच्या आजारांनी मरण पावणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत चालल्याचं दिसून आलं आहे.



मूत्रमार्गाचा संसर्ग हा कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब यापाठोपाठ अनेकांना ताब्यात घेणारा आजार बनत असून हा बॅक्टेरियाजन्य आजार अनेकांच्या जिवावर बेतू पहात आहे. यावर रुग्णांना इंजेक्शन द्यावीच लागत असल्याचं मूत्रविकारतज्ज्ञांच्या निरीक्षणातून समोर आलं आहे. मात्र ॲंटिबायोटिक्सच्या चुकीच्या उपचारांमुळे आणि काही वेळा बॅक्टेरियांमधील वाढत्या प्रतिरोधक शक्तीमुळे इंजेक्शनचाही उपयोग होत नसल्याचं दिसून येतं. अशा परिस्थितीत मूत्रमार्गाचा संसर्ग मूत्रपिंडांपर्यंत पोहोचून त्यासंबंधीचे त्रासदायक आजार जडण्याची शक्यता बळावलेल्या रुग्णांचं प्रमाण कमी करणं हे जगभरच्या डॉक्टरांसमोरचं मोठं आव्हान आहे. त्यामुळे रुग्णांनीही ॲंटिबायोटिक्सचा आग्रह सोडायला हवा.

भटकंती

## अनुभवा जंगल सफारीचं थ्रिल

छोट्या दोस्तांनो, काही वेगळं करण्याचा विचार असेल तर जंगलसफारीला जा. प्राण्यांच्या दुनियेची सफर करा. जंगलात फिरायला जायचं तर काही गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं. काही नियमांचं पालन करायला हवं.

✻ जंगलात फिरायला गेल्यावर आरडाओरडा करू नका. यामुळे प्राणी घाबरतात, लपून बसतात. त्यामुळे फिरताना शांतता राखा. ✻ जंगलात फिरायला जाताना कपड्यांकडे लक्ष द्या. गडद रंगाचे कपडे घालणं टाळा. निसर्गाशी साधर्म्य साधणाऱ्या रंगांचे कपडे घाला. ✻ जंगलात फिरताना गाडीतून अजिबात उतरू नका. हात बाहेर काढू नका. कोणत्याही प्राण्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करू नका. ✻ जंगलात कचरा करू नका. प्लास्टिक पिशव्या, बाटल्या फेकू नका. ✻ प्राण्यांची वास घेण्याची क्षमता माणसांपेक्षा जास्त असते. त्यामुळे फार परफ्युम लावू नका. ✻ फोटो काढताना फ्लॅशचा वापर करू नका. फ्लॅशमुळे प्राण्यांना त्रास होऊ शकतो. ✻ जंगलात गेल्यावर प्राण्यांना त्रास देऊ नका. तुम्ही त्यांच्या राज्यात आला आहात हे लक्षात ठेवा.

ब्युटी टॉक

## कधी करावा मेक ओव्हर?

लांब, काळे आणि घनदाट केस हे प्रत्येक महिलेचं स्वप्नं असतं. पण सध्याच्या धकाधकीच्या काळात केसांची म्हणावी तितकी निगा राखता येत नाही. मग केस गळू लागतात. पांढरे होतात. अशा वेळी केसांचा मेक ओव्हर करायला हवा. कधी करता येईल केसांचा मेक ओव्हर? जाणून घेऊ.

✻ बदलत्या काळानुसार स्वत:लाच नाही तर हेअरस्टाईलही बदलणं गरजेचं आहे. बऱ्याच महिला एकाच प्रकारची हेअर स्टाईल करतात. वर्षांनुवर्षं एकाच लूकमध्ये दिसतात. हेअरस्टाईल हीच तुमची ओळख बनून जाते. अशावेळी केसांचा मेक ओव्हर करून घ्यायला हवा. वेगळी स्टाईल करून बघायला हवी.

✻ केस पांढरे होत असतील तर थांबू नका. तज्ज्ञांच्या सल्ल्याने चांगला डाय किंवा हेअर कलर लावायला सुरूवात करा. **(क्रमश:)**

## पंचांग

**रविवार, २० सप्टेंबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, भाद्रपद शु. ९, चंद्रराशी : धनु, नक्षत्र : पूर्वाषाढा, योग : सौभाग्य, सूर्योदय ६.२९, सूर्यास्त ६.३५

## फॉरवर्ड्स

**मत क़िया क़र इतनी उम्मीदें ऐ दिल...**

**हर क़िसी क़ी अपनीं एक़ अलग़ दुनियाँ हैं...!**

## वेगळ्या वाटा

डिझायनिंगच्या क्षेत्रात कल्पकतेला फार महत्त्व आहे. तुम्ही फॅशन डिझायनर असा किंवा इंटिरिअर डिझायनर किंवा मग ग्राफिक, प्रोडक्ट डिझायनर.. डिझायनिंग म्हटलं की त्यात वैविध्य असायला हवं.

✻ कल्पकता हा डिझायनिंगचा गाभा आहे. कल्पकतेच्या बळावरच तुम्ही तुमचे विचार प्रभावीपणे सादर मांडू शकता.

✻ डिझायनर्सनी सतत निरिक्षण करत रहायला हवं. एखादी छोटीशी गोष्टही त्यांना नवी कल्पना देऊ शकते. आसपासचं वातावरण, निसर्ग, पशूपक्षी यांच्याकडून त्यांना बरंच काही शिकता येईल. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## खरी माहिती लपवू नका

नोकरी मिळवण्यासाठी केल्या जाणाऱ्या अर्जांमध्ये काही उमेदवार जादा माहिती देतात तर काही उमेदवार माहिती लपवतात. संबंधित पदासाठी आलेल्या हजारो, लाखो अर्जांमधून काही निवडक लोकांची निवड करताना कंपनीकडून अशा चुकीच्या वा अपुऱ्या माहितीकडे दुर्लक्ष होतं. मात्र कामाच्या ओघात सत्य उघड होतं. या संदर्भात अभ्यास केल्यानंतर आढळलं की, सर्वसाधारणपणे असे उमेदवार पूर्वीच्या नोकरीसंबंधी चुकीची माहिती देतात. एवढंच नाही तर अर्जावर चुकीचा पत्ता लिहिणारे उमेदवारही आढळले आहेत. अलिकडच्या काळात बड्या कंपन्यांमध्ये संदर्भ मागितला जातो. परंतु यातही काही उमेदवार संदर्भ म्हणून कोणाचंही नाव लिहितात. चौकशी केली असता ही मंडळी सदर उमेदवाराला ओळखत नसल्याचं आढळतं. असे उमेदवार कोणत्या गोष्टी खोट्या सांगतात याचा छडा लावला असता असं दिसून आलं की, चार टक्के उमेदवार पूर्वीचा अनुभव म्हणून भलत्याच कंपनीचं नाव सांगतात. काही उमेदवार नोकरीचं खोटे रेकॉर्ड तयार करतात तर काही कंपनीचं नाव खोटं सांगतात. या साऱ्या बाबी विचारात घेता नोकरीच्या अर्जात नेमकी आणि प्रामाणिक माहिती देणं किती महत्त्वाचं आहे हे लक्षात येतं.



खेचाखेची

## प्रवास

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष भारतात येऊन गेल्यावर आपल्या लालू भैय्यांना आपणही अमेरिकेला जावे, असे वाटू लागले.
लालू भैय्यांनी विमानतळावर फोन करुन विचारले, अमेरिकेला जायला किती वेळ लागेल?

**पलिकडून** : एक मिनिट हं...
.
.
.
**लालू भैय्या** : धन्यवाद!

वेगळं काही

चीनची राजधानी बीजिंगमध्ये मध्यंतरी नवं आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधण्यात आलं. हे जगातलं सर्वात मोठं विमानतळ असल्याचं बोललं जातं. 'दाक्सिंग विमानतळ' या नावाने ते ओळखलं जातं. चीनमध्ये कम्युनिस्ट राजवटीला ७० वर्षं पूर्ण झाली. यानिमित्ताने चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांनी या विमानतळाचं उद्घाटन केलं होतं. हे विमानतळ १७३ एकर परिसरात पसरलं आहे. या विमानतळाच्या आतल्या भागात मोठी बागही आहे. राष्ट्रीय तसंच आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी वेगवेगळी टर्मिनल्स आहेत. हे विमानतळ एखाद्या अंतराळ यानासारखं दिसतं. या विमानतळाच्या बांधकामासाठी भारतीय चलनात १७ खरब ७४ अब्ज रुपये खर्च करण्यात आले.

रुचिरा

## भोपळ्याचा रुचकर कोरोडा

सगळ्या भाज्या खाव्या असं कितीही सांगितलं तरी काही भाज्या अनेकांच्या नावडीच्या असतात. बरेचदा लाल भोपळा याच श्रेणीत येतो. पण एखाद्या चमचमीत डिशमध्ये वापर केला तर हाच भोपळा सगळ्यांचा आवडू शकतो. भोपळ्याचा कोरोडा हा असाच एक पदार्थ आहे. पाहू या कसा बनवायचा...



सामग्री: पाच वाट्या सालासकट किसलेला लाल भोपळा, तीन हिरव्या मिरच्यांचे तुकडे, आलं-लसूण पेस्ट, कोथिंबीर, तेल-मोहरी-हिंग-हळद-तिखट-मीठ-धणेपूड, एक वाटी डाळीचं पीठ, भाजलेल्या तीळ-दाण्याचा कूट इत्यादी.

कृती: सर्वप्रथम तेलाची फोडणी करुन त्यात चमचाभर भोपळ्याचा कीस घालावा. त्यावर आलं-लसूण पेस्ट आणि धणेपूड घालून परतून घ्यावं. थोडं परतल्यावर तीळ-दाण्याचा कूट घालावा आणि उरलेला कीस घालून परतून घ्यावा. परतताना उरलेले सगळे मसाले घालावे. आता झाकण न ठेवता भोपळा शिजू द्यावा. भोपळा चांगला शिजला की डाळीचं पीठ पेरावं आणि मिश्रण एकसारखं करावं. नंतर एक चांगली वाफ येऊ द्यावी. कोथिंबीर घालून गरमागरम सर्व्ह करावा.

## सुडोकू १५२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ | | ५ | | ७ | |
| | | | | | ८ | | २ | ९ |
| ४ | ९ | ५ | | | | १ | | |
| | | | ८ | | १ | | | ७ |
| | | २ | | ६ | | ९ | | |
| ८ | | | ९ | | ४ | | | |
| | | ७ | | | | ८ | ३ | ६ |
| १ | २ | | ७ | | | | | |
| | ६ | | ५ | | ९ | | | |

टीप -
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १५१चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ६ | १ | ५ | ७ | ४ | ८ | ३ | २ |
| ३ | ५ | ७ | ८ | ६ | २ | १ | ४ | ९ |
| ४ | ८ | २ | ९ | १ | ३ | ५ | ७ | ६ |
| १ | ४ | ५ | ७ | ३ | ९ | ६ | २ | ८ |
| २ | ९ | ८ | ६ | ४ | १ | ३ | ५ | ७ |
| ७ | ३ | ६ | २ | ५ | ८ | ४ | ९ | १ |
| ६ | ७ | ३ | १ | २ | ५ | ९ | ८ | ४ |
| ८ | १ | ४ | ३ | ९ | ७ | २ | ६ | ५ |
| ५ | २ | ९ | ४ | ८ | ६ | ७ | १ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक १५२

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ■ | ५ | ■ | ६ | | ७ | ८ | | ■ | ९ |
| ■ | | ■ | १० | | | | ११ | | ■ | १२ | | ■ | १३ | |
| १४ | | १५ | ■ | | ■ | १६ | | | ■ | | ■ | १७ | | |
| १८ | | | ■ | १९ | | ■ | | ■ | २० | | २१ | | ■ | |
| २२ | | | | | ■ | २३ | | | | ■ | २४ | | २५ | |
| | ■ | | ■ | ■ | २६ | | | ■ | २७ | | | ■ | | ■ |
| २८ | २९ | | ३० | ■ | | ■ | ■ | ३१ | | ■ | ■ | ३२ | | ३३ |
| ■ | | ■ | ३४ | ३५ | | ३६ | ३७ | | ■ | ३८ | ३९ | ■ | ४० | |
| ४१ | | | | | ■ | ४२ | | ■ | ४३ | ■ | ४४ | | | ■ |
| ४५ | | ■ | ४६ | | ४७ | | | ■ | ४८ | ४९ | | ■ | ५० | |
| ५१ | | ५२ | ■ | ■ | | ■ | ■ | ५३ | | | ■ | ५४ | | ■ |
| | ■ | | ■ | ५५ | | ५६ | | ■ | | ■ | ५७ | ■ | ५८ | |
| ५९ | ६० | | ६१ | | ■ | | ■ | ६२ | ■ | ६३ | | ६४ | | ■ |
| ■ | | ■ | ६५ | | ६६ | | ६७ | ■ | ६८ | | ■ | | ■ | ६९ |
| ७० | | | ■ | ■ | ७१ | | | | ■ | ७२ | | | | |

**आडवे शब्द :-**
१) पाप धुवून टाकणे
६) विड्याच्या पानाची वेल
१०) घोडदळातील एक हुद्दा
१२) माराची उमटलेली खूण
१३) तात्पर्यार्थ
१४) कापडाचा एक प्रकार
१६) कणीदार
१७) टेहेळणी करणारा, गुप्त हेर
१८) च्या पुढे
१९) फक्त, केवळ
२०) कपट
२२) तात्काळ
२३) फुलातील रस शोषून घेणारी
२४) नव्यावे, अलीकडे
२६) धावणे
२७) मागणारा
२८) अवघड, कष्टप्रद त्रासदायक
३१) अक्षरावरील उभी रेघ
३२) भयंकर
३४) कमळातील बी
३८) केस
४०) निर्बुद्ध
४१) जळफळाट, अरेरावी
४२) माघार, झाडावरून आपोआप गळून पडलेले फळ
४४) छोटा खड्डा
४५) बागवान
४६) गर्द लाल रंग
४८) माल साठवून ठेवण्याची जागा
५०) धपाटा
५१) ओवाळून टाकलेली जिन्नस
५३) दिवस
५४) दरारा, वचक
५५) लिंबू पाण्याचे पेय
५८) सडक,
५९) प्रज्वलित, तापलेले
६२) मान्यतेचा शब्द
६३) तयार होत असताना अन्न जळणे
६५) ज्याला वतन मिळाले आहे असा
६८) महाभारताचे लेखक
७०) हवेतील गरमी
७१) माजलेला गर्विष्ठ
७२) दुसऱ्याच्या मनातील भाव, विचार ओळखणारा

**उभे शब्द :-**
२) दुसऱ्यासाठी पैसा खर्च करणे
३) जानकी पती
४) ब्रह्मदेवाचे मानसपुत्र
५) जून, कडक
६) श्रीफळ
७) चटकन
८) एक गळीत धान्य
९) घराचा मागील दरवाजा
११) यशस्वी सूड उगविणे
१३) नवऱ्याची किंवा पत्नीची आई
१४) हसऱ्या चेहऱ्याचा
१५) नवा कोरा
१७) यज्ञोपवीत
२०) देवदर्शनानिमित्त काशीस जाणे
२१) स्टेशन (म)
२३) घाण
२५) स्वत:ची इच्छा पूर्ण करून स्वस्थ बसणे, तहान भूक शमविणे (वा.प्र.)
२६) गवंड्याकडची पाण्याची पिशवी
२९) अस्थिर
३०) जिनसांची यादी
३१) माडाच्या पोईतून काढलेले मद्य
३३) माणसाचा जाडेपणा
३५) दिवटी
३६) वस्त्र
३७) टणक, मऊच्या विरुद्ध
३९) महिरप
४१) तमाशातील कलावंत
४३) फुरसत, सवड
४७) वऱ्याचे तांदूळ
४९) चानी
५२) बांगड्यांचा व्यवसाय करणारी जमात
५५) सदोदित
५६) पाहुणचार, सत्कार
५७) वजन, बोजा
६०) पती जिवंत असलेली स्त्री
६१) सरहद्द, सीमा
६३) शपथ
६४) बिल्ला
६६) नमणे, वाकणे, पडते घेणे
६७) गव्हाचे जाडसर पीठ
६९) बारीक दगड

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | त्यं | त | ■ | इ | स | म | ■ | ह | ड | क | णे | ■ | सा | प |
| नं | ■ | ब | क | ■ | म | हा | श | य | ■ | म | ■ | ह | र | ण |
| त | ड | क | सा | र | ■ | रा | ■ | ■ | को | ला | ह | ल | ■ | ती |
| ■ | क | ■ | ब | ज | ब | ज | पु | री | ■ | क | र | वा | ल | ■ |
| क | व | ड | सा | ■ | ल | ■ | रा | त | सा | र | ■ | ह | ता | श |
| म | णे | र | ■ | हि | क | म | त | ■ | ह्य | ■ | वा | ल | ■ | म |
| ळ | ■ | पो | ह | रा | ■ | म | न | स्वी | ■ | प | रि | व | ह | न |
| ■ | चा | क | र | ■ | दा | ता | ■ | का | र | ण | ■ | ■ | व | ■ |
| आ | ळ | ■ | क | स | म | ■ | हा | र | ■ | जी | व | दा | न | ■ |
| ■ | क | र्ण | ■ | क | ■ | ज | ल | ■ | का | ■ | न | र | ■ | ग |
| ला | भ | ■ | ज | ल | या | न | ■ | चि | ■ | सु | रा | ■ | सु | धा |
| ■ | वा | म | न | ■ | ग | ग | न | चुं | बी | ■ | ज | ह | र | ■ |
| ध | नी | ■ | ग | र्व | ■ | ण | ■ | द्री | ■ | दी | ■ | स्तां | ■ | प्रा |
| म | ■ | प्रा | ण | ■ | अ | म | र | ■ | क | र | व | त | ■ | क्त |
| क | ष्ट | ■ | ना | च | ■ | न | ज | रा | णा | ■ | सा | र | वा | न |

# विश्वगुरूंनी बारा वर्षांत काय दिवे लावले?

२०१४ मध्ये नरेंद्र मोदी पहिल्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर काही महिन्यांतच जम्मू-काश्मीरमध्ये विनाशकारी पूर आला होता. त्यावेळी मोदींनी देशवासियांना आवाहन केले होते की, माझा वाढदिवस साजरा करू नका; त्याऐवजी आपला वेळ आणि संसाधने जम्मू-काश्मीरमधील पूरग्रस्तांच्या मदतकार्यासाठी समर्पित करा.

बारा वर्षांनंतर देशामध्ये बेरोजगारी, महागाई, नैसर्गिक आपत्ती, भ्रष्टाचार, पेपरफुटी, शेतकरी, छोटे-मोठे व्यापारी आणि तरुणांच्या आत्महत्या असे अनेक प्रश्न गंभीर बनले आहेत. अनेक राज्ये नैसर्गिक आपत्तीशी झुंजत आहेत. देशांतर्गत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. परराष्ट्र धोरणाबाबतही विरोधकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. रुपयाचे डॉलरच्या तुलनेतील अवमूल्यन हा देखील चर्चेचा विषय बनला आहे.

अशा परिस्थितीत महासत्ता होण्याचे स्वप्न दाखवणाऱ्या 'विश्वगुरू'च्या जन्मदिवसानिमित्त 'आशीर्वादाचा दिवा' लावण्यासाठी शासकीय यंत्रणा आणि सार्वजनिक संसाधनांचा वापर करण्यावरून प्रश्न उपस्थित होत आहेत. 'सेवा संकल्प' अभियानाच्या माध्यमातून देशातील अनेक भागांत हा उपक्रम राबवण्यात आला. हरियाणासह अनेक राज्यांच्या अधिकृत निवेदनांत 'आशीर्वादाचा दिवा' हा पंतप्रधानांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांना अभिवादन करण्याचा उपक्रम असल्याचे सांगण्यात आले आहे.

मात्र जनतेचा साधा सवाल आहे या आशीर्वादाच्या दिव्याने देशातील बेरोजगारी, महागाई, पेपरफुटी, शेतकऱ्यांचे प्रश्न, नैसर्गिक आपत्ती आणि वाढती सामाजिक अस्वस्थता यांचा अंधार दूर होणार आहे का?

या दिव्याने किती दिवे लावले म्हणून आता हा दिवा विझल्याशिवाय राहणार नाही, असे लोक उघडपणे बोलू लागले आहेत. 'विश्वगुरू' आणि त्यांच्या समर्थकांना ही अवदसा का आठवली, हा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.



बिहारमधील पूरग्रस्तांची स्थिती




जयप्रकाश नारायण मार्गावर आशीर्वादचा दिवा कार्यक्रम



बालाघाट येथे मृत्युमुखी पडलेले बालक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संदर्भात गेल्या काही वर्षांत गोदी माध्यमांच्या माध्यमातून जी प्रतिमा उभी करण्यात आली, तिच्याविषयीही आता प्रश्न निर्माण होत आहेत. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारत-पाकिस्तान संघर्ष माझ्या फोनमुळे थांबला, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेकदा केला. त्यावर पंतप्रधान मोदींची भूमिका काय होती, याबाबत विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले. इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प प्रशासनाकडून भारतावर टॅरिफ लावण्याच्या धमक्या, तसेच भारताने कोणाकडून तेल खरेदी करावे याबाबतचे दबावाचे राजकारण यावरही विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले.

याच पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाने रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्क्यांपर्यंत टॅरिफ लावण्याचा अधिकार अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना देणारे विधेयक मंजूर केले. भारतावर तत्काळ १०० टक्के टॅरिफ लागू झाला आहे, असे म्हणणे योग्य ठरणार नाही; मात्र या तरतुदीमुळे भारतासमोर निर्माण झालेल्या व्यापार आणि ऊर्जा सुरक्षेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

याच काळात सोशल मीडियावर '५६ इंच छाती' या राजकीय प्रतिमेची खिल्ली उडवली जात असल्याचेही दिसून आले.

**पेपरफुटी आणि तरुणांचा संताप**

पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर दरवर्षी मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करण्याच्या घोषणा झाल्या; मात्र रोजगाराचा प्रश्न आजही तरुणांसमोर गंभीरपणे उभा आहे.

शासकीय नोकरीसाठी होणाऱ्या परीक्षाकेंद्र सरकारच्या असोत किंवा राज्य सरकारच्यापेपरफुटी हा गेल्या काही वर्षांतील तरुणांना भेडसावणारा गंभीर प्रश्न ठरला आहे. पेपरफुटीच्या अनेक घटनांमुळे तरुणांमध्ये असंतोष निर्माण झाला. आपल्या भविष्याशी खेळ होत असल्याची भावना अनेक विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली.सह विविध परीक्षांच्या पारदर्शकतेबाबतही प्रश्न उपस्थित झाले. याच काळात अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली 'कॉकरोच जनता पार्टी' या नावाने एक उपरोधिक युवा आंदोलन उभे राहिले. जंतर-मंतरवरील आंदोलनाला विद्यार्थ्यांचा आणि तरुणांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या 'कॉकरोच' या उल्लेखावरूनही मोठा वाद निर्माण झाला होता. मात्र नंतर त्यांनी हे वक्तव्य बनावट कायद्याच्या पदव्या घेऊन व्यवसायात आलेल्या व्यक्तींच्या संदर्भात होते, सर्व तरुणांच्या संदर्भात नव्हते, असे स्पष्ट केले. त्यामुळे हा संदर्भ लिहिताना तो तसाच स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे.

अभिजीत दिपके यांच्या आंदोलनाने सोशल मीडियावर तरुणांच्या प्रश्नांना मोठ्या प्रमाणावर व्यासपीठ मिळवून दिले. जंतर-मंतरवरील आंदोलनाने बेरोजगारी, पेपरफुटी आणि शिक्षणव्यवस्थेतील पारदर्शकतेच्या प्रश्नांकडे देशाचे लक्ष वेधले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात सोशल मीडियावर एखादी पोस्ट आली की समर्थकांची मोठी ऑनलाइन प्रतिक्रिया उमटत असे. मात्र युवा आंदोलनानंतर सोशल मीडियावरील चर्चेचे स्वरूप बदलल्याचे जाणवले. 'कॉकरोच जनता पार्टी'च्या माध्यमातून तरुणांनी सरकारला थेट प्रश्न विचारण्याची भूमिका घेतली.

**प्रतिमा आणि वास्तव यांच्यातील अंतर**

गेल्या बारा वर्षांत नरेंद्र मोदी यांची एक विशिष्ट प्रतिमा तयार करण्यात आली. मात्र आंदोलन, सोशल मीडिया आणि तरुणांच्या प्रश्नांनी त्या प्रतिमेच्या पलिकडील वास्तवावर चर्चा सुरू केली आहे.

देशातील कोणतीही नैसर्गिक आपत्ती असो, रेल्वे दुर्घटना असो, राजकीय किंवा धार्मिक संघर्ष असो मनुष्यहानी आणि वित्तहानी झालेल्या अनेक प्रसंगी पंतप्रधानांनी संबंधित पीडितांची प्रत्यक्ष भेट का घेतली नाही, हा विरोधकांकडून उपस्थित केला जाणारा प्रश्न आहे. विशेषतः मणिपूरमधील हिंसाचारानंतर विस्थापित नागरिकांच्या स्थितीबाबत केंद्र सरकारच्या भूमिकेवर सातत्याने प्रश्न उपस्थित झाले आहेत. २०२३ पासून सुरू असलेल्या संघर्षामुळे मोठ्या संख्येने लोक विस्थापित झाले आहेत आणि मदतछावण्यांतील परिस्थितीबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

मणिपूर असो, नैसर्गिक आपत्ती असो किंवा इतर संकटेसंकटकाळात सत्तेतील सर्वोच्च नेतृत्वाने पीडितांच्या वेदना प्रत्यक्ष समजून घेण्यासाठी घटनास्थळी जाणे अपेक्षित आहे, अशी लोकशाहीतील सामान्य भावना आहे. त्यामुळे 'आशीर्वादाचा दिवा' लावण्यापेक्षा संकटात सापडलेल्या नागरिकांच्या घरात आशेचा दिवा कधी लागणार, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

**एकीकडे दिव्यांचा झगमगाट, दुसरीकडे पुरग्रस्तांचे अंधारलेले जीवन**

मध्य प्रदेशातील बालाघाटमध्ये आदिवासी समाजातील मुलांच्या मृत्यूचा प्रश्नही सध्या चर्चेत आहे. उपलब्ध वृत्तांनुसार मे-जून २०२६ पासून बालाघाटच्या दुर्गम भागात किमान २५ आदिवासी मुलांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आले असून, कुपोषण, संसर्गजन्य आजार आणि आरोग्यसेवेच्या मर्यादा याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणी मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारकडून उत्तर मागितले आहे.

**संजय टाकळगव्हाणकर**

एकीकडे अशा घटना घडत असताना दुसरीकडे उज्जैनमध्ये १७ सप्टेंबरला ३३.२७ लाख दिवे लावून मोठा दीपोत्सव करण्यात आला. उपलब्ध वृत्तांनुसार या कार्यक्रमात सुमारे २५ हजार स्वयंसेवक सहभागी झाले होते आणि 'आशीर्वादाचा दिवा'ही प्रज्वलित करण्यात आला.

प्रश्न दिवा लावण्याचा नाही; प्रश्न प्राधान्यक्रमाचा आहे. एका बाजूला कोट्यवधी रुपयांच्या खर्चाचे भव्य कार्यक्रम आणि दुसऱ्या बाजूला उपासमार, कुपोषण, पूर, बेरोजगारी आणि आरोग्याच्या मूलभूत सुविधांसाठी झगडणारा सामान्य नागरिकया विरोधाभासाकडे जनतेने पाहू नये का?

बिहारमध्ये पूरस्थिती निर्माण झालेली असताना सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून झगमगाटी दीपोत्सव साजरा होत असेल आणि त्याच वेळी पूरग्रस्त नागरिक मदत छावण्यांमध्ये मूलभूत सुविधांसाठी झगडत असतील, तर त्या झगमगाटाकडे प्रश्नार्थक नजरेने पाहणे स्वाभाविक आहे.

**पेट्रोल-डिझेल वाचवा, खाद्यतेल कमी वापरा आणि राष्ट्रभक्ती सिद्ध करा?**

आंतरराष्ट्रीय संघर्षांच्या पार्श्वभूमीवर तेलाच्या किमती आणि ऊर्जा सुरक्षेचे प्रश्न गंभीर झाले आहेत. अशा वेळी जनतेने पेट्रोल-डिझेलची बचत करावी, तसेच खाद्यतेलाच्या वापराबाबतही काटकसर करावी, असे आवाहन केले जात असेल, तर सामान्य नागरिकाचा प्रश्न आहेकाटकसरीचा हा संदेश सत्ताधाऱ्यांच्या भव्य सार्वजनिक कार्यक्रमांनाही लागू होणार आहे का?

देशातील सामान्य नागरिकाने प्रत्येक थेंब तेलाचा हिशेब करायचा आणि दुसरीकडे हजारो-लाखो दिव्यांसाठी मोठ्या प्रमाणावर तेल जाळायचे, हा विरोधाभास जनतेला खटकणार नाही का?

वडनेरपासून वाराणसीपर्यंत आणि इतर शहरांतून 'आशीर्वाद रॅली'सारखे कार्यक्रम आयोजित करून मोठ्या प्रमाणावर प्रवास केला जात असेल, तर त्यासाठी लागणाऱ्या इंधनाचा आणि शासकीय यंत्रणेच्या वापराचा खर्चही जनतेच्या चर्चेचा विषय होणे स्वाभाविक आहे.

रोम जळत असताना निरो बासरी वाजवत होता, अशी इतिहासातील उपमा अशा प्रसंगी आठवते. देशातील गंभीर प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर 'आशीर्वादाचा दिवा' हा कार्यक्रम त्याच प्रकारचा विरोधाभास निर्माण करतो आहे का, हा प्रश्न जनता विचारत आहे.

**वाढदिवसाच्या सोहळ्यात दोन महत्त्वाच्या घटना**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्म दिवसाच्या आसपास दोन घटना विशेष चर्चेत आल्या. एक म्हणजे अमेरिकेच्या संसदेत भारतासह रशियन तेलाच्या प्रमुख आयातदार देशांवर १०० टक्क्यांपर्यंत टॅरिफ लावण्याचा अधिकार देणारे विधेयक मंजूर झाले. दुसरी म्हणजे जंतर-मंतरवरील कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनादरम्यान अल्पवयीन कार्यकर्त्याच्या वडिलांवर हल्ला केल्याच्या प्रकरणातील स्वातंत्र भारद्वाज यांना दिल्लीतील न्यायालयाने तीन आठवड्यांचा अंतरिम जामीन दिला.

या दोन्ही घटनांचा आणि 'सेवा संकल्प' कार्यक्रमाचा थेट संबंध जोडताना पुराव्यांची काळजी घेणे आवश्यक आहे; मात्र या घटनांनी निर्माण केलेले राजकीय आणि सामाजिक प्रश्न नक्कीच चर्चेचे विषय बनले आहेत.

**आशीर्वादाचा दिवा की प्रश्नांचा अंधार?**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पूर्वीची प्रतिमा पुन्हा उभी करण्याचा प्रयत्न 'आशीर्वादाचा दिवा' आणि 'सेवा संकल्प' अभियानातून होत आहे, अशी टीका विरोधकांकडून होत आहे. मात्र प्रतिमा ही केवळ प्रचारातून निर्माण होत नाही; ती नागरिकांच्या अनुभवातूनही तयार होते.

बारा वर्षांच्या सत्तेनंतर बेरोजगार तरुणांच्या हाताला काम, शेतकऱ्याला सुरक्षित उत्पन्न, पूरग्रस्ताला मदत, कुपोषित मुलाला अन्न-आरोग्य, विद्यार्थ्याला पारदर्शक परीक्षा आणि सामान्य नागरिकाला महागाईपासून दिलासा मिळणेहा खरा 'आशीर्वादाचा दिवा' नाही का? दिवे लावून एखाद्या व्यक्तीच्या दीर्घायुष्याची कामना करणे हा नागरिकांचा अधिकार आहे. पण त्याच नागरिकांना सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारण्याचाही तेवढाच अधिकार आहे.

म्हणूनच आज जनतेचा सवाल आहे

आशीर्वाद कसला? बारा वर्षांत काय दिवे लावले?

आणि जर खरोखरच देशाला प्रकाशमान करायचे असेल, तर लाखो दिव्यांपेक्षा बेरोजगार तरुणाच्या आयुष्यात रोजगाराचा एक दिवा, शेतकऱ्याच्या घरात सुरक्षित उत्पन्नाचा एक दिवा, पूरग्रस्ताच्या घरात आशेचा एक दिवा आणि उपेक्षित मुलाच्या आयुष्यात शिक्षणाचा एक दिवा लावणे अधिक महत्त्वाचे नाही का?

'जो बूंद से गई, वह हौद से नहीं आती', अशी हिंदीतील म्हण आहे. गेल्या बारा वर्षांत निर्माण झालेल्या प्रतिमेला आता केवळ एका दिव्याच्या झगमगाटाने पूर्वीचे तेज प्राप्त होईल का, हा निर्णय शेवटी जनतेलाच घ्यायचा आहे. ●

# स्वतःपासून स्वतःकडे : शांततेतून जागृतीकडे जाणारा शिक्षणप्रवास

**सुनील गवळी**

आजचे जीवन वेगाने बदलत आहे. माहिती वाढली, साधने वाढली, संधी वाढल्या; पण या सगळ्या वाढीबरोबर मनाची शांतता वाढली आहे का, हा विचार करण्याची वेळ आली आहे. विद्यार्थी अभ्यास, परीक्षा आणि करिअरच्या चिंतेत जगतो; पालक मुलांच्या भविष्याची काळजी करत असतो; तर शिक्षक शैक्षणिक आणि प्रशासकीय जबाबदाऱ्यांच्या वाढत्या व्यापात स्वतःशी संवाद साधण्याची संधी हरवून बसतो. अशा परिस्थितीत शिक्षणाने माणसाला केवळ बाह्य जगाशी जुळवून घेण्याचे प्रशिक्षण न देता स्वतःच्या अंतर्मनाला समजून घेण्याची आणि सजगपणे जगण्याची दृष्टी देणे आवश्यक आहे. त्याकरिता खालील महत्त्वाची जाणिवांची रुजवणूक विद्यार्थ्यांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागणे आवश्यक आहे



**१. स्थिरतेची जाणीव : थांबणे म्हणजे मागे जाणे नव्हे**

आजच्या जीवनात प्रत्येक क्षण उत्पादक असला पाहिजे, सतत काहीतरी केले पाहिजे, अशी मानसिकता निर्माण झाली आहे. मात्र मनाला सतत धावत ठेवले तर विचारांची स्पष्टता कमी होते आणि भावनिक थकवा वाढतो. म्हणूनच काही क्षण शांत राहण्याची सवय ही विलासिता नसून मानसिक आरोग्याची गरज आहे. विद्यार्थ्याने अभ्यासापूर्वी काही क्षण शांत बसून मन एकाग्र करावे, शिक्षकाने वर्गात जाण्यापूर्वी स्वतःला स्थिर करावे आणि पालकांनी मुलाच्या एखाद्या चुकीवर तत्काळ प्रतिक्रिया देण्याऐवजी क्षणभर थांबावे. या छोट्याशा थांब्यात मनाला स्वतःकडे पाहण्याची संधी मिळते. स्थिरता म्हणजे कृतीचा अभाव नव्हे; योग्य कृतीपूर्वी मनाची केलेली तयारी होय.

**२. वर्तमानाची जाणीव :- जीवन 'आत्ता' घडत असते**

आपले मन अनेकदा भूतकाळातील चुका आणि भविष्यकाळातील चिंतेमध्ये अडकलेले असते. विद्यार्थी कालच्या कमी गुणांचा विचार करत राहतो किंवा उद्याच्या परीक्षेची भीती बाळगतो. पालक मुलाच्या भविष्यातील करिअरची चिंता करताना त्याच्याशी आज घडणारा संवाद गमावतात. शिक्षकही पुढील कामांच्या विचारात वर्गातील वर्तमान क्षणाकडे दुर्लक्ष करू शकतो. परंतु जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव केवळ वर्तमानातच घेता येतो. अभ्यास करताना अभ्यासात, संवाद करताना संवादात आणि शिकवताना विद्यार्थ्यांमध्ये पूर्णपणे उपस्थित राहणे ही एकाग्रतेची खरी सुरुवात आहे. आजचा क्षण जागरूकपणे जगला तर उद्याची दिशा अधिक स्पष्ट होते.

**३. विचारांकडे साक्षीभावाने पाहणे : प्रत्येक विचार म्हणजे सत्य नसते**

मनात असंख्य विचार निर्माण होत असतात. ''मला हे जमत नाही'', ''मी इतरांपेक्षा कमी आहे'', ''माझे मूल मागे पडत आहे'', ''हा विद्यार्थी कधीच सुधारणार नाही'' असे विचार अनेकदा क्षणिक अनुभवांमधून निर्माण होतात. परंतु विचार आणि सत्य यांच्यात अंतर असते. विद्यार्थ्याने ''मला गणित जमत नाही'' या विचाराऐवजी ''मला अजून सरावाची गरज आहे'' असे पाहिले तर त्याच विचाराची दिशा बदलते. पालकांनी मुलाच्या एका अपयशावरून त्याच्या क्षमतेचा अंतिम निर्णय घेऊ नये. शिक्षकांनी एखाद्या विद्यार्थ्याच्या चुकीवरून त्याचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व ठरवू नये. विचारांना दाबण्याची गरज नाही; त्यांच्याकडे शांतपणे पाहण्याची सवय निर्माण करणे आवश्यक आहे. विचारांवर नियंत्रण मिळवण्यापेक्षा विचारांकडे सजगपणे पाहण्याची क्षमता अधिक महत्त्वाची आहे.

**४. अहंकारापासून अंतर : 'मी बरोबर'पेक्षा 'आपण समजून घेऊ'**

अहंकार म्हणजे केवळ स्वतःचा मोठेपणा नव्हे; तर प्रत्येक वेळी आपलेच मत योग्य असावे, आपल्याशी कोणी असहमत होऊ नये आणि आपल्याला कोणी प्रश्न विचारू नये, ही मानसिकताही अहंकाराचाच एक भाग आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात ही वृत्ती नात्यांना कमकुवत करू शकते. शिक्षकाने विद्यार्थ्याचा प्रश्न हा स्वतःच्या अधिकाराला आव्हान मानू नये. पालकांनी मुलाचे स्वतंत्र मत म्हणजे अवज्ञा असे समजू नये. विद्यार्थ्याने शिक्षकाची सूचना म्हणजे स्वतःचा अपमान असे मानू नये. 'मी'च्या जागी 'आपण' आले की संवादाला जागा मिळते आणि संवादातून समज निर्माण होते. अहंकार कमी झाला की शिकण्याची आणि शिकवण्याची दोन्ही प्रक्रिया अधिक समृद्ध होते.

**५. अंतर्मनातील वेदनांची जाणीव : प्रतिक्रिया नको, प्रतिसाद हवा**

आपल्या अनेक प्रतिक्रिया केवळ वर्तमान परिस्थितीतून निर्माण होत नाहीत; त्या जुन्या अनुभवांचेही प्रतिबिंब असतात. एखादे शब्द, एखादी टीका किंवा एखादी घटना मनातील जुनी वेदना जागृत करू शकते आणि त्यातून अपेक्षेपेक्षा मोठी प्रतिक्रिया निर्माण होते. अशा वेळी स्वतःला विचारणे आवश्यक आहे की ''माझी प्रतिक्रिया या क्षणापुरती आहे का, की माझ्या आत साठलेल्या जुन्या अनुभवांचाही त्यात वाटा आहे?'' ही जाणीव झाली की राग, दुःख किंवा असुरक्षितता आपल्यावर पूर्णपणे नियंत्रण ठेवत नाही. विद्यार्थ्याला अपयश आले म्हणून तो अपयशी ठरत नाही; पालकांची एखादी अपेक्षा पूर्ण झाली नाही म्हणून मुलाचे मूल्य कमी होत नाही; शिक्षकाला एखाद्या विद्यार्थ्याकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही म्हणून त्याचा प्रयत्न व्यर्थ ठरत नाही. भावनांना नाकारायचे नाही, पण त्यांच्याच आधारावर स्वतःची ओळखही निर्माण करायची नाही.

**६. जीवनाचा स्वीकार : वास्तवाशी भांडण्याऐवजी त्याला समजून घेणे**

स्वीकार म्हणजे परिस्थितीसमोर हार मानणे नव्हे. उलट वास्तव जसे आहे तसे स्पष्टपणे पाहून त्यामध्ये आवश्यक बदल करण्याची तयारी म्हणजे स्वीकार. विद्यार्थ्याला अपेक्षित गुण मिळाले नाहीत तर प्रथम ते स्वीकारणे आणि नंतर चुका शोधून पुढील प्रयत्न करणे अधिक योग्य आहे. पालकांनी मुलाची इतरांशी तुलना करण्याऐवजी त्याच्या वास्तविक क्षमतांचा स्वीकार करावा. शिक्षकांनी वर्गातील अडचणी नाकारण्यापेक्षा त्या समजून घेऊन नवीन पद्धती वापराव्यात. वास्तव नाकारण्यात मोठी ऊर्जा खर्च होते; स्वीकार आपल्याला तीच ऊर्जा परिवर्तनासाठी वापरण्याची संधी देतो. स्वीकार हा पराभवाचा नाही, तर परिवर्तनाचा पहिला टप्पा आहे.

**७. मौन आणि ऐकण्याची शक्ती : प्रत्येक समस्येला त्वरित उत्तर आवश्यक नसते**

आज बोलणारे अनेक आहेत; परंतु मनापासून ऐकणारे कमी झाले आहेत. अनेकदा विद्यार्थ्याला सल्ल्यापेक्षा समजून घेणारे कान आवश्यक असतात. मुलाने काही सांगितले की लगेच उपदेश करण्याऐवजी पालकांनी त्याचे बोलणे पूर्ण ऐकावे. शिक्षकांनी विद्यार्थ्याच्या चुकीमागील कारण समजून घेण्याचा प्रयत्न करावा. विद्यार्थ्यांनीही शिक्षकांच्या सूचनांकडे केवळ आदेश म्हणून न पाहता त्यांच्या अनुभवातून आलेले मार्गदर्शन म्हणून पाहावे. काही वेळा शांत राहणे म्हणजे दुर्लक्ष नसते; ते समोरच्या व्यक्तीला स्वतःचे मन व्यक्त करण्यासाठी दिलेली जागा असते. मौन योग्य ठिकाणी वापरले तर ते नात्यांमधील सर्वात प्रभावी संवाद बनू शकते.

**८. समर्पणाची वृत्ती : प्रयत्न आपल्या हातात, प्रत्येक परिणाम नाही**

मानवाला प्रत्येक गोष्ट आपल्या मनाप्रमाणे घडावी असे वाटते; परंतु जीवन तसे चालत नाही. आपण प्रयत्न करू शकतो, नियोजन करू शकतो, तयारी करू शकतो; पण प्रत्येक परिणामावर आपले नियंत्रण नसते. विद्यार्थ्याने मनापासून अभ्यास करणे हे त्याच्या हातात आहे; प्रत्येक परीक्षेचा निकाल मात्र पूर्णपणे त्याच्या हातात नसतो. शिक्षकाने प्रामाणिकपणे शिकवणे त्याच्या हातात आहे; प्रत्येक विद्यार्थी त्याच गतीने शिकेलच असे नाही. पालकांनी योग्य वातावरण निर्माण करणे त्यांच्या हातात आहे; मुलाच्या आयुष्यातील प्रत्येक निर्णय ते घेऊ शकत नाहीत. म्हणूनच कृतीमध्ये पूर्ण प्रामाणिकपणा आणि परिणामामध्ये समत्व ही मानसिक संतुलनाची महत्त्वाची गुरुकिल्ली आहे.

**९. नात्यांमध्ये उपस्थिती : जवळ असण्यापेक्षा मनाने सोबत असणे महत्त्वाचे**

एखाद्या व्यक्तीजवळ बसणे म्हणजे तिच्यासोबत असणे नव्हे. मनाने उपस्थित राहणे म्हणजे समोरच्या व्यक्तीला त्याचे अस्तित्व महत्त्वाचे आहे, अशी अनुभूती देणे. पालकांनी मुलाशी बोलताना त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहणे, शिक्षकांनी विद्यार्थ्याच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहणे आणि विद्यार्थ्याने शिक्षकांचे म्हणणे समजून घेण्याचा प्रयत्न करणे हीच खरी उपस्थिती आहे. माणसाला मोठ्या भेटवस्तूंपेक्षा आपल्याला कोणी मनापासून ऐकले, समजून घेतले आणि स्वीकारले याची आठवण अधिक काळ राहते. उपस्थिती ही नात्यांची शांत पण अत्यंत प्रभावी भाषा आहे.

**१०. निसर्गाशी नाते : निसर्ग हा अनुभवातून शिकवणारा शिक्षक**

निसर्ग आपल्याला संयम, सातत्य आणि स्वीकार शिकवतो. झाड आपली वाढ सिद्ध करण्यासाठी घाई करत नाही; नदी प्रत्येक वळणाशी भांडत नाही; ऋतू आपल्या वेळेनुसार बदलतात. या साध्या प्रक्रियांमध्ये जीवनाचे मोठे तत्त्वज्ञान दडलेले आहे. विद्यार्थ्यांना निसर्ग निरीक्षण, वृक्षसंवर्धन, बागकाम, परिसर स्वच्छता, पक्षीनिरीक्षण यांसारख्या कृतींशी जोडल्यास त्यांची निरीक्षणशक्ती आणि संवेदनशीलता वाढते. शिक्षक आणि पालकांनीही मुलांना निसर्गाकडे केवळ मनोरंजन म्हणून नव्हे तर जीवनशाळा म्हणून पाहण्याची दृष्टी द्यावी. निसर्गाशी संवाद साधणारे मन स्वतःशी संवाद साधायला शिकते.

**११. काळाच्या भानाची जाणीव : भविष्य घडवताना वर्तमान हरवू नये**

भविष्यासाठी नियोजन आवश्यक आहे; परंतु भविष्याच्या चिंतेत वर्तमान गमावणे योग्य नाही. विद्यार्थ्याच्या प्रत्येक दिवसाला ''उद्याच्या यशासाठी'' मोजले तर त्याच्या आजच्या अनुभवांचे सौंदर्य हरवू शकते. पालकांनी मुलाच्या भविष्याची काळजी घेताना त्याच्या वर्तमानातील भावनिक गरजांकडे लक्ष द्यावे. शिक्षकांनीही केवळ पुढील परीक्षेचा विचार न करता आजचा शिकण्याचा अनुभव अर्थपूर्ण करावा. भविष्य हे आजच्या छोट्या कृतींमधून तयार होते. त्यामुळे वर्तमान क्षणाचा योग्य उपयोग करणे हीच भविष्याची सर्वोत्तम तयारी आहे. उद्याची चिंता कमी करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे आजची कृती अधिक सजग करणे.

**१२. जागृतीची सुरुवात : स्वतःला पाहण्याची कला**

जागृती म्हणजे एखादी दूरची किंवा गूढ अवस्था नाही. आपल्याला राग आला आहे हे रागाच्या भरात जाणवणे, आपण चुकीचे बोललो हे स्वीकारणे, आपले मन अस्वस्थ आहे हे ओळखणे, मुलाच्या वर्तनामागील भावना समजून घेणे आणि विद्यार्थ्याचे लक्ष विचलित झाले आहे हे शिक्षकाने जाणणेहीच जागृतीची सुरुवात आहे. स्वतःच्या विचारांकडे, भावनांकडे आणि कृतींकडे सजगपणे पाहण्याची क्षमता वाढली की माणूस परिस्थितीचा केवळ बळी राहत नाही; तो स्वतःच्या प्रतिसादाची जबाबदारी घेऊ लागतो. जागृती म्हणजे स्वतःला बदलण्यापूर्वी स्वतःला स्पष्टपणे पाहण्याची क्षमता.

थोडक्यात शिक्षणाने बाहेरचे जग जिंकण्याबरोबर आतले जगही समजून घ्यावे

शिक्षणाचा प्रवास केवळ पुस्तकापासून परीक्षेपर्यंत आणि परीक्षेपासून करिअरपर्यंत मर्यादित राहू नये. त्याचा प्रवास ज्ञानापासून जाणीवेकडे, जाणीवेपासून विवेकाकडे आणि विवेकापासून समृद्ध व्यक्तिमत्त्वाकडे झाला पाहिजे. ●

# वाचनीय आणि प्रेरक

# असे घडले थोर शास्त्रज्ञ

असे घडले थोर शास्त्रज्ञ, हे प्रदीप कुलकर्णी लिखित पुस्तक, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले आहे. 'मनोगत'मध्ये या पुस्तकाच्या लेखनाची सूचना, प्रकाशक अशोक कोठावळे यांनी केल्याचे प्रदीप यांनी स्पष्ट केले आहे. विज्ञान आणि गणित शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी, संबंधित अवांतर वाचन केल्याने, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते. पुस्तकात तेरा महान शास्त्रज्ञांच्या जीवनकार्याची सविस्तर माहिती दिली आहे. समर्पक, रंगीत मुखपृष्ठ अनीश दाते यांचे आहे.

ग्रीक साम्राज्यात अनेक शास्त्रज्ञ, कलावंत आणि संशोधक निर्माण झाले. त्यामध्ये आर्किमिडीज यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. आर्किमिडीज यांनी गणितामध्ये केलेल्या मूलभूत संशोधनामुळे, त्यांना 'गणितशास्त्राचा पिता' मानले जाते. आर्किमिडीज (इ.स.पू. २८७ – इ.स.पू.२१२) यांचा जन्म, इटलीजवळील सिसिली बेटावरील सिरॅक्युज शहरात झाला. आर्किमिडीज लहानपणापासून बुद्धिमान आणि चौकस होता. लहानपणापासूनच विज्ञान आणि गणित या विषयांची गोडी लागली. इजिप्तमधील अलेक्झांड्रिया शहरात, विविध विषयांचे शिक्षण घेऊन आर्किमिडीज सिरॅक्युजला परत आले. त्यांनी विविध प्रयोग करून निसर्गाची कोडी सोडविली. त्यासाठी गणिताचा आधार घेतला. तरफेचा वापर करून अवजड वस्तू कमी बलाचा वापर करून उचलता येतात, हा शोध त्यांनी लावला. दोन किंवा जास्त कप्प्यांच्या जोडणीतून, प्रचंड यांत्रिक शक्ती निर्माण होऊ शकते, याचाही शोध लावला. आर्किमिडीज यांच्या जीवनकाळातील 'युरेका युरेका' या आख्यायिकेचे सविस्तर विवेचन प्रदीप यांनी केले आहे. आर्किमिडीज यांना प्रत्येक गोष्टीमागचा कार्यकारणभाव शोधण्याची सवय होती. सोळाव्या शतकात इटलीमध्ये गॅलिलिओ गॅलिली हा प्रतिभावंत आणि प्रयोगशील शास्त्रज्ञ जन्माला आला. गॅलिलिओ यांना प्रयोग करून प्रत्येक गोष्ट सिद्ध करण्याची सवय होती. त्यांनी आधुनिक वैज्ञानिक पद्धतीचा पाया घालण्याचे महान कार्य केले. त्यामुळेच त्यांना रोमन कॅथोलिक चर्चचा प्रचंड विरोध सहन करावा लागला. विविध प्रयोग करून आणि गणिताचा वापर करून त्यांनी निसर्गाची अनेक रहस्ये शोधून काढली. विज्ञानातील जुने विचार कसे चुकीचे आहेत, हे सिद्ध केले. त्यांनी केलेल्या विविध प्रयोगांविषयीही, त्यांच्या जीवनाविषयी प्रदीप यांनी सविस्तरपणे माहिती दिली आहे. गॅलिलिओ यांनी या विश्वाच्या केंद्रस्थानी पृथ्वी नसून सूर्य आहे आणि सूर्य पृथ्वीभोवती फिरत नसून पृथ्वी सूर्याभोवती फिरते, असे मत ठामपणे मांडले. कालांतराने कोपर्निकस यांनी या मताला दुजोरा दिला. त्यावेळेच्या ख्रिश्चन धर्मप्रमुखांना हे अमान्य असल्याने, गॅलिलिओ यांना एकांतवासाची कठोर शिक्षा दिली गेली. मोतीबिंदू, काचबिंदू या विकारांमुळे, १६३८ मध्ये ते पूर्णपणे अंध झाले. गॅलिलिओ गॅलिली (१५.२.१५६४ – ८.१.१६४२) यांनी यांत्रिकी, गती, ध्वनी, प्रकाश आणि खगोलशास्त्र या सर्व विषयांत मूलभूत संशोधन केले, आधुनिक विज्ञानाचा पाया घातला. आयझॅक न्यूटन (२५.१२.१६४२ – ३१.३.१७२७) यांचा जन्म, लंडनपासून शंभर मैलांवर असलेल्या वुलस्थॉर्प या गावात झाला. न्यूटन यांच्या जन्मापूर्वी त्यांचे वडील मरण पावल्याने, नंतर आईने बार्नबास स्मिथ या श्रीमंत धर्मोपदेशकाशी लग्न केले. बालपणी न्यूटनचे ग्रंथ हेच खरे मित्र होते, आपले आवडते काम करण्यात रमून जात असे. शालेय शिक्षणानंतर केंब्रिज विद्यापीठाच्या ट्रिनिटी कॉलेजात त्यांनी उच्च शिक्षण घेतले. शिकत असतानाच प्रकाश किरणांच्या गुणधर्मावर प्रयोग करण्याला सुरुवात केली. प्रकाशकिरण पांढरा दिसला तरी तो सात रंगांचा बनलेला असतो, हा प्रकाशाचा गुणधर्म सिद्ध करणारे न्यूटन हे पहिले शास्त्रज्ञ! न्यूटन यांनी गुरुत्वाकर्षण आणि गतीचे नियम यांचा शोध लावला. त्यांनी अंतर्गोल




आरशांचा वापर करून जगातील पहिली दुर्बीण बनवली. न्यूटन हे महान भौतिक शास्त्रज्ञ, गणितज्ञ होते. त्याचबरोबर रसायनशास्त्रज्ञही होते. रॉयल सोसायटीचे ते अध्यक्ष निवडले गेले आणि त्यांनी मृत्यूपर्यंत या पदावर कार्य केले. न्यूटन यांनी त्यांच्या आधीच्या काळातील सर्व महान शास्त्रज्ञांचे ऋण मान्य करताना कृतज्ञतेने म्हटले होते, ''पूर्वी होऊन गेलेल्या शास्त्रज्ञांच्या खांद्यावर उभा राहिल्यामुळे त्यांच्यापेक्षा मी अधिक दूरवरचे बघू शकलो!'' मायकल फॅरेडे (२२.९.१७९१– २५.८.१८६७) यांनी घरच्या गरिबीमुळे आणि शाळेत चांगली वागणूक न मिळाल्यामुळे, वयाच्या तेराव्या वर्षीच शाळा सोडली. लंडनमध्ये गरीब वस्तीत ते राहत होते. बुकबाईंडरच्या दुकानात विश्वकोशाचे बाइंडिंगचे काम करताना, विद्युतशास्त्रावरची माहिती वाचून त्यांच्या मनात कुतूहल निर्माण झाले. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर हंफ्री डेव्ही यांच्याबरोबर काम करण्याची फॅरेडे यांना संधी मिळाली. त्यामुळेच नंतर रॉयल इन्स्टिट्यूटमध्ये त्यांना नोकरी मिळाली. फ्रान्समधील त्यांच्याबरोबरच्या दौऱ्यामुळे मायकेल यांना विविध शास्त्रज्ञांना भेटता आले. या दौऱ्यानंतर त्यांनी 'इलेक्ट्रोकेमिस्ट्री' मध्ये बरेच संशोधन केले. दीर्घकाळ केलेल्या संशोधनातून त्यांनी तीन नियम शोधून काढले. त्यामुळे इलेक्ट्रोकेमिस्ट्री या विषयाला आधुनिक विज्ञानाचा दर्जा प्राप्त झाला. फॅरेडे यांनी प्रयोगशाळेत स्टेनलेस स्टील बनवले. परंतु आर्थिक लाभाची अपेक्षा नसल्याने, ते पुढील संशोधनाकडे वळले. यासंबंधीची सविस्तर माहिती प्रदीप यांनी दिली आहे. चुंबकीय शक्तीचा वापर करून वीज निर्मिती करता येते, हे प्रथमच फॅरेडे यांनी प्रयोगातून सिद्ध केले. १८२० ते १८६२ या दीर्घकाळात केलेल्या, विविध प्रयोगांची सविस्तर माहिती फॅरेडे यांनी लिहून ठेवली. ही माहिती, १९३२साली सात खंडांमध्ये प्रसिद्ध झाली. ते शास्त्रज्ञ म्हणून श्रेष्ठ होते, तसेच त्यांची जीवनातल्या उच्च मूल्यांवर श्रद्धा असल्याने ते माणूस म्हणूनही थोर होते. अल्बर्ट आईन्स्टाईन (१४.३.१८७९ – १८.४.१९५५) यांचा जन्म जर्मनीतील, उल्म नावाच्या छोट्याशा गावात, ज्यू कुटुंबात झाला. अल्बर्ट यांना बालपणापासूनच एकांतवास आवडे. त्यामुळे सूक्ष्म निरीक्षण करण्याची सवय लागली. संगीताची त्यांना विलक्षण आवड होती. व्हायोलिन वाजवताना त्यांना, अनेक वेळेला, न सुटणाऱ्या समस्यांची उत्तरे सापडत. त्यांच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांतामुळे वैज्ञानिक जगतामध्ये खळबळ उडाली. आईन्स्टाईन हे प्रयोगशील शास्त्रज्ञ नव्हते, तर तरल बुद्धिमत्ता, तर्कशुद्ध विचार, अफाट कल्पनाशक्ती यांच्या जोरावर संशोधन करत. १९०५ ते १९१५ या काळात संशोधन करताना अयुक्लीडीय भूमितीचा आधार घेऊन व्यापक सापेक्षतावादाचा सिद्धांत १९१५ साली मांडला. त्यामुळे पूर्वीच्या काळातील विविध अनुत्तरीत प्रश्नांची उत्तरे मिळाली. १९३३ साली जर्मनीमध्ये हिटलरची नाझी राजवट आल्यानंतर, त्याने ज्यू लोकांची धरपकड करून, त्यांना ठार मारायला सुरुवात केली. त्यामुळे आईन्स्टाईन जर्मनी सोडून अमेरिकेतील प्रिन्स्टन या शहरी कायमचे स्थलांतरित झाले. तेथील इन्स्टिट्यूट फॉर ॲडव्हान्स स्टडीज, या संस्थेत ते आयुष्याच्या अखेरपर्यंत संशोधनरत होते. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकल्यामुळे झालेले महाभयंकर दुष्परिणाम ऐकल्यावर ते सुन्न झाले आणि ते शांततावादी झाले. प्रदीप यांनी आईन्स्टाईन यांच्याविषयी आणि त्यांच्या संशोधनाविषयी सविस्तरपणे उत्तम प्रकारे लिहिले आहे. मारी क्युरी(७.११.१८६७ – ४.७.१९३४) यांचा जन्म पोलंडच्या राजधानीत, वॉर्सा येथे झाला. वडील विज्ञान आणि गणिताचे शिक्षक होते, तर आई रात्रशाळेची मुख्याध्यापिका होती. मारिया भावंडातील सर्वात धाकटी. लहानपणापासून ती बुद्धिमान कष्टाळू आणि जिद्दी होती. पोलंडमधील स्त्रियांना, त्यावेळी महाविद्यालयीन शिक्षण

पुस्तक परीक्षण
**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७

घेण्यास परवानगी नव्हती. त्यामुळे पॅरिसला जाऊन भौतिकशास्त्र आणि गणित या विषयांत पदवी प्राप्त केली. मारिया आणि पिएर क्युरी एकाच संस्थेत संशोधन कामात मग्न असल्यामुळे, पुढे त्यांनी अतिशय साधेपणाने विवाह केला. मारी सतत संशोधनात मग्न असत. 'रेडियम' आणि 'पोलोनियम' या मूलद्रव्यांच्या किरणोत्सर्गाच्या संदर्भात केलेल्या महत्त्वपूर्ण संशोधनाबद्दल १९०३ साली क्युरी दाम्पत्याला भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले. रेडियमच्या शोधाचे पेटंट घेऊन, अब्जाधीश होणे शक्य असूनही क्युरी दाम्पत्याने तो मोह टाळला. वैज्ञानिकांनी लावलेल्या शोधांवर संपूर्ण मानव जातीचा हक्क असला पाहिजे, असे त्यांना वाटे. मारी क्युरी यांना १९११सालचे रसायनशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले. पहिल्या महायुद्धाच्या काळात विविध हॉस्पिटलमध्ये दाखल झालेल्या जखमी सैनिकांच्या उपचाराची दिशा ठरवण्यासाठी मारी यांनी फिरती क्ष- किरणयंत्रे बनवून घेतली. अन्य सेवाभावी व्यक्तींच्या मदतीने अनेक सैनिकांचे प्राण वाचवण्याचे महान कार्य मारी यांनी केले. नील्स बोर (७.१०.१८८५ – १८.११.१९६२) यांचा जन्म, डेन्मार्कमधील कोपनहेगन येथे झाला. भौतिकशास्त्र विषयात त्यांनी १९११ साली डॉक्टररेट मिळवली. इंग्लंडमधील मँचेस्टर विद्यापीठात अर्नेस्ट रुदरफोर्ड यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले. बोर यांनी अणुच्या अंतर्गत रचनेचा जटिल प्रश्न पूर्णपणे सोडवला. अणूच्या रचनेसंदर्भात आणि विशिष्ट परिस्थितीत ते अणू प्रकाश उत्सर्जित करतात. याविषयी केलेल्या मूलभूत आणि महत्त्वपूर्ण संशोधनाबद्दल त्यांना १९२२ साली भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार देण्यात आला. हिटलरने ज्यू विरोधात अनेक कायदे केले, त्यामुळे नामवंत ज्यू शास्त्रज्ञांना, इतर देशांत स्थलांतरित करण्यास नील यांनी बहुमोल मदत केली. अणुशक्तीचा वापर विधायक कामांसाठीच केला पाहिजे, हा संदेश जगभर पोहोचवणाऱ्या नील्स बोर यांना अनेक पुरस्कार मिळाले. ते मानवतेच्या कल्याणाबाबत सदैव जागरूक होते. सी.व्ही.रामन यांचा जन्म मद्रास प्रांतातल्या, तिरुचिरापल्ली (त्रिची) येथे एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांची मातृभाषा तमिळ होती. आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. कुशाग्र बुद्धीच्या रामन यांनी भौतिकशास्त्र, इंग्रजी या दोन विषयांमध्ये १९०७ साली एम.ए.ची पदवी प्राप्त केली. त्यांचे विविध शोधनिबंध जागतिक कीर्तीच्या नियतकालिकांतून प्रकाशित झाले. कलकत्त्यातील इंडियन फायनान्स डिपार्टमेंट या ठिकाणी असिस्टंट ऑडिटर जनरल या पदावर त्यांची नेमणूक झाली. संशोधनातील रस टिकून असल्याने, त्यांनी 'इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स' या संस्थेमध्ये संशोधन केले. भौतिकशास्त्राच्या व रसायनशास्त्राच्या दृष्टीने 'रामन परिणाम' हा अत्यंत महत्त्वाचा शोध लावल्याबद्दल, रामन यांना नोबेल पारितोषिक (१९३०)दिले गेले. बंगलोर येथील 'भारतीय विज्ञान संस्थेच्या' संचालकपदी असताना, त्यांनी 'इंडियन सायन्स अकॅडमी' या संस्थेची स्थापना केली. आयुष्याच्या अखेरपर्यंत ते या संस्थेचे अध्यक्ष होते. रामन यांनी संशोधनासाठी लागणारी उपकरणे भारतातच तयार केली. त्यांचा स्वदेशीवर भर होता. १९४८ साली रामन यांनी 'रामन रिसर्च इन्स्टिट्यूट' ही संस्था स्थापन केली. या संस्थेचे आयुष्याच्या अखेरपर्यंत ते संचालक होते. १९५४साली 'भारतरत्न' हा भारतातील सर्वोच्च नागरी पुरस्कार त्यांना दिला गेला. त्यांना अनेक जागतिक पुरस्कारही लाभले. सी.व्ही.रामन

(७.११.१८८८ – २१.११.१९७०) यांनी भारताच्या वैज्ञानिक प्रगतीचा पाया घातला. होमी भाभा यांचा जन्म मुंबईतील एका सुसंस्कृत, सुशिक्षित, संपन्न पारशी कुटुंबात झाला. विज्ञान आणि गणित या दोन विषयांमध्ये होमींना उत्तम गती होती. १९३४ साली त्यांना केंब्रिज विद्यापीठाची पीएच.डी. प्राप्त झाली. आपल्या सूर्यमालेबाहेर ज्या अनेक आकाशगंगा आहेत, त्यातील ताऱ्यांचे स्फोट झाले की फार मोठ्या प्रमाणावर ऋणभारित आणि धनभारीत कणांची (इलेक्ट्रॉन आणि प्रोटॉन) निर्मिती होते. हे कण प्रकाशाच्या वेगाने प्रवास करतात. त्यांनाच 'विश्वकिरण' म्हणतात. विश्वकिरणांचा वर्षाव कसा होतो, यासंबंधीचा सिद्धांत, 'भाभा-हाइटलर-कास्केड सिद्धांत' या नावाने प्रसिद्ध आहे.या महत्त्वपूर्ण संशोधनामुळे त्यांना जगभर मान्यता मिळाली. १९४०मध्ये भाभा, सर सी.व्ही. रामन यांच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'मध्ये संशोधन करण्यासाठी दाखल झाले. १.६.१९४५ रोजी मुंबईत टाटा मूलभूत संशोधन संस्था स्थापन झाली. होमी भाभा या संस्थेचे संचालक होते. या संस्थेत गणित, भौतिकशास्त्र, ॲस्ट्रो-फिजिक्स या विषयांवर संशोधन सुरू झाले. या संस्थेच्या कुलाबा येथील नवीन इमारतीचे उद्‌घाटन, १५ जानेवारी १९६२ रोजी, पंतप्रधान नेहरूंच्या हस्ते झाले. पं. नेहरू आणि भाभा यांच्या परस्पर सहकार्यातून, अणुशक्तीचा वापर शांततेसाठी व विधायक कार्यांसाठीच करण्याचे ठरले. अणुऊर्जेचा वापर करून वीज निर्मिती करणारे भारतातील पहिले केंद्र महाराष्ट्रातील तारापूर येथे स्थापन झाले. १९६९ पासून या केंद्रातून वीज निर्मिती होऊ लागली. अशी २२ केंद्रे सध्या भारतातील विविध राज्यांत कार्यरत आहेत. व्हिएन्ना येथील आंतरराष्ट्रीय अणुशक्ती एजन्सीच्या सल्लागार समितीच्या बैठकीत, भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी डॉ. भाभा तेथे जात होते, परंतु तेथे पोहोचण्यापूर्वीच, त्यांच्या विमानाला अपघात होऊन, सर्व प्रवासी मृत्युमुखी पडले. होमी भाभा (३०.१०.१९०९ – २४.१.१९६६) यांच्या सूचनेनुसार 'इलेक्ट्रॉनिक्स कार्पोरेशन ऑफ इंडिया'ची स्थापना केली गेली. थॉमस अल्वा एडिसन (११.२.१८४७ – १८.१०.१९३१) यांचा जन्म अमेरिकेतील ओहाओ राज्यातील मिलान शहरात झाला. एडिसन हा अगदी मठ्ठ विद्यार्थी आहे, असे शाळेतील शिक्षकांनी सांगितल्यामुळे, त्याच्या आईने घरीच शिकवले. तीव्र स्मरणशक्ती आणि कुशाग्र बुद्धिमत्ता यांचे वरदान लाभलेला थॉमस झटपट शिकला.वयाच्या १२ व्या वर्षीच, एडिसन यांनी स्वतःच्या कष्टाने पैसे मिळवायला सुरुवात केली. रेल्वे प्रवासात विविध वस्तू विकून आणि येताना अन्य वस्तू विकत घेऊन त्यांची विक्री करून, त्यांनी पैसे मिळवायला सुरुवात केली. नंतर त्यांनी स्वतःचे वर्तमानपत्र सुरू केले. रेल्वेच्या शेवटच्या डब्यातील एका कोपऱ्यात प्रयोगशाळा थाटली. प्रयोगशाळेमध्ये झालेल्या छोट्याशा स्फोटामुळे, आणि नंतर गार्डने रागाने डाव्या गालावर, कानफटात मारल्याने एडिसन कायमचा बहिरा झाला. एडिसन यांनी लावलेल्या अनेक शोधांमुळे माणसाच्या भौतिक सुखात भर पडली. दैनंदिन जीवनात अनेक सोयीसुविधा निर्माण झाल्या. एडिसन यांनी त्यांच्या शोधांची अमेरिकेमध्ये हजारपेक्षा जास्त पेटंट्स घेतली. वीज पुरवठा करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची निर्मिती करण्यासाठी स्वतःची कंपनी स्थापन केली. कुशाग्र बुद्धिमत्ता, जिद्द, चिकाटी आणि मेहनत या सर्व गुणांच्या आधारे अनेक शोध लावले. आपले आणि कोट्यवधी लोकांचे जीवन समृद्ध केले.

लुई पाश्चर (२७.१२.१८२२– २८.९.१८९५), हिपोक्रॅटिसच्या (इ.स.पू.४००) काळापासून ते १९वे शतक सुरू होईपर्यंत, वैद्यकशास्त्रात फारशी प्रगती झाली नव्हती. माणसाला आजार का होतात, याविषयी लुई यांच्या जन्माआधी समाजात अनेक गैरसमजुती आणि अंधश्रद्धा होत्या. प्लेग, कॉलरा, देवी, घटसर्प, क्षय इ. विविध साथीच्या रोगांमुळे लाखो लोक शतकानुशतके मृत्युमुखी पडत होते. वेगवेगळ्या अतिसुक्ष्म जंतूंमुळे माणसाला आणि प्राण्यांना आजार होतात, हे फ्रान्समधील लुई पाश्चर यांनी सिद्ध केले. त्या आजाराची लस बनवण्याचे आणि ती शरीरात टोचण्याचे तंत्र पाश्चर यांनीच सर्वप्रथम वापरले. या शोधामुळे वैद्यकशास्त्राच्या इतिहासात क्रांती घडवून आली. द्रव पदार्थ नासू नयेत, यासाठी पाश्चरायझेशनची पद्धत शोधून काढली. १८७० च्या दशकात पाश्चर यांनी लसीकरणाचे महत्त्व जगाला पटवून दिले. माणसाला किंवा पशुंना लस टोचून त्यांच्या शरीरात रोगप्रतिकारशक्ती निर्माण करता येते, हे सिद्ध करून त्यांनी रोगप्रतिकारशास्त्र

(इम्युनॉलॉजी)या शाखेचा पाया घातला. लुई पाश्चर यांच्या संशोधनाची प्रदीप यांनी सविस्तर माहिती दिली आहे. अलेक्झांडर फ्लेमिंग (६.८.१८८१ – ११.३.१९५५) यांनी १९२८ मध्ये पेनिसिलिन या जगातील पहिल्या प्रतिजैविकाचा (ॲंटिबायॉटिक) शोध लावला. या औषधामुळे काही जीवघेण्या आजारांपासून जगातील लक्षावधी माणसांचे प्राण वाचवणे शक्य झाले. सूक्ष्मजंतूंच्या संसर्गामुळे सजीवाला वेगवेगळे आजार होऊ शकतात बॅक्टेरिया (जिवाणू) व्हायरस (विषाणू) आणि फंगस (बुरशी) असे त्यांचे तीन प्रकार आहेत. बॅक्टेरियाच्या संसर्गामुळे कॉलरा, बीडिप्थेरिया, मॅनेन्जायटिस, क्षय, न्यूमोनिया असे विविध आजार होऊ शकतात. वैद्यकीय शिक्षण घेताना त्यांनी मानवी शरीररचनेचा बारकाईने अभ्यास केला. वेळोवेळी झालेल्या परीक्षांमध्ये फ्लेमिंग यांनी उत्तम यश आणि पारितोषिके प्राप्त केली. त्यांच्या विविध संशोधनांची सविस्तर माहिती प्रदीप यांनी दिली आहे. पेनिसिलीनच्या शोधाबद्दल सर अलेक्झांडर फ्लेमिंग, सर हॉवर्ड फ्लोरी, डॉ.अर्न्स्ट चेन यांना १९४५ साली नोबेल पारितोषिक विभागून देण्यात आले. पेनिसिलीनचा शोध लावल्यानंतर फ्लेमिंग यांनी त्याचे पेटंट घेतले नाही. त्यांनी या शोधाचे श्रेय स्वतः न घेता निसर्गाला दिले होते. श्रीनिवास रामानुजन (२२.१२.१८८७ – २६.४.१९२०) हे मद्रास पासून १६० मैलांवर असलेल्या कुंभकोणम या गावचे रहिवासी. लहानपणापासून ते अतिशय भावनाप्रधान, हट्टी आणि मनस्वीवृत्तीचे होते. खेळांमध्ये त्यांना रस नव्हता. स्वतःच्या विचारात ते गर्क असत. तल्लख बुद्धिमत्ता असल्याने त्याला गणितामध्ये नेहमी १०० पैकी १०० गुण मिळत. नामगिरीदेवीच्या कृपाप्रसादामुळे, बुद्धीची देणगी लाभली आहे, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. घरामध्ये कर्मठ वातावरण होते. कॉलेजमध्ये ते सतत गणिताचा अभ्यास करत. मात्र अन्य विषयांत त्यांची प्रगती नसल्यामुळे त्यांना पदवी मिळाली नाही. त्यांनी प्रामुख्याने 'नंबर थिअरी' या विषयावर मूलभूत संशोधन केले. त्यांच्या या संशोधनाची माहिती त्यांच्या वरिष्ठांनी, त्यांचे संशोधन इंग्लंडमधील नामवंत गणितज्ञ, जी.एच. हार्डी यांना पाठवले. हार्डी यांनी रामानुजन यांच्या संशोधनाचे महत्त्व जाणले, त्यांना इंग्लंडला बोलावून घेतले. त्यांच्या वह्यांचा तेथील गणितज्ञांनी बारकाईने अभ्यास केला. रामानुजन यांनी केलेल्या संशोधनाचे महत्त्व विचारात घेऊन केंब्रिज विद्यापीठाने १९१६ मध्ये त्यांना बी.ए.ची पदवी दिली.१९१८ मध्ये रामानुजन यांना 'रॉयल सोसायटी 'चा, व 'ट्रिनिटी'चा 'फेलो' होण्याचा बहुमान मिळाला. मात्र लंडनच्या थंड हवेमुळे, विशिष्ट आहाराच्या हट्टामुळे, तब्येतीकडे झालेल्या दुर्लक्षामुळे त्यांचे निधन झाले.

'असे घडले थोर शास्त्रज्ञ', या पुस्तकाद्वारे प्रदीप कुलकर्णी यांनी जगातील श्रेष्ठ शास्त्रज्ञांची, सुयोग्य कृष्णधवल आणि रंगीत छायाचित्रे, आकृत्या यांच्या साहाय्याने, सविस्तर ओळख करून दिली आहे. या महान शास्त्रज्ञांनी स्वहिताला, संपत्तीला महत्त्व न देता, संपूर्ण मानव जातीच्या हिताचा विचार केला होता. मानवाच्या कल्याणात त्यामुळे निश्चितच वाढ झाली आहे. मलपृष्ठावर डॉ. विवेक पाटकर यांनी या पुस्तकाचे महत्त्व स्पष्ट केले आहे. प्रदीप कुलकर्णी यांचा, सचित्र परिचय शेवटी दिला आहे. हे पुस्तक विद्यार्थी, शिक्षक आणि सर्व सुजाण नागरिक यांच्यासाठी वाचनीय, प्रेरक आणि संग्राह्य ठरणारे आहे. ●

**पुस्तकाचे नाव : असे घडले थोर शास्त्रज्ञ**
**लेखक : प्रदीप कुलकर्णी**
**प्रकाशक : मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, गिरगाव, मुंबई-४**
**पहिली आवृत्ती : १४.८.२०२५**
**पृष्ठे : १७०   मूल्य : रु.३००/-**

# 'गणपतीपुळे'चा प्रवास

**अंकुश शिंगाडे**

सायंकाळ झाली होती. राहून राहून किती दिवस राहणार. आज आम्ही गोवा सोडणार होतो. तसं सगळं पाहून झाल्यावर आम्ही आमच्या महाराष्ट्रात येण्यास तयार झालो. तशी गाडी मुंबई मार्गाने लागली होती.

आज दिवसभर आम्ही गोव्यात फिरलो होतो. गोव्यातील काही प्रेक्षणीय स्थळ पाहिले होते. त्या स्थळांना पाहून आम्ही सुखावलो होतो. आता परतीचा प्रवास सुरु झाला होता. पुढचा प्रवास होता गणपतीपुळे. मुंबई मार्गानं गाडी चालत होती. काही वेळानं मालवण आलं. तशी आम्हाला भूकही लागली होती. दिवसभराचा पुन्हा थकवाही होता. त्यामुळं आम्हाला आता जेवण करुन थोडा आराम करणं भाग होतं. मालवण आलं, तशी आमची गाडी एका रेस्टॉरेंटमध्ये थांबली. जेवणाची ऑर्डर दिली गेली. मंडळी थकलेली असल्यानं खमंग जेवणावर चांगला ताव मारत होते. माझं जेवण झालं होतं. तसा एक मित्र सोनकळीचा एक ग्लास हातात देत म्हणाला,

''ही सोनकळी प्या गुरुजी. मालवणची मासोळी व सोनकळी पुर्ण जगात प्रसिद्ध आहे. एका ग्लासला दिडशे रुपये पडतात.''

मी तो ग्लास हातात घेतला व ती सोनकळी पिऊ लागलो. नारळाचं पाणी व संध्या गंध्या मीठ टाकून ही सोनकळी बनवली होती. त्यात अजून काय काय टाकले होते हे काही माहीत नाही. पण सोनकळी फारच सुंदर झाली होती. मित्र चालक होता. तसं पाहता बावीस लोकं असल्यानं दोन्ही चालकांना जेवण निःशुल्क होतं. त्यातच जेवणासोबत चालकांनी सोनकळीची ऑर्डर दिल्यानं तिही आम्हाला चव घ्यायला मिळाली होती. तसा एक दिड तास गेला. जेवण झाल्यानंतर पुन्हा आम्ही गाडीत बसलो. पुन्हा गाडी त्याच मुंबईच्या रस्त्यानं चालायला लागली. तशातच काही वेळ पुढे गेल्यावर रत्नागिरी आली. रत्नागिरीवरुन एक वळण लागलं. रस्ता अरुंद होता. तसं काही वेळातच गणपतीपुळे आलं.

गणपतीपुळ्याला येण्याची माझी दुसरी वेळ होती. त्यामुळं तेवढं आकर्षण वाटत नव्हतं. एखाद्या पर्यटन ठिकाणी प्रवासाची जी पहिली वेळ असते. तो क्षण अद्‌भूत असतो. त्याची कल्पनाच करता येत नाही. पण यावेळी दुसरी वेळ असल्यानं तो जुना गोडवा नव्हता. मुक्कामही निसर्गसानिध्यात नव्हता.

रात्री प्रवास करणे का असेना, अंधारातही त्या परीसराची शोभा वाखाणण्याजोगी होती. चंद्राच्या शितल छायेत ते काळपट वृक्ष फेर धरुन नाचत होते. तर रस्त्याच्या काठाने पसरलेला हा समुद्र त्या चंद्राच्या प्रकाशात चमकत होता. मागच्याही प्रवासाच्या वेळी जी वेळ होती. तीच वेळ यावेळीही होती. पण मंदिरात यावेळी एक बदल झाला होता. मागच्या वेळेला गणपती सोन्याचा होता. आता पाहतांना त्याच्या शरीरावरील सोन्याचं आच्छादन गायब झालं होतं, अर्थात काढून टाकलं होतं.

मागे एकदा पर्यावरण साहित्य संमेलनाच्या निमित्ताने पुणे व कोकणात जाण्याचा योग आला होता. तेव्हा कोकण पाहतांना फार मजा वाटत होती. तीच मजा आजही येत होती. आजुबाजुला नारळ व पोपळीची झाडं पसरलेली दिसत होती. कोणाला तरी विचारलं, हा भाग कोणता? तो म्हणाला, 'कुंभार्ली घाट'

नागमोडी वळण घेत गेलेला रस्ता. थोडी जरी चुक झाली की सरळ खाईत. हेलकावे खात गाडीचा प्रवास सुरु होता. गाडीमधुन पाहुन मन उत्साहानं उचंबळत होतं. मनात फार मोठे तरंग निर्माण होत होते.

साखरझोपेत असलेली वनराजी पक्षांच्या किलबिल आवाजानेही झोपलेली असावी असे वाटत होते. माड आणि पोपळी तर गप्प बसल्यागत कोणतीही हालचाल करीत नव्हत्या. आमची चाहुल लागली तरी त्यांना जाग आली नाही वा त्या पोपळी अन् माडानेही स्वागत केले नाही असं वाटायला लागलं होतं. अन् ते तरी स्वागत कसे करतील.......ती काय स्वागत करायला माणसं होती! पण त्यांनाही जागवणारं कोणी तरी होतं. कोण होता तो......कसे काय जमले त्याला? तो माणुस होता की अजुन काही?

पर्वताला घिरट्या घातल्यागत गाडी चालु लागताच अचानक वारे वाहू लागले. माड आणि पोपळीही नाचायला लागल्या. माड हा वर तर पोपळी जशी नववधू सारखी डोलायला लागली. त्यातच वरातीतील प्रवासी असणारे आंबा, फणस काजुंची झाडही फेर धरुन नाचायला लागली. एवढंच नाही तर बांबुची झाडंही कर्णकर्कश आवाजात बासरी, सनई वाजवायला लागलेत, जणु विवाहसोहळा चाललाय.

आमची गाडी त्यातच गणपती पुळ्याला पोहोचताच त्याचं वर्णन करणं अवघड. एखाद्या सापासारखे पर्वतराजीतुन नागमोडी वळणं घेत आल्याचा भास त्यावेळी मनाला स्पर्शून गेला. नागमोडी असलेल्या या सापाच्या गर्भातुन आपण सुखरुप बाहेर पडलो, असेही क्षणभर वाटले. कारण पुढे जीभ बाहेर काढणारा साप जसा दिसतो अगदी तसाच समुद्रही लालसर जीभेसारखा दिसत होता. कदाचित कोणाला तो जंगलातील सिंह किंवा वाघ जंगलात जीभ बाहेर काढून बसल्याचाही भास होत असेल.

आम्ही गणपती पुळ्याला जेव्हा पोहोचलो, तेव्हा थोडी रात्रच होती. वर आकाशात चंद्र प्रकाशमान भासत होता. त्याचा उजेड त्या सागरावर पडला होता. जणू आकाश आपल्या पत्नीला भेटल्यागत वाटत होते. आकाश व पृथ्वी मायबाप असून चंद्र हे त्याचे लेकरु त्या मायबापाच्या कुशीत बसले आहे असा भास होत होता.

जेव्हा सकाळ झाली. चंद्राची अंधुक छटा आसमंतातून नष्ट झाली होती. आकाश मात्र पाण्याला दूर पलिकडे खेटुन बसले होते, दुसऱ्या क्षितीज नावाच्या पुत्रासमवेत.....चंद्र नावाचा एक मुलगा फिरायला गेला असावा असं वाटत होतं. दिवस उजाळताच अथांग लाटा समुद्रावर तांडव माजवत होत्या. सागर खवळल्यागत लाटा उंच उंच उफाळत होत्या. ओसांडणाऱ्या या लाटा पाहताच अंगावर रोमांच उभे राहात होते. काटेच जणु. भयंकर भीतीही वाटत होती. तरी न घाबरणारी मंडळी त्या सागराच्या लाटेपर्यंत जाऊन सागराच्या लाटेची मजा घेत होते. विशेष म्हणजे त्या लाटा येत आणि पर्यटकांना चिंब करुन जात.

ह्द्याला स्पर्शणारा तो अनुभव फार काळ टिकला नाही. आम्ही गणपतीचं दर्शन घेऊन रत्नागिरीला निघणार होतो. पण त्यापुर्वी गणपतीचं दर्शन घ्यावं असं





आम्ही ठरवलं होतं. कारण आम्ही केवळ गणपतीपुळ्याचा समुद्रच पाहण्यासाठी काही गणपतीपुळ्याला आलो नव्हतो.

सकाळ झाली. मी समुद्रात अंघोळ केली. सारं अंग चिकट झालं होतं. पण समुद्राचं पाणी आपल्या अंगात भिनावं, नव्हे तर त्या पाण्याचा आस्वाद घेता यावा म्हणुन मी समुद्रात अंघोळ केली होती.तर सहकाऱ्यांनी गरम पाण्यानं अंघोळ करुन घेतली. गरम पाण्यानं अंघोळ केल्यास समुद्रातील पाण्याचे क्षार मरतात व त्यामुळे अंगावर चिकटा राहत नाही असा येथील लोकांचा समज. मी नंतर गरम पाण्यानेही रुमवर अंघोळ केली.चिकटा काढून टाकण्यासाठी. अंघोळ होताच आम्ही पुजेचं सामान घेतलं आणि थेट दर्शनाला गेलो. गर्भगृहातून आत शिरताच प्रशस्त सभागृह लागलं. त्याचपुढे गणपतीचं मंदिर दिसलं. मंदिरात दोन गणपती दिसले. आतील मुर्ती ही पुर्वी सोन्यानं मढवलेली होती. तिला आता शेंदराची पाहताच आश्चर्य वाटलं. पुर्वी ती सोन्याची असल्यानं ती चमकतांना भासे. आज मात्र तसं वाटत नव्हतं. मात्र खरंच या मुर्तीत सत्व असेलच याचा भास आजही होतो. या मुर्तीची पुजा करु देत नाहीत. तिथेच एक बाहेर मुर्ती आहे. त्या मुर्तीची पुजा केली जाते. ती चांदीची आहे.

या ठिकाणी एक आख्यायिका आजही प्रसिद्ध आहे. जो कोणी या गणपती बाप्पाला नवस करेल त्याचा नवस पुर्ण होतो. त्यामुळे की काय दर्शनाला सकाळपासुन फार गर्दी असते.कोणाच्या किती इच्छा पुर्ण होतात हे गर्दीवरुन कळते.

भाविकात काही विदेशीही मंडळी दिसली. ही विदेशी मंडळी गणपतीचं दर्शन आवर्जून घेतांना दिसली. कोणीतरी सांगत होतं की कितीही खवळलेला समुद्र असेल तरी त्याचं पाणी मंदिराच्या पायऱ्या ओलांडत नाही. आम्ही ज्यावेळी गेलो त्यावेळी समुद्र खवळलेलाच होता.त्याच्या लाटा एवढ्या उसळत होत्या की त्याचं एखादा उंच पर्वत बनला की काय असं वाटत होतं. जर समुद्र भरलेला असेल आणि आत उतरता येत नसेल तर त्याचा आनंद या मंदिरात उभे राहून सहज अनुभवता येतं. गर्भगृह देखील सुशोभित असंच आहे.

हा परिसर गणपती बाप्पाच्या कृपेने पावन झालेला असून या भागात गणपतीची महिमा असल्याने या ठिकाणाहुन निघावसंच वाटत नाही.तरीही आम्हालाही सवड नसल्याने निघावं लागलं. आम्ही गाडीमध्ये बसलो. गाडी सुरु झाली. हळूहळू तो परिसर सोडला. मात्र काळजात आजही गणपतीपुळे घर करुन आहे. आजही गणपती पुळ्याला जावसं वाटतंय. तेथील समुद्राच्या लाटा अंगावर झेलावाश्या वाटतात. ही त्या गणपती बाप्पाचीच कृपा असेल कदाचित आजही तिथे रमावंसं वाटतंय. तेथील गणपती बाप्पा हा अति पावन असून साऱ्या सृष्टीसौंदर्यानं नटलेला आहे. हे सर्व गणपती बाप्पाचीच कृपा असावी असं पदोपदी वाटतं. आपणही एखाद्या वेळी दर्शनाला जावून त्याचा लाभ घ्यावा असंही मला मनोमन वाटतं. ●

# गणेश दर्शन स्पर्धा २०२६



● वैभव विलास पाटील, मु. वायशेत, पोस्ट नवगाव, ता. अलिबाग



● मोर्बा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विलास गोठल यांच्या निवासस्थानी आकर्षक सजावटीसह स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सलीम शेख)



● माणगाव येथील विनोद मेहता यांच्या निवासस्थानी कुटुंबातील सदस्यांनी अथक परिश्रम घेत मुंबईतील चाळींच्या धर्तीवर आधारित आकर्षक सजावटीसह सादर केलेला गणराय देखावा सर्वांचेच लक्ष वेधत आहे. (छायाचित्र : सलीम शेख)



● माणगाव तालुक्यातील गांगवली येथील संतोष दाखिणकर व रामदास दाखिणकर यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सिद्धी दाखिणकर)



● राजाराम दामोदर पाटील मु. डावले, नागाव-अलिबाग



● श्री. प्रतिक भालचंद्र खारकर यांच्या निवासस्थानी (बामणगाव) विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना श्री. राजेंद्र थळे व परिवार



● थेरोंडा डोऱ्यांची वाडी येथील सिद्धेश केमकर यांनी खंडोबा जेजुरीचा मनमोहक देखावा साजरा करण्यात आला. (छायाचित्र : सुरेश खडपे)




● चौल चंपावती आळी येथील श्री. रविंद्र प्रभाकर राऊळ यांनी करवीर निवासिनी महालक्ष्मीचा प्रसन्न देखावा सादर केलाय. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● चौल चंपावती आळी येथील श्री. राजू जाधव यांनी चौल दत्तात्रेय यात्रेचा आकर्षक सजावट केले. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● चौल पद्मावती आळी येथील जयवंत कृष्णा नागवेकर यांनी साकारलेली गणरायाची केलेली नयनरम्य सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● चौल पिरांचे देऊळ येथील कु. साहिल सुनील घरत यांनी वारली कलेचा वापर करून झोपडीमध्ये श्री गणेश विराजमान केलेत. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● पेण-कोप्रोली येथील प्रवीण पाटील यांच्या घराचा बाप्पा.



● श्री. संतोष बांद्रे, मु. मुनवली, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीची मूर्ती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री.अरविंद मसुरकर, मु. मुनवली, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीची मूर्ती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. चंद्रकांत मदन कवळे, मु. परहूर, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची आकर्षक मूर्ती व देखावा. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. राजू कृष्णा म्हात्रे आणि परिवार, मु. कृष्णानगर-वडखळ, ता. पेण यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची सुबक मूर्ती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. प्रतिक भालचंद्र खारकर यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना. श्री. संदीप भाऊ गायकवाड (शेकाप चिटणीस मापगाव विभाग) व परिवार



● श्री. हर्ष भगत यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना. श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (शेकाप पुरोगामी युवक संघटना सदस्य बामणगाव)

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)